मोतीराम वा। भवानी बारी जयपूर… फकीरा वा। शामा बारी जयपूर… गणपत वा। जयराम बारी वडनेरभोल… नामा वा। बापाचे नांव माहित नाहीं … रा० वडगांव ता० आकोट सदरहु रु… सदरहु पंचांनीं आपल्या हातानीं मज… ळून घेऊन चुकविले. तर हे रुपये तुह्मांस दोन तीन वेळा मागितले अस… तुह्मी आह्मास वडनेर येथें येऊन हंगामा… करार केला. तो करार आह्मी नाकारल्य… मुळें तुह्मांस राग येऊन उलट आमचे… नोटीस दिली. त्यांत आपण असें लिहि… कीं शंभर रुपये व डागीना ह्मणजे सोन्याच… चितांग १ वजन अजमासें ४ अ… वीरशैवसंजिवनी पत्रांतून नोटीस तारी… १० माहे जून सन १९१२ इसवी रोजी दिली यावरून आह्मास असें दिसते क… तुमचे मनांत बेइमानी उत्पन्न होऊन आम… पैसे बुडविण्याचा हेतु आहे. करितां आपल… धोकेबाजी दिसून आली. तर आतां आप… आपला संभावीतपणा सोडून आमचे पंच… समक्ष घेतलेले रुपये नोटीस पावल्यापासू… आठ दिवसांचे आंत वाटेल त्या प्रमाणें… सेय करून खालील पंचासमक्ष देऊन आमची पावती घेऊन जावी.

पंचाची नांवें

१ मारुती वा। बेडूजी पटवारी २ केश… बीन रामचंद्र भट ३ बाळकृष्ण भिकाजी देशमुख ४ जानकीलाल भंदरमल ५ रघुनाथदास गुरु बद्रीदास सदरहु पंचा समक्ष रुपये देऊन आमची पावती घेऊन जावी. तसे न केल्यास आपल्यावर नोटीशीचे खर्चासुद्धां व व्याजासुद्धां कोर्टखर्चासुद्धां तुमचे जवळून रुपये भरून घेतले जातील. तुह्मी दिलेली नोटीस खोटी आहे. तीजबद्दल तुमचेवर रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें. तारीख १९ माहे जुन सन १९१२इसवी. दस्तुर धनुजी वा। गणुजी तेली रा० वडनेर भोलजी.

सही

नानू वा। उखा बारी रा० कनबे वडनेर भोलजी नि० खुद हातची रेघ—

नो० नं० ३९७

आधिच्या वाढील
ल्यानवर्यंत मि
त
ज्ञी,

*Registered NN.4*

# वऱ्हाडसमाचार.

**Berar Samachar.**

वर्ष ४६ ] आकोला—– सोमवार तारीख ८ माहे जुलई सन १९१२ ई० [ अंक २७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडींगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सुचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पादें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ — G. A. Phillips. एजंट.
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{३}{४}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१.९.१० — G. A. Phillips. एजंट.
नो० नं० २

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदां अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

### खात्रीचीं औषधें विक्रीस तयार.

जोगळेकर आणि कंपनी लिमिटेड आकोला.

याचें दुकानीं जोगळेकर आणि कंपनी यांनीं तयार केलेलीं खात्रीलायक व सशास्त्र औषधें विक्रीकरितां तयार आहेत तरी ग्राहकांनीं अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| सूतशेखर | दर तोळा | १ |
| चंद्रपुटी प्रवाळ | ” | २॥ |
| सूर्यपुटी प्रवाल | ” | २ |
| अग्निपुटी प्रवाळ | ” | १ |
| नागाच्या गोळ्या | ” | २ |
| महायोगिराज गुगुळ | ” | २ |
| खोकल्याच्या गोळ्या | ” | २ |
| पोलादभस्म | | ३ |
| लक्ष्मी विलास | ” | १९ |
| त्रिभूवन किर्ती | ” | २ |
| श्वास कुठार | ” | २ |
| सुवर्णमालनीवसंत | ” | ६॥ |
| लघुमालनीवसंत | ” | २ |
| संमिर पन्नग | ” | ९ |
| रससिंदुर | ” | ३ |
| चंद्रोदय | | १९ |
| हिंगाष्टक चुर्ण | बांटली | ०= |
| डोळ्यांचें औषध | ” | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | [illegible] |
| लिनिमेंट आयोडिन | ” | ॥. |
| टि. आयोडिन | ” | ।= |
| महावातास्त्र तेल | ” | |
| मोठी | ” | ॥= |
| मध्यम | ” | ।–॥ |
| लहान | ” | ०= |
| उसाचा शिर्का | ” | ।= |
| मध बाटली. | | |
| मोठी | ” | ।= |
| लहान | ” | ०=॥ |
| पिनसावर तेल | ” | ॥. |
| ग्लिसराईन बाटली. | | ०= |
| गजकर्ण अर्क | ” | ।= |
| गजकर्ण मलम | ” | ०=॥ |
| शंखद्राव. | तोळा | ॥. |
| कुंचल्यादि वटी | ” | ॥. |
| हिंगणबेटाचे तेल | ” | ०= |
| नारायण चुर्ण | ” | ०= |
| इच्छाभेदी जुलाब डब्बा | | ०= |
| गृहणी कपाट | तोळा | २॥ |
| मौक्तिक शुक्ति | ” | २ |
| शितोपला चुर्ण | ” | ०= |
| चोपचिन्यादी चुर्ण | | |
| आम वातावर चुर्ण | ” | ०= |

येणेंप्रमाणें औषधें विक्रीस तयार आहेत.
ता. १।१।१२
जोगळेकर आणि कंपनी लि.
नो० नं० २१ आकोला

### निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्याही पातकें कशीं होतात व त्यांचा परिणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखे सोसावी लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परिणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टी विषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझे मनांत चार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केले आहे भाड्यानें घेतलेले घर केव्हां सोडावे लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेले घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर

ता० १६-५-१२ अकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्यांचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें मागचा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें पूर्व स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १।८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

### पाऊस पाऊस!!

आजकाल जिकडे तिकडे पाण्याची ओरड आहे. मेघराजाची केव्हां कृपा होईल इकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे. विहिरी तलावांचें पाणी अगदीं तळाला लागले. एक एक मोट ओढतांना जनावरांचे प्राण कासावीस होत आहेत. अशा बिकट प्रसंगांतून बचावण्यास जर तुह्मास एकादा सोपा मार्ग पाहिजे असेल तर आमचीं **मोटेचीं लोखंडी चाकें** वापरून पहा. अनुभवा शिवाय त्यांची योग्यतां समजणार नाहीं. आज एका चाकाबद्दल मागणी करा. जास्त माहितीबद्दल क्याटलॉग मागवा.

**किर्लोस्करबंधु.**
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).
ना० नं० ३४९

### नोटीस

कनीराम वा गोरसी जात बंजारी
रा० धांवड ता० मंगरूळपीर
यांसः–

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास ता० १९-२-१२ इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें होते परंतु तुह्मी माझ्या मनाप्रमाणें काम करीत नाहीं शिवाय तुमच्यावर सरकारी कामही चालू आहे ह्मणून या नोटिशीनें तुह्मास दिलेले मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. करितां आपण त्या मुखत्यारपत्राचे आधारे माझ्या बद्दल कोणतीही देवघेव किंवा व्यवहार करूं नये. जर कराल तर त्याची जबाब तुमचेवर राहील. कळावें ता० २७-६-१२ इसवी.

सही
तुकाराम तात्या देशमुख रा० धांवड
ता० मंगरूळपी

नो० न० ३६२

वऱ्हाडसमाचार.

अ. आषाढ वद्य ९ शके १८३४ परिधावी

## सुधारकपत्र.

पुण्याहून आलेल्या खाजगी बातमीवरून आह्मांस असें कळतें कीं तेथील ‘ सुधारक’ पत्र आज दोन महिने झाले बंद झालें आहे. ही बातमी वाचून कोणाही महाराष्ट्रीयाला अत्यंत खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. परलोकवासी प्रि० गोपाळराव आगरकर यांनीं जेव्हां तें पत्र प्रथम सुरू केलें, तेव्हांच्या व आतांच्या स्थितींत जरी थोडें बहुत अंतर पडलेलें असलें तरी आमच्या समाजाला आतां सुधारणेची अवश्यकता राहिलेली नाहीं असा प्रकार मुळींच नाहीं. कोणत्याही समाजाला कोणत्याही देशांत व कोणत्याही काळीं अशी स्पृहणीय स्थिति प्राप्त होणें अशक्य आहे. समाज आहे त्या ठिकाणीं कांहींना कांहीं दोष असावयाचेच व ते दोष निर्भीडपणानें दाखवून समाजाची सेवा करणाऱ्या मार्गोपदेशकाची जरूर ही लागावयाचीच. सुधारकाचा जन्म झाला त्याकाळीं संमतिवयाच्या बिलाची धामधूम सुरू होती, आणि चांगले शिकले सवरलेले पदवीधर सवंग लोकप्रियता संपादण्यासाठीं आडमार्गीत शिरून धर्माच्या नांवाखालीं भलभलत्या हक्काच्या समर्थनार्थ अकांडतांडव करण्यांत पुरुषार्थ मानीत होते. आमच्या समाजांत पुष्कळ ढोबळ दोष आहेत, पण ते आमचे आह्मी काढून टाकणार नाहीं, व कायद्यालाही काढूं देणार नाहीं अशा प्रकारची कांहीं विचित्र विचार व आचार सरणी त्यावेळीं प्रबळ होती. खोट्या अभिमानाला पूर्ण भरती आली होती. धर्माभिमानानें भलतेंच रूप धारण केलें होतें. उंबरांतल्या किड्यांप्रमाणें आमचे लोक जागचे जागीं कुजून मरतील असें भय विचारी लोकांना वाटूं लागलें होतें. अशा काळीं पृथ्वीवरल्या इतर सुधारलेल्या राष्ट्रांकडे पहा, त्यांचे समाज कसे जोमांत आहेत आणि तुमचा समाज कसा मृतवत् झालेला आहे त्याची तुलना करा, असें आक्रोश करून सांगणारा आणि आसन्नमरण झालेल्या समाजाला अमृतसंजीवनीचे चार वळसे उगाळून घालणारा पुरुष अत्यंत अवश्य होता. दादा बाबा करून समाजाचें मन वळविण्याची ती वेळ नव्हती. रंगणांत धरलेल्या मस्त घोड्याच्या अंगावर जसे सपासप कोरडे ओढल्यावांचून त्याची मस्ती जिरत नाहीं व तो योग्य मार्गाला लागत नाहीं, तसें आतां चरचरीत अंजन घातल्याशिवाय समाजदेहांत चेतना यावयाची नाहीं असें पाहून तीव्र उपायाची योजना करण्यास प्रिन्सिपाल आगरकर हे पुढें झाले व त्यांनीं आपल्या जोरदार लेखांमुळें सगळा महाराष्ट्र समाज हालवून सोडला. आमच्या समाजाला जी त्यावेळीं चेतना मिळाली तिच्यामुळें आतांपर्यंत पुष्कळच कार्य झालें. आज स्त्रीशिक्षण, प्रौढ विवाह, विधवापुनर्विवाह वगैरे अनेक इष्ट सुधारणांच्या बाबतींत आगरकरांचा सिंहनाद अद्यापि महाराष्ट्र वाचकांच्या कानांत घुमत आहे. सुधारकपत्र निघालें नसतें तर आमचा समाज पंनास वर्षें तरी मागें पडला असता. आगरकराच्या मागून समाजांत खळबळ करून सोडणारे लेख लिहणारा कोणी झाला नाहीं. संमती बिलासारखे आणीबाणीच्या वादाच्या प्रसंगी फारसे आले नाहींत. त्यामुळें आगरकरांना समाजासंबंधाची जी कामगिरी थोडक्या वेळांत करून दाखवितां आली ती सुधारक पत्राच्या पुढील संपादकांस करितां आली नाहीं. आगरकरांच्या मागून रा. देवधर यांनीं पूर्वीचें धोरण बरेंच कायम ठेविलें होतें. आणि त्यांच्याचकडे सुधारकाचें संपादकत्व राहिलें असतें तर त्या पत्रावर आजचा शोचनीय प्रसंग आला नसता पण सुधारकाच्या दुर्दैवानें लेखन व्यवसायाला अगदीं अपरिचित, ऐदी आणि कर्तव्य पराङ्मुख अशा माणसांच्या हातांत तें पत्र जात जात शेवटीं त्याची इतिश्री झालेली पाहून प्रत्येक महाराष्ट्रीयास हळहळ वाटल्यावांचून राहणार नाहीं.

सुधारकाचा काळ गेला. सध्याच्या काळांत त्याची अवश्यकता नाहीं. लोकांत शिक्षणाचा प्रचार झपाट्यानें होत असल्यामुळें कॉलेजांतील शिक्षण हेंच सुधारकाची जागा पटकावीत आहे वगैरे वगैरे निरर्थक विधानें करण्यांत येत असतात. परंतु खरा विचारी मनुष्य असल्या विधानांना कवडीचीही किंमत देणार नाहीं. आमच्यात शिक्षण प्रसार सुरूं आहे ही गोष्ट खरी आहे. पण त्या शिक्षणापासून होणारें कार्य खरोखर दिसूं लागलें आहे काय ? बायकांना योग्य प्रकारचें शिक्षण देण्याच्या तजाविजी आह्मी करीत आहों काय? गृहिणीपदास लागणाऱ्या तयारीची साधनें आह्मीं घरोघर नेऊन पोंचविली आहेत काय? समाजांत नवीन नवीन धुरू पहणाऱ्या मिजाशींचा व दुर्व्यसनांचा नायनाट करण्यास आह्मी काय उपाय केले आहेत ? चांगले शिकले सवरलेले लोक ज्या समाजांत बोके गुरूच्या तडाक्यांत सांपडून आपलें वित्त, लौकिक व सारासार बुद्धि यांचा बळी देतांना दिसतात, त्या समाजांत बोके सन्यासी व धादांत गुरु भावड्या बायकांना फसवून किती जणांच्या संसार सुखांत माती कालवीत आहेत ? किती बुद्धिमान व उत्साही तरुण आपल्या बुद्धीचा उपयोग फलजोतिषासारख्या जुन्या खुळाचें पुनरुज्जीवन करण्यांत करीत आहेत! परकी यांच्या अनुकरणाची चटक लागल्यामुळें आमच्यांतली किती कुटुंबें फ्याशनेबल पोषाख व राहण्याच्या रीति यांत सगळी प्राप्ति खर्च करून निष्कारण अनाथ होऊन बसले आहेत ! नामदार बसु यांच्या बिलासंबंधानें लोकांचा जो निष्कारण गैरसमज झाला आहे व सुधारक चमूंतील तिवे वीर आपल्या पक्षाशीं द्रोह करून सुधारणापक्षावर निष्ठुरपणानें प्रहार करीत आहेत ! ही अशी समाजांतली अराजक स्थिति नाहींशी करून त्याची सुव्यवस्थित घडी पुनः घालण्यास प्रि. आगरकर यांच्यासारखा कोणी खंबीर सुधारणावादी गुरु अवतरण्याची आज केवढी अवश्यकता आहे ?

अशा निकराच्या वेळीं, कीं ज्यावेळीं सुधारक पत्राची समाजाला अत्यंत अवश्यकता, अशावेळीं तें पत्र बंद करण्याची बुद्धि रा. हरिभाऊ आपट्या सारख्या आगरकरांच्या पट्टशिष्याला व्हावी हें देशाचें मोठें दुर्भाग्य ह्मटलें पाहिजे. सुधारक पत्र रा० हरीभाऊंनीं हातीं घेतलें तेव्हां त्या पत्राला उर्जितदशा लवकरच येईल अशी आह्मांस मोठी आशा वाटत होती. परंतु रा. आपटे यांच्या हातांत आल्यापासून एक वर्षाच्या आंतच त्याला मोक्ष मिळाला. सुधारकाला आश्रय नाहीं व तो मिळवितां येणें शक्य नाहीं ह्मणून तें पत्र बंद करणें अवश्य झालें असेल तर रा. हरिभाऊ यांनीं तसें करण्यांत थोडासा उतावीळपणा केला असें ह्मटलें पाहिजे. आगरकरांचा नांवावर त्यांच्या स्मारकाच्या रक्षणासाठीं ह्मणून किंवा ज्या उदार तत्त्वांचा प्रचार सुधारकाच्या द्वारें होत आला त्या तत्त्वांच्या गौरवासाठीं वर्षाचे कांठीं एक दोन रुपये खर्चण्यास मागेंपुढें न पाहणारे असे दोन हजार इसम महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे प्रांतांतून खात्रीनें निघाले असते. आमची अजून खात्री आहे कीं, रा. हरिभाऊ हे सुधारकाच्या पोषणासाटीं संचारार्थ निघतील तर त्यांच्या अपेक्षेच्या बाहेर त्यांना साह्य मिळेल. सुधारणेचें कार्य अत्यंत थोर आहे, देशहितावें आहे आणि रा. आपटे यांस अत्यंत प्रियही आहे तेव्हां ते अजूनही या गोष्टीचा पुनः विचार करतील व सुधारकाला स्मृतिशेष होऊं देणार नाहींत अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

## लॉर्ड क्रू व मि० मॉंटेग.

हाउस आफ लॉर्डस मधून इंडिया बिल पास करून घेतांना लॉर्ड क्रू यांनीं हिंदी लोकांच्या आकांक्षानां ज्या मर्यादा घालून दिल्या त्या संबंधानें हिंदुस्थानचें लोकमत वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेलें बिलायतेंतल्या लोकांना तारेनें कळविण्याची तजवीज रूटरच्या एजन्सीनें केली आहे किंवा नाहीं तें आह्मास ठाऊक नाहीं पण केली नसल्यास हें अत्यंत महत्वाचें कार्य कॉंग्रेसच्या जनरल सेक्रेटरींनीं अवश्य करावयास पाहिजे असें आमचें मत आहे. कारण, हिंदुस्थानच्या हिताहिताच्या बाबतींत मत देण्याचा अधिकार हिंदुस्थानालाच आहे, अशा अर्थाचें एक वाक्य त्यांच्या नुकत्याच झालेल्या एका भाषणांत होतें. त्यांचेच मदतनीस मि० मॉंटेग यांनीं केंब्रिज येथील आपल्या भाषणांत हिंदुस्थानच्या राजनीतीचें धोरणाची जी दिशा दाखविली होती तीही लॉर्ड क्रू यांच्या सध्याच्या भाषणाशीं अत्यंत विसंगत आहे. मि. मॉंटेग सारख्या थोर अधिकाऱ्यांनीं असल्या महत्वाच्या विषयावर आपल्या वरिष्ठाची सल्ला न घेतां स्वतःच्या कल्पनेचे तारे तोडले असतील हें संभवनीय नाहीं. तर्ं झा- मॉंटेग यांचें भाषण प्रसिद्ध होतं- भ्रामक विधान दुरुस्त करण्यास यांस पुष्कळ वेळ मिळाला होता. परंतु लॉर्ड क्रू यांनीं मि. मॉंटेग यांच्या विधानांचें खंडण किंवा निषेध करण्याची संधि साधली नाहीं. पुढें कॉमन्स सभेंत सुद्धां मि. मॉंटेग यांनीं त्याच विधानांची पुनरुक्ति केली तरी लॉर्ड क्रू हे स्वस्थ बसले आणि आतां हाउस ऑफ लॉर्डस मध्यें त्यांनीं आपलें मन खुलें केलें. यावरून अशी शंका येते कीं, लॉर्डांच्या हातून तें बिल पास करून घेण्यासाठीं ही त्यांची युक्ति तर नसेल ना ? बादशहांच्या आगमनकालीं हिंदुस्थानांत लोकांना झालेला आनंद त्यावेळची अधिकाऱ्याची सहानुभूति प्रेरित भाषणें व लॉर्ड हार्डिंज सारख्यांच्या सल्ल्यानें तयार झालेला खलिता व त्याच्या आधारावर मि. मॉंटेग यांनीं केलेली विधानें या सर्वांचा समुच्चयानें विचार केला तर लॉर्ड क्रू यांनीं तयार केलेल्या भाष्याचा मूळ खलित्याच्या उद्देशाशीं चांगलासा मेळ बसत नाहीं असें कोणासही दिसून येईल. लॉर्ड क्रू हे मुत्सदी आहेत. आपलें काम साधण्यासाठीं स्थळ व प्रसंग पाहून भाषणाचा रंग थोडा बहुत पालटणें हें मुत्सद्याचें कामच आहे. तेव्हां लॉर्ड क्रू हे परवां जे बोलले त्यांत मुत्सद्देगिरीची झांक मुख्यतः असून त्यांचें अंतःकरण दोनचार महिन्यांत इतकें संकुचित झालें आहे असें मानण्यास आह्मीं तयार नाहीं.

## दृष्टिभ्रम

प्रिंसिपाल गोळे यांनीं ‘ ब्राह्मण आणि त्यांची विद्या ’ हें पुस्तक लिहून बुद्धिमत्तेंत तरी निदान ब्राह्मण जातीला क्षयाची भावना होऊं लागली आहे असे सिद्धांत स्थापित करण्याचा यत्न केला, या गोष्टीला दहा बारा वर्षें झालीं. रा. गोळे यांनीं ब्राह्मण जातीच्या विद्यार्थीमधलें जें हें व्यंग शोधून काढलें तें थोड्याफार अंशानें एकंदर हिंदु विद्यार्थीमध्यें आहे असेंही मधून मधून कित्येक लेखक प्रतिपादीत असतात. एकंदर वर्गासंबंधानें सामान्यतः अशा तऱ्हेचें विधान करण्यास जितका सबळ पुरावा व जितकी व्यापक दृष्टि लागते तितका पुरावा व तितकी व्यापक दृष्टि असल्याशिवाय अशीं धाडसाचीं विधानें करणें गैर आहे. त्याच्या योगानें दोन तऱ्हेनें समाजाचें नुकसान होतें एकतर त्या विशिष्ट समाजाची नाचक्की होते, आणि दुसरी गोष्ट त्या समाजांत जे खरोखर होतकरू व कर्तृत्वाचा अंकुर असलेले लोक असतात त्यांचे हातपाय खचतात. गेल्या आठवड्यांत ना० चंदावरकरांनीं मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कुलाच्या बक्षिस समारंभाचे प्रसंगीं असें बोलून दाखविलें कीं अलीकडे कित्येक हिंदु विद्यार्थ्यांची प्रवृत्ति संस्कृत खेरीज करून दुसरी एखादी भाषा परीक्षेसाठीं शिकण्याकडे प्रवृत्ति होत चालली आहे ती अनिष्ट आहे. अनिष्ट कां बरें! या प्रवृत्तीपासून काय वाईट परिणाम व्हावयाचे आहेत? संस्कृत भाषेंत उत्तम वाङ्मय आहे व तिच्या अध्ययनापासून तुमच्या

र्ज ऐकणें, किंवा देणग्या देणें
पा गोष्टी ज्या खोदईच्यांच्या हा-

…षेच्या वाढीनें जो फायदा मिळावयाचा तो आजपर्यंत मिळत आला आहे व पुढेंही …त राहील. …हीं थोड्याशा विद्यार्थ्यांनीं …शी, आरबी, फ्रेंच, जर्मन अशा निरनिराळ्या भाषांचें ज्ञान संपादिल्यानें मराठीचें संस्कृत भाषेशीं असलेलें नातें तुटावयाचें नाहीं किंवा संस्कृतचे वर्ग ओस पडावयाचे नाहींत. बरें, आपल्या राष्ट्राला जर इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें सुधारणेच्या मार्गांत पुढें पाऊल टाकावयाचें आहे, तर त्यांच्याप्रमाणें आधुनिक प्रगतिपर वाङ्मय ज्या भाषेंत असेल ती भाषा शिकण्यावांचून राष्ट्रकार्यही व्हावयाचें नाहीं. भाषाशास्त्राची प्रगति होण्याला निरनिराळ्या भाषांचें अध्ययन हें बाधक नसून उलट साधकच आहे. शास्त्रीय शिक्षणासारख्या सध्याच्या काळीं अत्यंत महत्त्वाच्या गणलेल्या विषयाचा अभ्यास जर्मन किंवा फ्रेंच भाषेच्या द्वारें जितका चांगला होतो, तितका इंग्रजीच्या द्वारें सुद्धां होत नाहीं. अशा स्थितींत सर्वांनीं एकाच संस्कृत मंदिरांत प्रवेश करण्याचा धोपट मार्ग न ठेवतां निरनिराळ्या मार्गानें जाऊन निरनिराळीं आराममंदिरें शोधून काढण्याचा प्रयत्न केला तर तें करणें देशाच्या एकंदर हिताच्या दृष्टीनें अनिष्ट नसून उलट इष्टच आहे असें आह्मांस वाटतें. विद्वानांचेही मनांत पूर्व ग्रह प्रबळ असतात, किंवा कित्येक वर्षे एकाच दिशेनें पाहात गेल्यानें त्यांची दृष्टि भ्रमाकुल होत असते. हे पूर्वग्रह हायकोर्ट जज्जांसुद्धां सुटले नाहींत हें आश्चर्य आहे.

## अभिनंदनीय उद्योग

मुंबईच्या ग्रंथसंपादक मंडळीचे चालक रा. दामोदर सावळाराम यंदे यांच्यासारख्या ब्राह्मणेतर प्रकाशकानें आज हिंदुधर्माची यथार्थ माहिती सामान्य वाचकांमध्यें प्रसृत करण्याची जी खटपट चालविली आहे ती सर्वथा अभिनंदनीय आहे. पूर्वपरंपरेचा विचार केला तर उपनिषदें, पुराणें, वगैरे धर्मग्रंथ प्रकाशित करणें, त्यांचीं भाषांतरें करविणें, वगैरे कामें एखाद्या ब्राह्मण प्रकाशकानें करावयास पाहिजे होतीं. त्या कर्तव्यापासून ब्राह्मण प्रकाशक अलीकडे सर्वैव पराङ्मुख झालेले दिसतात. तथापि हें हिंमतीचें आणि देशहिताचें पुण्यकारक काम फार मेहनतीचें आणि खर्चाचें ह्मणून अंगावाहेर न टाकतां रा. यंदे सारख्या मराठ्यानें उत्साहानें हातीं घ्यावें हें खरोखर त्यांना अत्यंत भूषणावह आहे. बेळगांवचे रामतत्त्व विवेचक प्रेसचे मालक रा० सावंत, व इंदुप्रकाशचे रा. यंदे या दोघाही मराठे गड्यांनीं संस्कृत धर्मशास्त्रग्रंथातलीं पक्वान्नें मराठी वाचकांना वाढवून आकंठ तृप्त करण्याचें कंकणच हातांत बांधलें आहे. रा. यंदे यांनीं योगवासिष्ठ, तत्त्वानुसंधान कथाकल्पतरु, व उपनिषत्प्रकाश इ० फार मोठालीं कामें अंगावर घेऊन मराठी वाचकांवर महदुपकार करून ठेविलेच आहेत त्यांत आणखी स्वल्प किंमतीची पुराण-ग्रंथमाला काढून त्या उपकारांत ते भर घालू इच्छित आहेत हें पाहून आह्मांस संतोष होतो. 'श्रुति-स्मृति-पुराणोक्त' असा संकल्प रोज प्रत्येक हिंदूच्या-निदान ब्राह्मणाच्या तरी घरीं होत असतो. पण त्यांच्या दृष्टीनें ते शब्द निरर्थकच असावेत असें त्यांच वेळीं त्यांचें आचरण दाखवीत असतें. यामुळें आज अशी स्थिति झाली आहे कीं पुराणे वाचण्याची गोष्ट तर राहोच, पण सगळीं पुराणें साग्र उपलब्ध सुद्धां नाहींत. अशीं लक्ष श्लोकात्मक पुराणें मननपूर्वक वाचून त्यांचा संकलित अर्थ मराठींत उतरणें हें काम अतिशय बुद्धिमत्तेचें व दीर्घ प्रयत्नाचें आहे तथापि रा. यंदे यांनीं ज्यांचेकडे तें दिलें आहे ते महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध असल्यामुळें त्यांचे हातून तें कसें काय पार पडेल याविषयींची विवंचना करण्याचें कारण नाहीं. असे प्रयत्न वारंवार होत नसतात हें जाणून लोकहो या प्रयत्नास उदार आश्रय देतील अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे.

## कापसाची लागवड

सालोसाल पर्जन्याचें मान कमी कमी होत गेल्यामुळें हिंदुस्थानच्या शेतकीची स्थिति अखेर काय होणार? हा मोठाच प्रश्न आजच्या घटकेला सरकारापुढें व लोकांपुढें आहे आणि थोड्या जमिनींत पुष्कळसें पीक जेणें करून मिळवितां येईल अशी सुधारलेली शेतकीची पद्धति शोधून काढण्याकडे व त्या पद्धतीचा स्वीकार हिंदी शेतकऱ्यांकडून करविण्याकडे सध्या सरकारचें लक्ष लागलें आहे. लोक कांहींही ह्मणोत, पण आमची तर खात्री आहे कीं रयतेच्या कल्याणाविषयींची इतकी चिंता वाहणारें सरकार आज आमच्या देशाला लाभलें आहे ही खरोखर भाग्याचीच गोष्ट आहे. पण एकंदर शेतीची सुधारणा करणें हा फार व्यापकप्रश्न आहे. त्या प्रश्नाच्या पोटांत आणखी बारीकसारीक पण फार महत्त्वाचे असे दुसरे अनेक प्रश्न आहेत. त्यांतलाच कापसाची लागवड वाढविणें योग्य आहे काय हा एक प्रश्न आहे. इंग्लंड देश यंत्रप्रधान आहे. दुसऱ्या देशांनीं कच्चा माल पिकवून त्यांच्या दाराशीं नेऊन टाकावा तेव्हां तेथील कारखानदार त्या कच्च्या मालाचा पक्का माल तयार करून देतात व तो इतक्या स्वल्प खर्चांत कीं मूळ कच्चा माल विकविणाराला सुद्धां स्पर्धेत त्यांच्यापुढें टिकाव धरवत नाहीं. इंग्लंड जो येवढा धनाढ्य देश झाला आहे तो यंत्राच्या बळावर, पण त्याला कच्च्या मालाकरितां तरी हिंदुस्थान, अमेरिका किंवा कानडा या देशाच्या तोंडाकडे पाहावें लागतें. पैकीं अमेरिका व कानडा येथील लोकांनींही स्वतःचे कारखाने काढल्यामुळें त्या देशातून कापसा सारखा कच्चा माल पूर्वी प्रमाणें आतां विलायतेंत जात नाहीं. यामुळें इंग्लंडच्या कारखान्यांना भरपूर काम मिळत नाहीं. अर्थातच हिंदुस्थान येवढाच एक तरणोपाय विलायती कारखानदारांना राहिलेला आहे, आणि ह्मणून हिंदुस्थानांत कापसाची लागवड वाढविण्याविषयीं हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांना विलायतच्या कारखानदाराकडून वारंवार आग्रहाच्या विनंत्या, अर्ज, डेप्युटेशनें वगैरे जात आहेत. पण हा विलायतच्या कारखानदारांच्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार झाला. पण या प्रश्नाला दुसरी ह्मणजे हिंदुस्थानच्या हिताची एक बाजू आहे. त्याही दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करणें हें सरकारचें कर्तव्य आहे आणि ही बाजू सरकारच्या डोळ्यापुढें आहे असें स्टेट सेक्रेटरी लॉर्ड क्रू यांनीं विलयतच्या कारखानदारांच्या डेप्युटेशनला उत्तर देतांना सूचित केली होती. ती बाजू ह्मणजे ही. हिंदुस्थानांतल्या कापसाला चांगला भाव विलायतेंत येऊं लागला तर हिंदी शेतकरी पैशाच्या लोभानें धान्याची लागवड कमी करून कापसाची लागवड अधिक करूं लागतील व हल्लीं करीतही आहेत. पण प्रश्न हा आहे कीं धान्यावांचून लोकांची उपासमार होऊं देऊन विलायतच्या कारखानदारांच्या हितासाठीं तुह्मी कापसाची लागवड वाढवा असें शेतकऱ्यांना सांगणें हें नीतीच्या दृष्टीनें कितीसें चांगलें होईल. आमच्या वऱ्हाड प्रांताचेंच उदाहरण घेऊं. वरवर पाहणारांनासुद्धां असें स्पष्ट दिसून येईल कीं या प्रांतांतली धान्याची लागवड संपुष्टांत येऊन कापसाची लागवड अलीकडे मनस्वी वाढली आहे व दिवसेंदिवस ती वाढत आहे. पण याचा परिणाम काय होत आहे? ज्या वऱ्हाड प्रांताला स्वतःच्या पांचचार वर्षांच्या बेगमी इतकें धान्य एका वर्षांत सहज कोठारें भरून साठवितां येत होतें तेथें आतां एक दोन आठवडे पर्जन्याला विलंब लागतांच धान्याचे दर भलतेच वाढून चोहोकडे हाहाकार उडतो व इतर प्रांताकडे धान्याच्या पुरवठ्याकडे पाहावें लागतें. ही स्थिति कोणत्याही दृष्टीनें स्पृहणीय आहे असें कोणी खास ह्मणणार नाहीं. लॉर्ड क्रू साहेबांनीं हा मुद्दा डेप्युटेशनला उत्तर देतांना पुढें मांडलाच आहे. तथापि हिंदुस्थान सरकारनेंही या मुद्याचा अधिक दूरवर विचार करून प्रांतोप्रांतीची माहिती मागवून ती प्रसिद्ध करावी व डेप्यूटेशनची पिरपिर कायमची बंद करून टाकावी अशी आमची त्यांस विनंति आहे.

## खेदिव्ह आणि किचनेर.

लॉर्ड किचनेर यांची ईजिप्तमध्यें मुख्य राजकीय ब्रिटिश एजंटच्या जागीं नेमणूक झाल्यास एकवर्षच झालें. पण येवढ्या अवधींत त्यांनी आपली सत्ता कशी फैलावली आहे त्याचें मजेदार वर्णन इजिप्तच्या एका पत्रकर्त्यानें दिलें आहे. तें असें.— सदर पत्रकर्ता ह्मणतो— लॉर्ड किचनेर यांच्या नेमणुकीला इजिप्तचे राजे खेदिव्ह साहेब हे प्रतिकूळ होते व ही गोष्ट लॉर्ड किचनेर यांनाही ठाऊक होती. ह्मणून त्यांनीं खेदिव्ह साहेबांचा राग शांत करण्यासाठीं ह्मणून बारीक सारीक व्यक्तिविषयक बाबतींत खेदिव्हाला थोडेसें सैल सोडलें; पण त्या बरोबरच खरीखरी सत्ता आपले हाताखालीं घालण्यास कमी केलें नाहीं. याचा परिणाम असा झाला आहे कीं खेदिव्ह आणि त्यांचे मंत्री हे बारीक सारीक बाबतींत सत्ताधीश असले तरी ईजिप्तचा खरा राज्याधिकार किचनेर साहेबांच्या हातांत गेला आहे, आणि ते किचनेर साहेबांच्या हातांतलें बाहुलें होऊन बसले आहेत. बाह्यात्कारी जो राजेसाहेबांचा थाटमाट राहावयाचा तो सुद्धां राहिलेला नाहीं. सरदार लोकांचा दरबार भरविणें, नेमणुका करणें, अर्ज ऐकणें, किंवा देणग्या देणें वगैरे सगळ्या गोष्टी ज्या खेदिव्हांच्या हातून व्हावयाच्या त्या सगळ्या किचनेर साहेबच करतात. सर एलडन गॉर्स्ट यांच्या वेळीं कायदे कौन्सिलला कांहीं इभ्रत व अधिकार असे. आतां तीही राहिली नाहीं. वाटेल तेव्हां कॉन्सलनें त्याला दपटशा द्यावा असें झाल्यामुळें आपण खेदिव्हाच्या अमलाखालीं नसून ब्रिटिश सुल्तानशाही खालीं आहों असें लोकांस वाटूं लागलें आहे. ही स्थिति ईजिप्तच्या वर्तमानपत्रकर्त्यांना न खपून त्यांनीं खरें चित्र मांडलें कीं त्यांच्यावर दडपशाहीचा अंमल झालाच! ही दडपशाही सुद्धां वीस वर्षांपूर्वी खेदिव्हाच्या अंमलाखालीं झालेल्या कायद्याअन्वयें होत असते. वर दिलेलें वर्णन वस्तुस्थितीस कितीसें धरून आहे तें आह्मांस ठाऊक नाहीं, पण तें जर वस्तुस्थितिचें यथार्थ चित्र असेल तर इजिप्त मधील प्रो—कॉन्सलच्या जागीं जाण्यापूर्वी किचनेर साहेब हिंदुस्थानांत होते तेव्हां त्यांनीं येथील देशी संस्थानिकांच्या दरबारीं असलेल्या पोलिटिकल एजंटांच्या वर्तनाचें मार्मिक रीतीनें अवलोकन केलें असलें पाहिजे, आणि या दृष्टीनें त्यांची हिंदुस्थानांतली लष्करी कारकीर्द जरी गाजली नाहीं तरी पुढच्या आयुष्य क्रमाची तयारी त्यांनीं येथेंच करून ठेविली होती असें ह्मटलें पाहिजे.

## मारून मुटकून हिंदु.

'मोगलाईतला न्याय' ह्मणजे अगदीं विचित्र प्रकारचा अशी ह्मण होऊन बसली आहे. पण न्यायाचा पुढील मासला— आणि तोही या विसाव्या शतकांतला-- वाचिला ह्मणजे मोगलाईला हंसावयाला नको असें कोणालाही वाटेल. अमेरिकेंत वानकूवर येथे असा कायदा आहे कीं कोणाही हिंदूला तेथील मतदारांच्या यादींत आपलें नांव घालतां येणार नाहीं. व निवडणुकीचे वेळीं मतही देतां येणार नाहीं. हा नियम न्यायाचा आहे किंवा अन्यायाचा आहे, सकारण आहे कीं निष्कारण आहे, आणि नुसत्या हिंदूलाच हा नियम लावणें युक्त आहे कीं नाहीं हा प्रश्न तूर्त बाजूला ठेवूं पण या नियमाची अंमलबजावणी किती कडक रीतीनें आणि विचित्र प्रकारें होत असते तें पाहण्यासारखें आहे. वानकूवरमध्यें अनेक हिंदी लोक उद्योगधंद्याच्या कारणांसाठीं जाऊन राहिले आहेत. त्यांत हुसेन रहीम या नावाचे एक मसलमान गृहस्थ आहेत. हे वस्तुतः हिंदु नाहींत व त्यांनीं आपलें नांव मतदाराच्या यादींत घालण्यास नियमाप्रमाणें अडकाठी नसतांही घातलें नाहीं. यादी तयार करण्याचें काम ज्यांचेकडे आहे त्यांनीं तें घातलें. पण त्याबद्दलचें प्रायश्चित्त भोगावें लागत आहे या मुसलमान गृहस्थाला. वानकूवरच्या अधिकाऱ्यांनीं अधिकार नसतां तुमचें नांव मतदारांच्या यादींत आलें असल्या आरोपावरून त्यांना कोर्टापुढें चौकशीसाठीं उभें केलें. मी हिंदु नाहीं, मुसलमान आहें असें आरोपी सांगतो, त्याच्या नांवावरूनही त्याचा मुसलमानी पंथ स्पष्टपणें व्यक्त

शील तर रीतीप्रमाणें तुज-
टीशीचें खर्चासुद्धां तुजला
दुसरा घरठाव केल्यास

तों, पण येवढें पाहावें कोणी ? ज्जानीं युरी बोलाविली, आरोपीवर खटका केला आणि ज्युरींनीं हुसेन रहिम यास मारून टकून हिंदु ठरविलें. ज्जानीं काय निकाल केला तें अद्याप कळलें नाहीं. पण एकं-दरींत न्यायाचा मासला बघण्या लायक आहे खरा !

# वऱ्हाड वृत्त.

हवामान—आकाश कृष्णनील आहे, मेघ जलाद्र आहेत. वारा अरबी समुद्रा-कडील पर्जन्याला समीप आणीत आहे तेव्हां मध्यंतरीं थोडासा दुरावलेला पाऊस लवकरच पृथ्वीला पुन्हां नवीन वसूंनीं सुशोभित करूं लागेल. निरनिराळीं गवतें पशुवर्गास संतुष्ट करण्यास केव्हां डोलूं लागतील असें ध्यान लागलें आहे.

रा. रा. प्रीडो साहेब डिस्ट्रिक्ट आणि सेशन जज्ज यांची स्वारी सेशनाच्या खट-ल्यानिमित्त बुल्ढाण्यास गेली आहे.

**सो दिला**— 'वऱ्हाड विद्याप्रसारक मंडळी' ची विशेष सभा भरून शेवटीं असा निर्णय ठरला कीं वनिता-हायस्कूलाला काशीबाई जोगांच्या इमारतीपैकीं इमारती देतां येत नाहींत. हायस्कूलाचा प्रश्न सर-कारी बाजूनें इतका सुंदर रंगाला येत आहे तोंच अदूरदर्शी वाद उभा करण्याऱ्या लोकांनीं आपलीं राष्ट्रीय उन्नतीचीं तत्वें दूर करून सत्कार्याच्या हत्तीला चिखलांत बसविला. कार्य हनन सुलभतम खरें!

पोप— श्रीशृंगेरी मठाचे श्रीजगद्गुरु श्रीशं. कराचार्य यांची स्वारी बाळापुराकडून पायरस्त्यानें येतयेत आज आकोल्यास येणार आहे. श्रीराजेश्वराच्या मंदिरांत श्रींच्या दर्शनाला जाऊन हिंदी पोप साहेबांचा अनुग्रह घ्यावा असें आह्मी आमच्या नगरवासी मंडळींस सूचावितों.

१९११ च्या दवाखान्याच्या रिपोर्टीत असा उल्लेख आहे कीं रजेवर असलेले येथील सिव्हील सर्जन क्याप्टन फौलर यांची रोगचिकित्सा, शस्त्रक्रिया व शुश्रुषा या संबंधाच्या लौकिकामुळें रोग्यांनीं दवाखाना अगदीं गच्च भरलेला असे.

उणीव— आकोल्यास स्त्रियां साठी दवा-खाना नाहीं व सूतिका गृहही नाहीं. सरकार व लोक यांनीं या बाबदींत पुढाकार घेतला पाहिजे.

हल्लींचा मनु दवाखान्या पेक्षां आरोग्य मंदिरें स्थापण्याकडे आहे. सार्वजनिक उद्यानें किंवा क्रीडागृहें येथें नाहींत तर नाहींतच पण येथील शहरांतील मुनसिपल विद्यागृह ह्मणजे लहान कोमल विद्यार्थ्यांस दुखणेकरी करण्याचा कैदखाना आहे ही डोळेझांक बरी नव्हे !

## नोटीस

नोटीस बेशमी किसन नारायण शिंपी रा० चिखली हल्लीं वस्ती शेंदूरणी ता० जामनेर जि० पूर्वखानदेश यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमच्याशीं माझें लग्न झालें त्याप्रमाणें मी तुमचे घरीं नांदत असून तुह्मापासून मला एक मुलगा व एक मुलगी अशी संतती झाली त्यानंतर ह्मणजे आज सुमारें पांच वर्षे झाली तुह्मा घरांत मला त्रास देऊन काढून दिल्यामुळें मी आपले बापाच्या आश्रयानें मुलामुलीसह राहत आहे त्याच्या व माझ्या उदरनिर्वा-हासाठीं कर्ज काढल्याशिवाय गत्यंतरच न-सल्यामुळें कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे. तश्यांत मुलगी उपवर झाल्यामुळें तिचे लग्न करणें फार जरुरीचें असल्यामुळें कर्ज काढून केलें या दोन्ही कारणानें मला सावकाराचें कर्ज रुपये ५२९ झाले आहे ते देण्याविषयीं व मला वागविण्या-साठीं मी पंचामार्फत आपणास बरेंच वेळा कळविलें तसेंच मी मुद्दाम तुमचें घरीं आली परंतु आपण मला परत लाविले यावरून मला वागविण्याचा आपला हेतु मुळींच दिसत नाहीं. करिता ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचें आंत मला झालेलें कर्ज देऊन घेऊन जावें असें न केलें तर मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर कोणतेच प्रकारें हक्क राह-णार नाहीं व तुमचे कडून मला देणें झालेले कर्ज रुपये ५२९ व या नोटीशीचा खर्च असें वसूल केलें जातील मग तुमचा मग तुमची कांहीएक तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें. ता० २०।६।१२

सही

भिमा भ्रतार किसन शिंपी वस्ती
कसबे मलकापूर ता० मजकूर
निशाणी खुद हातची बांगडी.

नो० नं० ३६७

## नोटीस

रा० रा० हरी वलद कुकाजी हरमकार राहणार ऊटी ता० मेहकर जि० बुल्ढाणा

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० २०।९।१२ रोजीं दोन बटाईनामे माझ्या नांवचे लि-हून नोंदून माझ्या हवालीं केले. या दोन्ही बटाईनाम्या पैकीं मौजे उटी येथील सर्वे नंबर १९ संबंधानें तुह्मी तर फारच खोटेपणा व लबाड्या केल्या आहेत तुमचा व्यवहार सर्व दगलबाजीचा असल्या कारणानें दोन्ही बटाईनामें मला कबूल नसून ते कायद्यानें रद्द आहेत; आणि त्यांत लिहि-लेल्या शर्ती मला कबूल नाहींत. मी तुह्माला पट्टे दिलेले नाहींत आणि तुह्मास या बटाईनाम्याच्या आधारें कांहींच हक्क पोंचत नाहींत. तुह्मी शेतींत येऊं नये. तुह्माला शेतांत न येण्याविषयीं पूर्वींच तोंडीं समज दिलेली आहे, आणि याउपर तुह्मी कोण-त्याही शेतांत पाऊल टाकाल तर तुह्मास शेताबाहेर हांकून देऊन आगळीकीचा गुन्हा केल्या संबंधानें तुह्मावर फौजदारी करण्यांत येईल. बटाईनाम्या संबंधानें तुमचे कांहीं हक्क, अधिकार असतील तर ते तुह्मी दिवाणी कोर्टांत शाबित करून घ्यावेत. कळावें. तारीख ६ जून १९१२ इ०

सही

शंकर कृष्णाजी घोटे दस्तुर खुद राहणार
उटी ता० मेहकर.

नो० नं० ३६८

## नोटीस

नोटीस बेशमी रा० लालू भगुसा गु-जराथी रा० बाळापूर यांस—

खालीं सही करणार नारायणआपा खंडापा वाणी दुकान बाळापूर याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं माझा मुलगा नामे गोविंदा हा अजमास सोळा वर्षांचे उमरीचा असून तो अगदीं नासमज आहे. त्याजला माझे वैऱ्यांनीं आपलासा करून घेऊन मजला बुडविण्याचे इरायानें कांहीं-एक पैसा न देतां तुह्मास त्याजकडून रुपये ४०० च्या रशेचा दस्तऐवज करून दिला आहे असें माझे ऐकण्यांत आले आहे त्या दस्तऐवजावरून मी किंवा त्या अज्ञानाची जिनगी कोणतेही तऱ्हेनें बांधली जात नाहीं. अज्ञान अवस्थेंत केलेला व्य-वहार कायद्यानें अज्ञानास किंवा त्याचें जिनगीस मुळींच बांधू शकत नाहीं. त्याची अशी जिनगी कांहींच नाहीं. तुह्मी अज्ञा-नास फसवून त्याजकडून मोबदला न देतांन रु० ४०० च्यारशेचा दस्तऐवज करून घेतला तो दस्तऐवज रद्द करून आह्मास वापस आठ दिवसांत आणून द्यावा. तसें न केल्यास तुमचेवर अज्ञानत्वाचा फायदा घेऊन माझे मुलास फसविल्याबद्दलची मी फौजदारींत फिर्याद दाखल करीन तो प्रसंग येऊं नये ह्मणून तुह्मास आगाऊ सूचनार्थ कळविलें आहे. कळावें ता. २८ जून सन १९१२ इ.

सही

नारायणआप्पा खंडाप्पा वाणी
दुकान बाळापूर दस्तुर खुद

नो० नं० ३६९

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार नारायण आप्पा खंडाप्पा वाणी दुकान बाळापुर सर्व लोकांस जाहिर नोटिशीनें कळवितो कीं माझा मुलगा नामे गोविंदा हा सोळा वर्षांचे उमरीचा असून अगदींच ना समज आहे. तो माझे वैऱ्याचे नादास लागून माझे आज्ञेबाहेर वागतो व मजला बुडविण्याचे इरायानें वाटेल त्यास मोबदल्यावांचून वाटेल त्या रकमेचे दस्तऐवज लिहून देण्यास तयार होतो. सबब सर्व लोकांस जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं त्या मुलाशीं कोणी कोणतेही तऱ्हेचा व्यवहार करूं नये तो अज्ञान असल्यामुळें त्याजबरोबर केलेले व्यवहारावरून अज्ञान किंवा अज्ञानाची जिनगी मुळींच कायद्याप्रमाणें बांधली जाणार नाहीं व मीही कायद्याप्रमाणें त्याजबद्दल जबाबदार धरला जाणार नाहीं. सर्व लो-कांनीं हुशार राहून अज्ञानाशीं कोणतांच व्यवहार करून फसूं नये ह्मणून ही नोटीस देऊन सर्वांस जाहिर केले आहे कळावें ता. २८ माहे जून सन १९१२ इ.

सही

नारायणआप्पा खंडाप्पा वाणी
द० खु०

नो. नं. ३७०

## नोटिशीचें

नोटीस बेशमी मुकुंदराव दत्तक अ० पा० गोपाळराव बळीराम देश नींबेकर यांस:—

रामकृष्ण बाळाजी ओक वकील आकोला याजकडून नोटीस देण्यांत येते कीं—

आमचे पक्षकार लाडीबाई जवजे मीस-रीचंद गुजराथी रा. बाळापूर याना तुह्मी वऱ्हाडसमाचारचे अंकातून ता. १७।६।१२ रोजीं नोटीस दिली ती पावली तींचे उत्तर आमचे पक्षकारानें देण्यास सांगितले आहे तेः—

गहाणदार त्रींबकराव बापूजी देशमुख नींबेकर याचे व आमचे असें ठरले आहे कीं गहाणाचे रुपये ३ वर्षानंतर द्यावे मध्यंतरी देऊं नये दिल्यास तीन वर्षाचे व्याज भरून द्यावे. असें गहाणदार यांनीं कबूल केले आहे. करितां तुह्मांस रुपये देणे असल्यास ऐन रुपये १५०० दस्ता-ऐवजाचे शर्ती प्रमाणें व्याज जे होईल ते वर्षे ३ चे हें तुह्मी आह्मांस आणून द्यावे याप्रमाणें तुह्मी न केल्यास आह्मी कोण त्याही प्रकारे जबाबदार नाहीं कळावें.

ता. २७-६-१२ इ.

सही

R. B. Oke
Pleader

नो. नं. ३७१

## नोटीस

सर्व लोकांस या नोटीशीनें कळविण्यात येतें कीं कजबे फत्तेखेर्डा ता० मेहकर जि० बुल्ढाणा येथें गोंविंदसा विष्णूसा आणि कंपनी या नांवाची जिनिंग फ्याक्टरी आहे. त्या फ्याक्टरींत एक बायलर एक एंजिन व २० रेचे आहेत. हें सर्व यांत्रिक सामान व ज्या इमारतींत ही सर्व यंत्रे आहेत ती इमारत व त्याशिवाय स्टोअर रुममध्यें वरील फ्याक्टरीचे उपयो-गाचे व कांहीं जूनें सामान आहे तें व शिवाय स्टोअर रुमची इमारत ही सर्व जाहिर लिलावानें ता० ११-८-१२ रोजीं दुपारीं ११॥ व १२ वाजतां याचे दरम्यान जागेवर फत्तेखेर्डा येथें विकावयाची आहेत. मशीनरी सर्व दुरुस्त असून उत्तम काम देण्यासारखी आहे. करितां ज्याची ही फ्याक्टरी विकत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहु ११-७-१२ रोजीं हरासाचे वेळीं हजर रहावे. सर्व जिनिंग फ्याक्टरीची अंदाजा किंमत १६००० पासून २०००० रुपयेपर्यंत आहे. लिलाव तीनवार पुकारल्या बरोबर रक्कम नगदी दिली पाहिजे; त्या प्रमाणें न दिल्यास फ्याक्टरीचा पुनः फेर लिलाव होईल व त्यामुळें नुकसान आल्यास पैसे न भरलेल्या खरेदीदारांस द्यावे लागेल. ता० १०-६-१२

A. R. pimprikar
Receiver appointed
by the Ditrict gudge
AKOLA.

नो० नं० ३३०

# नकली औषधानें फसूं नका.

डाक्टर चांदलीआ कृत प्रसिद्ध झालेलीं औषधें

नपुसकत्व, नामर्दाई व नेभळेपणाची समुळ नाश करून तारुण्यदशेची

छटा फमटवून पूर्ण तरतरी व जोम आणणारी

## "बादशाही याकुती"

(सरकारी रजीस्टरन. २२० आहे)

ही "याकुती" आजकाल कमताकत झालेल्या दुनियेला एक इश्वरी प्रसादच आहे. शिथिल झालेल्या शिरांना जोमदार बनविण्यांत, गेलेली स्मरण शक्ति परत भरपूर सजीव करण्यांत, अविचारानें धातुपात केल्यामुळें लहान वयांतच दिसणारी म्हातारपणाची सर्व चिन्हें दूर करण्यांत, स्वप्नावस्था व लघवींतून जाणारी धातु बंद करण्यांत, विर्य वाहिन्यांना भरपूर विर्य पुरविण्यांत "बादशाही याकुती" ह्मणजे एक अमृत आहे. किं. डबी १ ची रु. १०

### कमजोरीवर रामबाण "मदनमित्रलेप"

बाल्यवस्थेंत अविचारानें केलेला धातुपात शिथिलता ह्यांच्याकरितां तर हा लेप जणु काय अमूल्य रत्न व रामबाण उपाय होय. किं. डबी १ ची रु. २

### पू परम्यावर वस्ताद "प्रमेहान्तक"

जुन्या अथवा नव्या कोणत्याही प्रकारच्या हट्टी पू परम्यावर हें औषध थोड्या दिवसांत हटकून कायमचा गुण देणारा उपाय ह्याचा लागतो कि. बा. १ चे रु. ३

पत्ता:-- चांदलीआ आणि कंपनी काळंका देवी रोड मुंबई.

नो. नं. ३३१



# जाहीरात.

### !!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेउन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धशिशि, डोकें दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबात नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडें न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे

डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बाळबोध लिहींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाण:—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास

नो. नं. ३०७


## नोटीस

नोटीस – बेशमी नथु वल्द पुर्णजी कोळीं रा० मौजे लोहितखेड ता० दर्यापूर जि० उमरावती पो० रामतीर्थ यांस:–

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्माला दिवाणी व फौजदारी मुलकी कामे चालविण्याबद्दल कुल मुखत्यारपत्र दिलें होतें त्याप्रमाणें तुह्मी माझें मनाप्रमाणें कामे केली नाहींत व मी बायकोची जात असल्यामुळें मला कांहींतरीं सबबी सांगून तुह्मी आजपर्यंत मजपासून तनका चुकती नेली तुह्मी माझे कामे बरोबर केली नाहींत व माझे मनाविरुद्ध कामे केली. मला नकळत असाम्याकडुन पैसे वसूल करून खाल्ले व आणखीही वहुतेक कामांत घोटाळा केला याजकरितां तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं नोटीस पावल्या पासून तुह्मी माझे वती कोणतेही काम करूनये मी तुमचे मुखत्यार पत्र रद्द केलें आहे तुह्मी माझे कामे केल्यास त्याज बद्दल मी जबाबदार राहणार नाहीं. व माझे कागद पत्र जे तुमचे पाशीं आहेत ते मला समजून परत करावे व मला तुमचे कडून रोख्या वरुन रुपये १०० घेणें आहेत ते द्यावेत व तुह्मी असामिजवळून मला न कळता रुपये २७० खोवून ते आपले उपयोगास लावले ते रुपये आणून घ्यावे तसे न केल्यास मी तुमचेवर रितीप्रमाणें काम चालविन ही नोटीस दिली आहे. ता० २६-६-१२

सही.

नि. भगवान वल्द किसन आणि मोती व देवराव अ० आई येशवदा मर्द किसन इचे असे

नो० नं० ३६३

## नोटीस

बेशमी तुळसी मर्द जयराम कुणबी रा० तुलंग ता० बाळापूर इस––

खालीं सही करणार जयराम वा। कृष्णाजी कुणबी रा० चेलक यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं ता० १७।६।१२ ई० चे वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटीस दिली ती कांहीं अंशी खोटी आहे मी तुला वागविण्यास तयार आहे मला रक्तपित्ति नसून फक्त मेहाचा रोग आहे करितां त्याची औषधी घेणें सुरूं आहे. व तो रोग रुपयांत चार आणे राहिला आहे. सरासरी ३।४ महिन्यांत जाईल. लोकांचे सांगण्यावरून रक्तपीति आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं मी तुला दुसरा घरठाव करण्याकरितां परवानगी मुळींच देत नाहीं. कारण मला रोग मुळींच नाहीं. तूं जेव्हां आपले आईचे घरीं गेलीस तेव्हांपासून आजपर्यंत खाण्यास पुरविले. दंगाधोका मुळींच करीत नाहीं. तूं वाईट लोकांचे नादीं लागून माझा संसार न व्हावा या हेतुनें कांहीं तरी लिहून पाठविलें. तुला असें करणें बरोबर नाहीं तरी ही नोटीस पावल्यापासून १ महिन्याचें आंत अंगावरील तुजजवळ असलेले दागीनें रु० ५०० पांचशें व सोन्याची मुदी १ तोळ्याची असे घेऊन माझे घरीं मुलीसह येऊन राहांवे व जिनगी सांभाळावी. जर असे करण्यास चुकशील तर रीतीप्रमाणें तुजवर काम चालवून नोटीशीचें खर्चासुद्धां तुजला ताब्यांत घेईल. व दुसरा घरठाव केल्यास फौजदारींत काम चालविन. ही नोटीस दिली कळावें. ता० २८।६।१२ इ०

सही

जयराम वा। कृष्णाजी नि० खु० रा० चेलक ता० आकोला.

नो० नं० ३६४

## नोटीस

नोटीस बेशमी कन्हया उर्फ बनशी कनोजे ब्राह्मण रा० बाळापूर

यांस:—

खालीं सही करणार नारायण आपा खंडाआपा वाणी दुकान बाळापुर याजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा मुलगा नामे गोविंदा हा अजमास सोळा वर्षाचे उमरीचा असून तो अगदीं नासमज आहे. त्याजला माझे वैऱ्यांनीं आपलासा करून घेऊन मजला बुडविण्याचें इरादानें कांहीं एक पैसा नघेता तुह्मास त्याजकडून रु० १०० ची प्रामेसरी नोट लिहून दिली आहे. असे माझें ऐकण्यांत आले आहे त्या नोटीशीवरून मी किंवा या अज्ञानाची जिनगीं कोणतेही तऱ्हेनें बांधली जात नाहीं अज्ञान अवस्थेंत केलेला व्यवहार कायद्यानें अज्ञानास किंवा त्याचे जिनगीस मुळींच बांधु शकणार नाहीं. त्याची अशी जिनगी कांहींच नाहीं. तुह्मी त्यास असा फसवून त्याजकडून मोबदला न देतांना रु० १०० ची प्रामेसरी नोट करून घेतली ती नोट रद्द करून आठ दिवसांत आह्मास आणून द्यावी. तसें न केल्यास तुमचेवर अज्ञानत्वाचा कायदा घेऊन माझे मुलास फसविल्या बद्दलची मी फौजदारींत फिर्याद दाखल करीन. तो प्रसंग येऊ नये ह्मणून तुह्मांस अगाऊ सूचनार्थ कळविले आहे कळावें- ता० २८ माहे जून सन १९१२

सही

नारायणआप्पा खंडाप्पा वाणी द० खु०

नो० नं० ३६५

## जाहिर खबर.

सर्वत्र साहुसावकार व इतर लोक यांस कळविण्यांत येते कीं मी खालीं सही करणार यानीं कनीराम वा। गोरसी वंजारी राहणार धांवड ता० मंगरूळपीर यांस ता० १९-३-१२ इ. रोजीं कुलमुखत्यारपत्र दिलें होतें परंतु तो आमच्या मनाप्रमाणें काम करीत नाहीं शिवाय त्याजवर कांहीं सरकारी काम चालून हल्लीं तो आकोला जेलमध्यें आहे. करितां त्यास दिलेलें मुखत्यारपत्र या जाहिर नोटिशीनें रद्द केलें आहे करितां यापुढे मदरहु कनीराम वंजारी याच्याशी आमच्याबद्दल मुळींच कोणी कोणताही व्यवहार अगर देवघेव करूं नये. व जर करील तर तीचे जबाबदार आह्मी राहणार नाहीं. कळावें ता० २७-६-१२ इ.

सही

तुकाराम तात्या देशमुख राहणार धांवड ता० मंगरूळपीर

नो० नं० ३६६

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

## सौंदर्य

### आरोग्य

#### थोडा खर्च

**जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.**

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात, पृष्ठांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपित्त, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, अंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

**तर स्वतःचाच राजवैद्य बनून**

रोग नष्ट करणें बरें नव्हे काय?

**डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—**

# आयोडाईझड सार्सापरीलानें

**ते निखालस बरे होतात.**

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

**अनुभवतर पहा.**

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तम गुणास ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

---

## बालामृत हे काय आहे?

**अस्सल बालामृत हें**

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगांवर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, दाईट दुवानें होणारे रोग, कंडू, आंकडी वगैरे.

डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें.

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

रू. ०१२ आणें पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ता:--हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नो. नं. २८७

---

# इराणी बल

मोटारगाडी अटकावितां येते (जोर) साखळदंड तोंडितां येतो!

**इनाम रुपये ५०० !! इनाम रुपय ५०० !**

प्राचीन इराणच्या रुस्तम व अस्पाद यार वगैरे बहादुर पहिलवानांची शक्ती ज्या योगानें जगविख्यात झाली तीं औषधें आह्मी हजारों मेलावरून आणलेलीं आहेत. गंधक सोडा दोन वस्तूंचे कुशलतेनें समिश्रण केलें ह्मणजे ज्याप्रमाणें फुलपावर दारू (Gun Powder) बनते त्याप्रमाणें सालममिश्री, दाक्षें, बदाम, पिस्ते, डाळिंब, सफरचंद वगैरे अत्यंत शक्तीवर्धक पदार्थांचें सत्व आह्मी शास्त्रीयरीत्या यंत्रानें बनविलेलें आहे. या पांच सात मेव्याच्या कुशल सामिश्रणानें विद्युतशक्ती व जोर इतका उत्पन्न होतो कीं कसाही कमताकद मनुष्य असला तरी त्यांस तीन दिवसांत शक्ती येऊं लागते दहा बारा दिवस हे खाल्यावर चेहऱ्यावर लाली चढूं लागते व गेलेली ताकद पुन्हां येते. याच्या योगानें धातुपुष्टीहि होते. वृद्ध तरुण, स्त्री पुरुष या सर्वांस ही फायदा देणारी व मजेदार वस्तू आहे दोन महिनें आमच्या सांगण्याप्रमाणें जर याचे सेवन झालें तर मनुष्य मोटारगाडी अडवूं शकेल व साखळदंड तोडूं शकेल खात्री पटविण्याकारितां हा जगविख्यात पठ्ठांचा मेवा आह्मीं समक्ष तीन दिवस फुकट खावयास देऊं या आमच्या मेव्यांत तांबे, पारा रुप्याचा भाग वगैरे रासायनिक द्रव्यें आहेत असें जो कोणी सिद्ध करील त्यास ५०० रुपये बक्षीस देऊं किंमत एक तोळ्याची २॥ रुपये हें पंधरा दिवस पुरतें. ॥. अर्धा रुपये १।=

**बादशांही गोळीः—**

१ गोळी खाल्यानें टिकाव व ताकद माहीती पडतेः— किंमत १॥ रु. एक डझनची

## इराणी मर्दानी पट्टी.

या एकट्या पट्टीच्या योगानें मुंबईत हजारों माणसांचा फायदा झाला आहे. ज्या माणसाच्या (नसामर्ध्ये) ताकद नाहीं. त्या माणसानें ही पट्टी सहा सात दिवस बांधली ह्मणजे त्यास जवान मनुष्याप्रमाणें ताकद येते. यापासून आग होत नाहीं किंवा फोड येत नाहीं जर कोणास या औषधाबद्दल भरवसा नसेल तर आह्मी कान्ट्रक्ट करून हें औषध पैसा घेतल्याशिवाय त्यास देऊं गुण आल्यावर पट्टीची किंमत व बक्षिस निराळें घेऊं किं. १० पटिची रु० ९ व पांच पट्टीची किं० रु. ३

---

खानदानी हकीम सय्यद जाफर हुसेन तबरीजी (इराण जाफरी दवाखाना जे जे. इस्पितलचे समोर जितेकराच्या नव्या बिल्डिंगच्या पहिला माळा, मुंबई जाफरी दवाखान्यांत. नो० नं०१९७

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल मुनवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .. .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला 'प्रांतवऱ्हाड' नो. नं. १३

---

# Oriental Govrnment se curi LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connectioi with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in termes the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live. and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety ce the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआप्पांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered N...

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला-- सोमवार तारीख १५ माहे जुलई सन १९१२ ई० [ अंक २८

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठद्वें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजार.वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट.
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{3}{4}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट.
नो० नं० २

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकाले

## निराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कमा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें. व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगानियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ अकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें पूर्व स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

### पाऊस पाऊस !!

आजकाल जिकडे तिकडे पाण्याची ओरड आहे. मेघराजाची केव्हां कृपा होईल इकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे. विहिरी तळावांचें पाणी अगदीं तळाला लागले. एक एक मोट ओढतांना जनावरांचे प्राण कासावीस होत आहेत. अशा बिकट प्रसंगांतून बचावण्यास जर तुह्मास एकादा सोपा मार्ग पाहिजे असेल तर आमचीं **मोटेचीं लोखंडीं चाकें** वापरून पहा. अनुभवा शिवाय त्यांची योग्यतां समजणार नाहीं. आज एका चाकाबद्दल मागणी करा. जास्त माहितीबद्दल क्याटलॉग मागवा.

**किर्लोस्करबंधु.**
**पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).**

ना० नं० ३४९

### नोटीस

रा० रा० मारोती वा। चाहादु जात तेली आडनांव जावरे रा० मलकापुर जि० बुलडाणा यांसः-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा मुलगा आहेस. आणि तूं वाइट चालीचा निघाला आहे. व माझे आइबापांनीं माझ्या नावानें त्याचे स्वतःचें करून दिले आहे. त्याच्यावर तुझा हक्क नांहीं व तूं रांड ठेवलेली आहे तिच्या करितां तूं माझ्या नावानें असलेल्या जिनगीवर कोणाचे कर्ज व खरेदी गहाण, अगर बक्षीस देऊं नये दिल्यास ते रद्द समजलें जाईल व मी व माझी जीनगी तुझ्या कर्जास जबाबदार नाहीं. कळावें. ता० ८-७-१९१२ इ०

सही.
सीताबाई मर्द चाहादु तेली राहणार मलकापुर नि० बांगडी
नों० नं० ३७२

### नोटीस

नोटीस बेशमी पापन्ना वा। बालय्या रा० मुंबई भायखळा यांस--

मी खालीं सही करणार नोटीस देते कीं माझे तुमच्याशीं लग्न तारीख ३।४।१९०९ इ. रोजीं झाल्यापासून आजपर्यंत मी आपले भरंवशावर राहिले परंतु आतां कळविण्यांत येते कीं माझे व तुमचे नवराबायकोचे नाते राहिले नाहीं. व मी माझी मनाची मुखत्यार झाली आहे. कळावें तारीख २।७।१९१२

सही
सोमम्मा इचे हातची नि० बांगडी
असे रा० धामणगांव रेलवे
नो० नं० ३७३

### नोटीस

नोटीस बेशमी तुळसीराम वल्द लक्ष्मण लाहानें रा० मौजे पिंपळगांवउंडा प्र० फत्तेखेर्डा ता० मेहकर जि० बुलडाणे यांसी-

नोटीस देणार नरबदी बापाचे नांव गंगाराम सवडदकर रा० मौजे कासारखेड प्र० फत्तेखेर्डे ता० मेहकर जि० बुलडाणे नोटीस देते कीं तुझें माझेसी सुमारे ९ वर्षें झाली गंधर्व लाविलें होतें व मी तुझे घरी नांदत असतां तूं मजवर विष घातल्याचा आरोप करून मजवर पोलिसमार्फत मुकदमा केला होता त्यावेळीं माजिस्ट्रेट कोर्टात मी सुटले असतां तूं आपल्या खुषीनें चार पचांत तुझी आपला गंधर्वाचे संबंधानें नवरेपणाचा हक्क सोडून देऊन माझे अंगावरील लुगडेचोळी व डागडागिने व काळी पोथीसुद्धां घेऊन सर्व हक्क सोडला. त्यानंतर दुसरी बायको करून तिचेसी संसार करीत आहा त्या दिवसापासून मी आपले आईबापाचें घरीं राहून निर्वाह करीत आहे दुसरा घरठाव मजला करणें आहे परंतु लेखी फारकती शिवाय कोणी गंधर्व लावण्यास धजत नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्या दिवसापासून १९ दिवसांत तूं येऊन व मेहकर येथें चालून फारकती करून द्यावी त्यास लागणारा खर्च मी लावण्यास तयार आहे वरील मुदतींत या प्रमाणें न केल्यास हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन तुझी कोणतीच तकरार मग चालणार नाहीं करितां अगाऊ नोटिशीनें कळविले आहे. कळावें तारीख २९।६।१२ इ.

सही
नि० नरबदी बापाचे नांव गंगाराम
इची असे
नो० नं० ३७४

वऱ्हाडसमाचार.

आषाढ शुद्ध १ शके १८३४ परिधावी

## पुढें काय होणार ?

नवें साल सुरू होण्याचे वेळीं हिशेबाच्या चोपड्यांवरून आपल्या सांपत्तिक स्थितीचें परीक्षण करण्याची व्यापारी लोकांची वहिवाट आहे. असें आत्मपरीक्षण प्रत्येक व्यक्तीनें आणि समाजानें वेळोवेळीं करून धर्माच्या आणि नीतीच्या मार्गांतल्या आपल्या प्रगतीचें मोजमाप काढून आपण धार्मिक व नीतिदृष्ट्या भरभराटत आहों किंवा दिवाळखोर बनत आलों आहों हें ठरविणें अत्यंत अगत्याचें आहे. पण पुष्कळांना आत्मपरीक्षण करण्याचा कंटाळा असतो आणि डोळे झाकून चालण्यांतच आनंद वाटतो. खावें, प्यावें, देव देईल तेवढें आयुष्यांतलें सुख भोगावें, आणि भविष्याबद्दल बेफिकिर राहावें हें तत्त्व उराशीं बाळगून ते वर्तन करीत असतात. कित्येक समाजही शतकानुशतकें याच पद्धतीनें आपल्या आयुष्याचे दिवस ढकलीत असतात. आज आमचा हिंदुसमाज हेंच करीत आहे. पण खरोखर आत्मपरीक्षण हें हिंदुधर्माच्या मुख्य तत्त्वांपैकीं एक तत्त्व आहे ही गोष्ट आमचा समाज अजीबात विसरत चालला आहे. हिंदुधर्मशास्त्रांनीं ‘ऋणं कृत्वा घृतं पिब’ या तत्त्वाचा पूर्णपणें निषेधच केला आहे. धर्मपरता हा आमच्या शास्त्रकारांचा मुख्य उपदेश आहे. सुखोपभोगाची लालसा वाढविणें ही गोष्ट त्यांनीं निषिद्ध मानली आहे आणि त्याचें कारण उघड आहे. ही लालसा उत्तेजन न देतां ही इतकी आपेआप वाढते कीं तिच्यापासून हानि निश्चयेंकरून होते. ती हानि व्यक्तीची असो अगर समाजाची असो. मग तिला उत्तेजन दिल्यावर ती किती अनावर होईल व काय काय अनर्थ करील याचा नेम कोणी सांगावा ? पण हिंदुशास्त्रकारांची ही दूरदृष्टि आतां ह्या समाजांत दिसते काय ? हल्लीं जो पहावा तो सुखाच्या लालसेनें वेडावून गेलेला आहे. जो तो ऐहिक सुखाच्या लाभासाठीं दुसऱ्याशीं स्पर्धा करीत आहे. याचा परिणाम काय होणार व हिंदुसमाजाचें पुढें काय होणार याकडे विद्वानही लक्ष देत नाहींत व अविद्वानांविषयीं तर बोलावयालाच नको अशा स्थितींत आमच्याच देशबांधवांपैकीं एक मि. हरदयाळ–यांनीं सावधगिरीचा बिगुल फुंकलेला पाहून आह्मांस संतोष वाटतो. मि० हरदयाळ हे विद्वान आहेत. इंग्लंड, व अमेरिका या देशांतून त्यांनीं प्रवास केला आहे पण इतर पुष्कळ लोकांप्रमाणें त्यांनीं हा प्रवास डोळे मिटून केलेला नाहीं. ते काय ह्मणतात पहा. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं पाश्चात्य राष्ट्रांतून सुखाची लालसा जी मनस्वी वाढली आहे व ती तृप्त करण्यासाठीं व्यापार, कला, यंत्रसामुग्री, वगैरे साधनांची वृद्धि करण्यासाठीं लोक रात्रंदिवस धडपडत आहे, पण त्यापासून खऱ्या सुखाचा लाभ तर त्यांना होत नाहींच, उलट तें त्यांच्यापासून दूर दूर पळत आहे. तेच आमचे पूर्वज पहा ! शांतिसुख त्यांना केवढें लाभत होतें ! जसजसा त्याग ज्यास्त तसतशी मनाची शांति ज्यास्त पूर्वींचे ऋषि त्यागशील होते ह्मणून सर्व सुखाचा ठेवा शांतिब्रह्म--तें त्यांच्या अधीन असे. व्यवहार हा कोणाला सुटलेला नाहीं व तो सोडूनही चालावयाचें नाहीं. पण हा व्यवहार त्यागयुक्त पाहिजे. व्यवहार केला तरी तो आपमतलबाच्याच केवळ दृष्टीनें नसावा. त्यांतही धर्म, नीति, सारासार बुद्धि, त्याग, आणि परोपकार यांविषयींची दृष्टि कायम ठेवून तो केला पाहिजे. हल्लींच्या सारख्या व्यापाऱ्यांतल्या लबाड्या, धंद्यांतल्या लबाड्या, कोणाची चाकरी करणें झाली तरी तींत अंगचोरपणा व बेइमानी. आपल्या शेजाऱ्याशीं अनुदारवर्तन, त्याची जमीन आपल्या कबज्यांत कशी येईल, दुसऱ्याचें अन्यायानें आपणांस कसें लुबाडतां येईल ही दृष्टि त्याकाळीं नव्हती. ह्मणजे प्राधान्यें करून नव्हती. त्यामुळें आमचा समाज दीर्घकालपर्यंत टिकला. प्रामाणिकतेनें आणि सरळपणानें राहिल्यानें जातिद्वेष आपोआप नाहींसे होतात, शत्रुही मित्र होतात, आणि शांतिसुखाचा अमोल लाभ अनुभवता येतो. ह्मणूनच या गुणावर हिंदुधर्मशास्त्रकारांनीं विशेष जोर दिला आहे. ह्मणूनच हे गुण अधिक अंशांनीं अंगीं असलेल्या ऋषींच्या पुढें प्राचीन काळचे महाप्रतापशाली क्षत्रिय राजे महाराजे आपलीं शिरकमलें वाकवीत असत. ह्मणूनच ब्राह्मणांना वर्णगुरु हें नांव शोभत होतें. पण आज हिंदुसमाजांत या गुणांनीं विशिष्ट असा एक तरी वर्ग आहे काय ? शहाणे मूर्ख, लहानथोर, सगळेच धनाच्या, सुखप्राप्तीच्या, मार्गे लागलेले ! असा समाज ध्वंसोन्मुख झाला तर काय नवल आहे ? देशबंधुहो, या गोष्टीचा कांहीं विचार करा आणि आमच्या हिंदुसमाजाचें पुढें काय होणार आहे या दृष्टीनें थोडेंसें तरी आत्मपरीक्षण वेळोवेळीं करीत जा.

---

## इराणच्या स्त्रिया.

थोड्या दिवसांपूर्वीं इराणांत इग्रजांच्या वतीनें वकील ह्मणून असलेले मि० शूस्टर यांनीं विलायतेंतल्या सेंचुरी म्यागझीन नामक मासिक पुस्तकांत तेथील स्त्रियांसंबंधानें प्रत्यक्ष पाहिलेल्या व अनुभवलेल्या ज्या अनेक गोष्टी लिहिल्या आहेत त्या जर खऱ्या असतील ह्मणजे पूर्वग्रहांमुळें त्यांची दृष्टि विकृत झाली नसेल तर इराणच्या स्त्रियांमध्यें अलौकिक अशा जागृति उत्पन्न झाली आहे असें खास ह्मटलें पाहिजे. रुसो-जपानी युद्धाचेवेळीं जपानी बायकांच्या अप्रतिम औदार्याच्या, धाडसाच्या व देशाभिमानाच्या गोष्टी आह्मी ऐकत होतों तशाच प्रकारच्या या गोष्टी आहेत. देशाच्या हितापुढें आपलें वैयक्तिक सुख किंवा संसारसुख तुच्छ मानणें, देशाशीं द्रोह करूं पाहणाऱ्या किंवा भ्याडपणानें देशाहिताला विरोध करणाऱ्या प्रत्यक्ष आपल्या पतीला सुद्धां ठार मारण्यास प्रवृत्त होणें, प्रधानमंडळाला ताळ्यावर आणण्यासाठीं प्रसंगविशेषीं स्त्रीजनोचित मर्यादेला बाजूला ठेवून धीटपणानें राजसभेंत जाऊन सत्याचा व न्यायाचा पक्ष उचलून धरणें, देशहितापुढें केवढाही स्वार्थ असला तरी तो तुच्छ मानणें, अशा गोष्टी खरा देशाभिमान, खरा सत्याभिमान व खरी कळकळ यांची ज्योत अंतःकरणांत पेटल्यावांचून घडत नाहींत. इराणांतल्या स्त्रिया गोषांत राहणाऱ्या आहेत असें ह्मणून त्यांची हेटाळणी करणाऱ्या पाश्चात्य समाजाला ही हकीकत वाचून काय वाटेल ? तो ही शुद्ध काल्पनिक कादंबरी आहे असें ह्मणून तिची अवहेलना करील- पण वस्तुस्थिति लपून राहील काय ? जपानी-इराणी स्त्रियांची ही उज्ज्वल कथा झाली. चिनी स्त्रियांविषयीं ही अशाच कथा लवकर ऐकूं येतील अशा विषयीं लोकांचे कान आतुर होणें साहाजिक आहे. एशिया खंडांतल्या अशा एकेक राष्ट्राची जागृति होत गेलेली ऐकून कोणा हिंदी माणसाला आनंद होणार नाहीं !

---

## महामहोपाध्यायांची संभावना.

गेल्या दिल्लीदरबारच्यावेळीं सरकाराकडून असें जाहिर करण्यांत आलें होतें कीं ज्यांना महामहोपाध्याय व शमसुल उल्मा असे किताब देण्यांत आले आहेत त्यांचीं आपल्या पूर्वापार चालत आलेल्या प्राच्य चालीप्रमाणें इंग्रज सरकारही थोडींफार वर्षासनें देऊन संभावना करणार आहे. पुढें असें कळलें कीं हें वर्षासन प्रत्येकीं शंभर रुपये ठरलें आहे. महामहोपाध्यायांची विद्वत्ता, योग्यता व सरकारचें ऐश्वर्य यांचा विचार करतां ही संभावनेची रक्कम अगदींच थोडी आहे ही निदान पांचपट तरी असावयाला पाहिजे अशी ही टीका वर्तमानपत्रांतून झाली. पण आतां कलकत्त्याचें एक पत्र ह्मणतें कीं अहो कोठलें आलें आहे शंभर रुपयांचें वर्षासन ! शंभर सुद्धां नाहींत, सरकार या विद्वानांची संभावना पंनास रुपयांतच करूं पाहत आहे ! या बातमींत कितीसें तथ्य आहे हें आह्मांस ठाऊक नाहीं. पण ती खरी असेल तर वाईट व सरकारच्या कीर्तींत भर टाकणारी नाहीं असें कोणी ही ह्मणेल. महामहोपाध्यायांना आजपर्यंत कांहींच दक्षिणा मिळत नव्हती. आतां शंभर राहिले पण पंनास तरी मिळतील या दृष्टीनें आणि ‘सर्वनाशे समुत्पन्ने ऽर्धं त्यजति पंडितः, या वचनाप्रमाणें हे पंडित आणखी अर्ध्याचा त्याग करण्याला सुद्धां तयार होतील, पण हा दात्याच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. त्यांनीं या गोष्टीचा विचार करावयास पाहिजे.

---

## मि० स्मटस् यांची स्पष्टोक्ति.

नाताळांतल्या हिंदी लोकांच्या वतीनें वर्तमानपत्र इंडियन ओपिनियन हें आहे. या पत्राच्या ता० ८ जूनच्या अंकांत दक्षिण आफ्रिकेंतल्या इमिग्रेशन बिला संबंधानें बोलतांना मि० स्मटस यांनीं केलेली स्पष्टोक्ति दिली आहे. तिच्यावरून पा[…] आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांना तेथें अज्ञानांत होते कडुन अधिक चांगल्या प्रकारें वागविण्यांत येईल अशी आशा करण्यास आतां बिलकुल जागा राहिलेली दिसत नाहीं. मि० स्मटस हे सदर बिल तेथील पार्लमेंटांत आणतांना ह्मणाले कीं दक्षिण आफ्रिकेंतील सरकारच्या विरुद्ध हिंदी लोकांनीं मोठा गवगवा करून इंडिया आफिस आणि ब्रिटिश सरकार यांचेंही मत अनुकूळ करून घेतलें आहे. त्यांचें असें ह्मणणें आहे कीं प्रत्यक्ष व्यवहारांत तुह्मी आह्मांस कसेंही वागविलें तरी निदान कायद्यांत तरी हिंदी लोकांना गोऱ्यांहून कमी लेखण्याचें कलम घालूं नका. या हिंदी लोकांनीं कायदे करणारांना मोठ्या अडचणींत घातलें आहे. कारण बाहेरचे गोरे लोक दक्षिण आफ्रिकेंत आलेले चालतील, पण काळे लोक नकोत, उलट जे आहेत त्यांनाच बाहेर घालवावयाचे हा तर सरकारचा उद्देश आहे. तेव्हां गोऱ्यांना आंत सोडावयाचें, आणि काळ्यांना बाहेर घालवावयाचें, आणि हें कायद्याच्या शद्बांत कोठें असमतेचें चिन्ह न दिसूं देतां कसें करावें हा आमच्या पुढें प्रश्न आहे! मि० स्मटस यांच्या स्पष्टोक्तीवरून दक्षिण आफ्रिकेंतल्या राज्यकर्त्यांचा उद्देश स्पष्ट होतो इतकेंच नाहीं तर हा उद्देश उघडपणें जाहिर करण्या इतकें धाडस तेथील अधिकाऱ्यांचे अंगीं आलेलें आहे हेंही त्यावरून व्यक्त होतें. आतां या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागण्याची आशा सोडूनच दिली पाहिजे हें उघड आहे. अखेरचा उपाय ह्मणून फार तर आतां येवढें करावें कीं इतके दिवस अर्ज वगैरे केले ते ब्रिटिश प्रधान मंडळाला केले. आतां खुद्द बादशहांचे चरणीं राजनिष्ठ हिंदीप्रजेचा अर्ज सादर करून खुद्द बादशहांकडून न्यायाच्यावतीनें आफ्रिकन सरकारला दोन उपदेशाच्या गोष्टी ऐकाविण्याचा यत्न करवा. राजाच्या शद्बाला तरी दक्षिण आफ्रिकेंतलें सरकार कितीसा मान देतें तें एकदां पहावें, नाहींतर शेवटीं नाद सोडावा, आणि दक्षिण आफ्रिकेचें द्वार हिंदी लोकांना कायमचें बंद झालें असें समजून स्वस्थ बसावें. दुसरें काय करणार? या संबंधांत विचार करण्यासाठीं मुंबईस लवकरच एक जाहिर सभा भरणार आहे असें ऐकतों तेथें काय ठरतें तें पहावें.

---

## कानड्यांतले हिंदु लोक

दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांचे होत असलेले अवर्णनीय हाल व अपेष्टा जगविश्रुत आहेतच. अशा वेळीं अमेरिकेंत कानडा देशांतही तोच प्रकार दिसून यावा ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. हा देशही इंग्रज वसाहत वाल्यांचा असून ब्रिटिश साम्राज्याखालीं आहे. त्या देशांत कोणाही हिंदी माणसाला जाऊं देत नाहींत. जपानी, चिनी वगैरे लोक गेले तर हरकत नाहीं, पण हिंदी मनुष्य गेला कीं त्याला मज्जाव! कोणी रामचंद्र नांवाचा विद्यार्थी तेथे शिकण्यास राहिला होता- तो कांहीं दिवस स्वदेशास येऊन परत गेला तेव्हां त्याला त्या देशाच्या किनाऱ्यावर पाय

दिला नाहीं. गेल्या एप्रिल महिन्यांत देशांत अगोदरच राहत असलेल्या दो-कियांना एकाएकीं कारण न सांगता हद्दपार करण्यांत आलें, आणि त्यांच्या पती-पासून व कोवळ्या अर्भकांपासून त्यांची ताटातूट न करण्या संबंधानें वरिष्ट सरका-राकडे अर्ज वगैरे करण्याची ही संधि न देतां त्यांना एकदम हांगकांग येथें पाठवून देण्याची तयारी करण्यांत आली होती. सुदैवानें तेथील वरिष्ट अंमलदारांना त्यांची दया येऊन त्यांनीं तो हुकूम रद्द केला. कानडाचे माजी प्रधान सर विलफ्रेड लॅरि-एर यांनींही गतवर्षी एका बाईवर अ-शीच मेहेरनजर करून तिची मुक्तता केली होती. अशीं उदाहरणें अपवादा दाखलच होत. हिंदी लोकांना मज्जाव हा मात्र सा-धारण नियम होऊन बसला आहे. हिंदी लोकांनीं अर्ज, विनवण्या वगैरे पुष्कळ केल्या, पण कोण ऐकतो?

## उद्योग धंद्याचें नवें क्षेत्र

चोहींकडे असा मज्जाव झाला तर हिं-दी मजुरांनीं व धंदेवाल्यांनीं जावें तरी कोठें? असा प्रश्न साहजिकच उभा राहतो. या प्रश्नाचें थोडेंसें समाधानकारक उत्तर आर्जेंटाइन येथें गेलेल्या एका गृहस्थानें दिलें आहे तें येथें देतों. तो ह्मणतो कीं आर्जेंटिना येथें हिंदी लोकांनीं यावें. आ-र्जेंटिना हें एक प्रजासत्ताक राज्य असून तेथें काळा गोरा असा वर्णभेद मुळींच नाहीं शिवाय हा देश सुपीक असून या ठिका-णीं रेल्वेची सडक नवीनच होत असल्या-मुळें मजुरांची व आगगाड्यावर लागणाऱ्या ड्रायव्हर वगैरे लोकांची मोठी वाण आहे. थोड्याशा भांडवलावर कोणालाही तेथें चां-गला उद्योग धंदा करतां येईल. तेथील शेतकी खात्याचे अधिकारी हे सुस्वभावाचे असून हिंदी लोकांविषयीं त्यांचें ठायीं स-हानुभूती आहे. या प्रांतांत सध्या मजुरां-ची इतकी वाण आहे कीं चांगल्या म-जुरास रोजी ४ पासून २ डालर ह्मणजे १२ पासून १५ रुपये पर्यंत मजुरी मि-ळूं शकते. ही स्थिती आणखी कांहीं दि-वसांनीं राहणार नाहीं. पण काल अनुकू-ल आहे तोंपर्यंत हिंदी मजुरांनीं त्याचा फायदा अवश्य करून घ्यावा अशी त्याची सूचना आहे.

## यंदाच्या कांग्रेसचे अध्यक्ष

येत्या डिसेंबरांत पाटणा येथें भरणाऱ्या कांग्रेसचे अध्यक्ष कोणास निवडावें या वि-षयीं आतां पासून चर्चेला सुरुवात झाली आहे. बंगालच्या कमिटीनें ना. रा. ब. मु-धोळकर' मि० दाजी आबाजी खरे, ना. गोखले, व ना. भूपेंद्रनाथ बसु यांचीं नांवें सुचविलीं आहेत. बहारच्या कांग्रेस कमिटीतर्फे मि० रॅमसे मॅकडोनल्ड यांना अध्यक्ष होण्यासाठीं वि-नंती केली होती पण यंदा विलायतेंत लेबरपक्षासंबंधानें पार्लमेंटांत बरीच चळवळ सुरू असल्यामुळें त्यांना ती विनंती मान्य न करतां आल्यामुळें हिंदुस्थानांतल्याच एखाद्या गृहस्थाला निवडण्याची अवश्यकता उत्पन्न झाली आहे. आह्मांला वाटतें कीं दिवसेंदिवस मुसलमानांचें पाठबळ कांग्रेसला ज्यास्त मिळण्याचें सुचिन्ह दिसत आहे आणि बहार प्रांतांत कांग्रेसच्या अध्यक्षाचें काम करण्यास लायक असे अनेक सु-शिक्षित मुसलमान गृहस्थही आहेत. या-साठीं यंदाचे वर्षी एखादा मुसलमान गृहस्थास हा मान दिला तर विशेष चां-गलें होईल. पण तें शक्य नसल तर आमच्या प्रांतांतले सुप्रसिद्ध नागरिक ना. रा. ब. मुधोळकर यांना तो मान मिळणें अवश्य आहे. नामदार साहेबांनीं आज-पर्यंत राजकीय व औद्योगिक दोन्ही बाब-तींत देशाची सेवा अविश्रांत व निरपेक्ष रीतीनें पुष्कळ केली आहे. ते अनुभववृद्ध आहेत, विद्वान् आहेत, कर्तृत्वशाली आहेत, आणि नेमस्त पक्षाचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. राज्यकर्ते आणि प्रजा यांच्या मधला दुवा सांधण्याचें जोखमीचें आणि कठीण काम त्यांनीं आजपर्यंत उत्तम प्रकारें केलें आहे. शिवाय धिमेपणाचा गुणही त्यांचे ठायीं आहे. तेव्हां अशा पुरुषाच्या गुणांची व सेवेची कद्र करणें हें कांग्रेसपक्षाचें अवश्य कर्तव्य आहे. नामदार साहेबांच्या या गुणांची तारीफ करतांना आह्मी बाकीच्या गृहस्थांचा अनादर करतों असें नाहीं. ना. गोखले, मि० खरे व ना० बसु यांच्या कर्तृत्व शक्तिबद्दल किंवा अंगच्या गुणाबद्दलही आ-मचे ठायीं तितकाच उच्च आदर आहे. पण ना. गोखले यांची प्रकृति बरी नस-ल्यानें त्यांना अध्यक्ष होण्याबद्दलचा गळ आमच्यानें घालवत नाहीं. ना. गोखले हे येथें नसल्यानें कांग्रेसच्या जनरल सेक्रेटरीचें महत्वाचें व जोखमीचें काम मि० खरे यांच्यावर येऊन पडलें असल्यामुळें त्यांच्यावर पुनः अध्यक्षाच्या मानाचें ओझें घालतां येत नाहीं व ना. मि. बसु हे बाकी-च्या गृहस्थांच्या मानानें तरुण असल्यामुळें त्यांना कांग्रेसचे अध्यक्ष होण्याचे अनेक प्र-संग पुढें येणार आहेत. या सर्व गोष्टींचा विचार करता यंदाच्या कांग्रेसच्या अध्यक्षा-चे खुर्चीचा मान आमचे प्रांतस्थ ना. रा. ब. मुधोळकर यांनाच द्यावा अशी आह्मी शिफारस करतों.

## ऑल इंडिया कांग्रेस कमिटी.

गतवर्षीच्या कांग्रेसपुढें कांग्रेसच्या रचने-बद्दलच्या नियमांत कांहीं सुधारणा कित्ये-कांनीं सुचविल्या होत्या व त्या सूचनांचा विचार ऑल इंडिया कांग्रेस कमिटीकडे विचा-रार्थ सोंपविण्यांत आल्या होत्या. त्यांचा विचार करण्यासाठीं ऑल इं. कां. कमिटीची एक सभा पाटण्यास कांग्रेस भरण्यापूर्वी दोन दिवस भरविण्यांत येणार आहे अशी एक बातमी प्रसिद्ध झाली आहे. ही बातमी जर खरी असेल तर कांग्रेसचे पुढारी वर्षांतून दहा महिने स्वस्थ बसतात आणि शेवटच्या दोन महिन्यांत थोडीशी हालचाल करून कांग्रेस जिवंत आहे असें दाखवि-ण्याची खटपट आहे असा जो त्यांच्यावर टीका कारांचा आरोप आहे त्या आरोपा-ची सार्थकता ही कमिटी दोन महिने मु-द्दाम नाहीं तर दोन दिवस आगाऊ स-भा भरवून करणार आहे असें ह्मणावें ला-गेल. या कमिटीची सभा इतक्या दिवसांत कां भरविण्यांत आली नाहीं किंवा कांग्रे-सपूर्वी दोन तीन महिने भरविण्यास कोण-ती हरकत आहे या विषयींचा खुलासा जनरल सेक्रेटरींनीं करणें अवश्य आहे. वस्तुतः यंदाचीच कांग्रेस सुचविलेल्या सुधा-रणांचा विचार होऊन नवे ठरतील त्या नियमां प्रमाणें व्हावयास पाहिजे व ती तशी व्हावी अशी पुष्कळांची इच्छा आहे. अगो-दर कमिटीची सभा न बोलावण्यांत कदा-चित् सेक्रेटरींचा असा हेतु असेल कीं या कमिटींत बखेडा करणारी कांहीं मंडळी असल्यास तिला तसें करण्यास फारशी स-वड देऊं नये. या संबंधांत आह्मांला इत-केंच सांगावयाचें आहे जनरल सेक्रेटरींची ही भीती अगदींच निरर्थक आहे असें जरी आह्मी ह्मणत नाहीं तरी १९०८ सालची स्थिति आज राहिलेली नाहीं. आतां वाताव-रण पुष्कळ शांत झालें आहे आणि मनाचा स्वाभाविक कल जहालपणाकडेच असलेली अशी कांहीं मंडळी कांग्रेस पक्षांत प्रच्छन्न रुपानें शिरण्यास पहात आहे. नखे काढून घेतलेल्या अस्वला प्रमाणें किंवा दांत पा-डलेल्या सर्पा प्रमाणें आज त्यांची स्थिति झालेली आहे. ते उगाच अरडतील ओर-डतील व फुत्कारे सोडून भिवडावण्याचा यत्न करतील, पण खोडसाळपणा करण्याची त्यांच्या अंगची शक्ति कधींच नाहींशी झा-ली आहे हें सेक्रेटरींनीं ध्यानांत ठेवून घे-र्यानें शक्य तितक्या लवकर कमिटीची स-भा बोलवावी अशी आमची त्यांस सूचना आहे.

## स्वतःच्या मरणाचा वृत्तांत.

रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज मासिक पुस्तकाचे संपा-दक मि. स्टेड यांचा अतींद्रिय ज्ञान, परलोकाहून येणारे निरोप, महात्मे इत्यादि गोष्टींवर विश्वास असे. स्वतः टिटॅनिक बोटींत बुडाल्यावर परलोकाहून त्यांनीं धाडि-लेला निरोप आह्मीं मागेंच वाचकांस कळ-विला आहे. टिटॅनिक आगबोट कशी बुडाली व मि. स्टेड कसे मेले या विषयींची लोकांची प्रबळ जिज्ञासा पाहून पर० मि. स्टेड यांनीं पुनः एक निरोप पाठविला आहे व त्यांत स्वतःच्या मरणाची हकीकत दिली आहे ती अशी—हे ह्मणतात, 'इंग्लंड सोडण्यापूर्वी अपघाताविषयींची यत्किं-चितही शंका मला आली नाहीं. किंवा तुह्मी या बोटींत जाऊं नका असें कोणी सुचविलें नाहीं. ही बोट सर्वांत मोठी ह्मणून तिच्यांतून जाण्याची मला बुद्धि झाली. बर्फाच्या खडकावर बोट आदळली तेव्हां मी जागा होतों. आह्मां मंडळींत त्या गोष्टीची चर्चा झाली, कांहीं लोक फार घाबरले होते, त्यांच्याशीं चार शब्द बोलून मी त्यांना धीर दिला. मध्यरात्र उलटल्यावर मात्र आपणास जावें लागणार अशी माझी खात्री झाली. मी मरण्यास सिद्धच होतों. परलोकीं माझें स्वागत कर-ण्यास किंवा मला हात देण्यास कोणी तरी येईल अशी मला खात्री होती. पण जे मरण्याला भीत होते, परलोक ह्मणजे काय या विषयीं अज्ञानांत होते, आणि ऐन संकटाच्या वेळीं ज्यांच्या श्रद्धेचा जोर कमती झाला होता असे लोक पुष्कळ होते. त्यांचें कसें करावयाचें, त्यांना कोणी मदत करावयाची? मी होतां होईल तों सत्यजीवन ह्मणजे काय व तें कसें निर्भय असतें या विषयीं त्यांना चार गोष्टी सांगून मग आपल्या खोलींत गेलों. आणि पर-लोकीं गेलेल्या माझ्या मित्रमंडळींशीं चिंतनाच्या द्वारें व्यवहार सुरू केला. इतक्यांत बोट फुटून पाणी आंत शिरलें. झालें. परलोकचें बो-लावणें आलें. अंतकाळच्या यातनेचे उद्गार चोहोंकडून ऐकूं येत होते. अशा गडबडींतच मी या लोकाहून चालतां झालों. पाणी शिरतांच प्रथम मला जीव गुदमरल्यासारखें झालें. मग कांहीं वेळानें एकादें भयंकर स्वप्न पाहून जागें व्हावें त्याप्रमाणें मी जागा झालों. माझें स्वागत करण्यासाठीं माझा मुलगा आला होता. मी परलोकच्या तीराला जाऊन पोहोंचलों, तेथून टिटॅनिक बोटी-तल्या लोकांची धडपड मला दिसत होती. बोटींतले खलाशी त्यांना मदत करीत होते. पण होड्यांची संख्याच कमी त्याला ते काय करणार?',

## चीनचें कर्ज.

चीननें इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी, अमेरिका व जपान हीं सहा राष्ट्रें कर्ज देण्यास तयार असतां त्यांचेपासून कर्ज घेण्याचें नाकारिलें. याचें कोणालाही आश्चर्य वाटणार नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिका या चार राष्ट्रांचा विशेषसा स्वार्थ यांत गुंतलेला नाहीं इतकें फारतर ह्मणतां येईल. पण रशिया व जपान यांचा स्वार्थ उघड उघड आहे. ज्या अटीवर हें कर्ज देण्याचें घाटत होतें त्या अटींत एक अशी होती कीं या कर्जाचा पैसा मंगोलिया व मंचूरिया या दोन प्रांतां वरचें आपलें आधिपत्य दृढ करण्यांत जपा-ननें लावूं नये. या अटीचा उघड अर्थ काय तो सांगावयास पाहिजे असें नाहीं. तो अर्थ हा कीं आह्माला हे दोन प्रांत पाहिजे आहेत तेव्हां ते आह्माला मुकाट्यानें द्या. पण हे दोन प्रांत दिल्यानें चीनचें राज्य अगदींच संकुचित होतें. मग चीन देश दुसऱ्याचा गुलाम होण्यास फार अव-काश न लागतां स्वातंत्र्यासाठीं धडपडत असलेल्या चिनी लोकांनीं बंड केलें असतें. या सर्व गोष्टींचा दूर दृष्टीनें विचार करून युआन शिकाई यानीं कर्ज घेण्याचें नाका-रल्यास यांत गैर झालें असें कोणीही ह्मणणार नाहीं.

## मराठी भाषेची उन्नति.

मराठी भाषेची उन्नति होत आहे कीं दिवसेंदिवस ती अधोगतीला जात आहे या विषयावर मुंबईच्या 'इंदुप्रकाश' प्रकाशांत अलीकडे बरीच चर्चा सुरु आहे. बडोद्याचे डा. चिपळूणकर यांचें असें ह्मणणें आहे कीं इंग्रजी शिक्षण आपले इकडे नुकतें सुरू झालें होतें तोंकाळ मराठी भाषेच्या उन्नतीचा होता. मराठी भाषेसंबंधानें खरी महत्वाची कामगिरी अशी त्याचवेळीं झाली. कोश,

व्याकरण ग्रंथ इ० विद्वत्ताप्रचुर ग्रंथ त्याकाळीं झाले तसे आतां होत नाहींत. मराठी भाषेची खरी सेवा कोणीं केली असेल तर ती कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले कृष्णशास्त्री राजवाडे वगैरे शास्त्री मंडळीनें केली. नवे पदवीधर त्यांच्या पुढें कुचकामाचे ठरले. अलीकडे मराठी भाषेंत चांगले ग्रंथ निर्माण होत नसल्यामुळें तिची अवनति होत आहे असें अर्थात् स्पष्टपणें ह्मटलें पाहिजे. यावर प्रतिपक्षाचें असें ह्मणणें आहे ( आणि याही पक्षाला रा० सा० विनायक कोंडदेव ओक, आपटे, परांजपे प्रभृति चांगली विद्वान् मंडळी आहे ) कीं पूर्वींच्या शास्त्री मंडळीनें मराठी भाषेसंबंधानें बहुमोल कामगिरी करून ठेविली आहे याविषयीं शंका नाहीं, पण सध्याच्या परिस्थितींत हल्लींची पदवीधर किंवा इतर मंडळी यांच्या हातून होत असलेली मराठी भाषेची सेवा टाकाऊ आहे असें नसून ती निरनिराळ्या क्षेत्रांत होत असल्यानें मराठी भाषेचा संकुचितपणा दिवसेंदिवस जात असल्यानें तिची उन्नतिच होत आहे असें ह्मटलें पाहिजे. हा वाद मोठा आहे, तथापि कांहीं शास्त्रीय पद्धतीनें खाजगी वर्ग न काढतां तो विद्वान् लोक चालविंतील तर त्यापासून पुष्कळ लाभ होण्यासारखा आहे. सध्या मराठी भाषेंत होणारीं पुस्तकें टाकाऊ असतात कीं काय हें त्या प्रश्नाचें एक नुसतें अंग आहे. पण या अंगासंबंधानें दरसाल मिळत जाणारा पुरावा चिपळूणकर प्रभृति मंडळीच्या विधानाला खोडून काढणारा आहे असें आह्मांस वाटतें. पुण्याच्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीचा गतवर्षीचा रिपोर्टच घ्या. सोसायटीकडे गेल्यासाली ९४ पुस्तकें आलीं त्यांतलीं २२ बक्षिसाला पात्र ठरलीं. ह्मणजे जवळ जवळ शेंकडा ९० पुस्तकें विद्वानांना मान्य होण्यासारखीं होतीं. हे कांहीं थोडें नाहीं. हीं सगळींच पुस्तकें भाषांतराच्या स्वरूपाचीं नसून त्यांतलीं बरींच स्वतंत्र रचनेचीं होतीं हेंही लक्षांत घेतलें पाहिजे. अशा स्वतंत्र रचनेच्या ग्रंथांत कांहीं येथें नमूद करण्यासारखीं आहेत. उदाहरणार्थ काव्यांत वनवासी फूल, सुवर्णाकाव्य व मंदार मंजरी हीं तिन्हीं लहान आहेत खरीं, पण काव्य या दृष्टीनें बरींच सरस आहेत. चरित्रांत एकच चारित्र- राजारामशास्त्री भागवत यांचें आहे, पण तें चांगल्या पैकीं आहे. शास्त्रीय विषयावर ग्रंथ होत नाहींत ह्मणून अलीकडे बरीच आरड आहे पण रिपोर्टाच्या साली या विषयावर पांच-चार चांगलीं नांव घेण्याजोगीं पुस्तकें झालीं. उदाहरणार्थ रा. पवार यांची करणकौमुदी हें जुन्या आणि नव्या प्राच्य व पाश्चात्य अशा दोन्ही ग्रंथांचें पर्यालोचन करून लिहिलेलें पुस्तक आहे. 'हिंदुस्थानांतील पाऊस व झाडें' यावरचें रा. देशपांडे यांचें पुस्तक, रा. कोल्हटकर यांचें फळझाडांच्या लागवडीसंबंधाचें छोटेंसें पुस्तक, प्रो० काणे यांची 'भारतरामायणकालीन समाज स्थिति', रा० आपटे याचें 'मराठी भाषेचे संप्रदाय व ह्मणी, व रा० देवधर यांचें शेती व शेतसुधारणा हीं पुस्तकें मराठी भाषेच्या उन्नतीचीं निदर्शक आहेत याविषयीं कोणीही शंका घेईलसें वाटत नाहीं. वेदांत विषयांत 'खडेतात्विकबोध' हें छोटेंसेंच पण बरेंच चांगलें पुस्तक झालें आहे. भाषांतर किंवा रूपांतर होऊन मराठींत आलेल्या पुस्तकांत स्यूतनीतिक, उद्योगसंस्था, विधि व धर्मविषयकसंस्था, अर्ल-ऑफ मेयोचें चरित्र आर्य लोकांचें मूलस्थान सुख व शांति व वेदकालनिर्णय हीं सगळीं पुस्तकें मराठी भाषेचें दारिद्र्य अल्पांशानें कां होईना पण दूर करण्यास साधनीभूत होणारीं आहेत. सारांश, मराठी भाषेंत थोडीं कां होईना, पण कांहीं चांगलीं पुस्तकें अलीकडे होत आहेत ही कांहीं लहान समाधानाची गोष्ट नाहीं. अशीं पुस्तकें पुष्कळ व्हावयास पाहिजे ही गोष्ट खरी, पण तो राजाश्रयाचा व लोकाश्रयाचा प्रश्न आहे. हीं दोन्ही भरपूर मिळतील तर चांगले चागले ग्रंथ पुष्कळ निर्माण होण्यास फार काळ लागेल असें आह्मांस वाटत नाहीं.

## हिंदुधर्माचें हृद्गत.

प० न्यायमूर्ति रानडे यांच्या दुय्याचा झगा ज्याचे अंगावर पडला आहे असे न्या० चंदावरकर हेही रावसाहेब रानड्याप्रमाणें आपल्या फुरसतीचा वेळ हिंदुधर्माचें यथार्थ स्वरूप इंग्रजी जाणणाऱ्या समाजापुढें मांडून त्या धर्माविषयीं होत असलेला युरोपियन लोकांचा गैरसमज दूर करीत आहेत हें पाहून आह्मांस संतोष होतो. त्यांनीं अलीकडे हिंदुधर्माचें हृद्गत या विषयावर मुंबईच्या टाइम्स पत्रांत लेखमाला सुरू केली असून या मालेंतले चार लेख आतांपर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. पहिल्या लेखांत हिंदुधर्मी कोणास ह्मणावें, वेदावर श्रद्धा हा हिंदुधर्माचा मूळ पाया आहे काय या प्रश्नाचें त्यानीं विवेचन केलें. दुसऱ्यात भक्तिमार्ग कसा निघाला याची मीमांसा केली आहे. तिसऱ्यांत महारासारख्या नीच मानलेल्या जातीच्या लोकांत सुद्धा धार्मिकतेचें बीज कसें दृष्टीस पडतें तें दाखविलें आहे, आणि चौथ्यांत क्रियाविषयीं आमच्या अशिक्षित वर्गांत सुद्धां किती उच्च कल्पना आहे. तें एका कुणब्याचें उदाहरण घेऊन निदर्शनास आणिलें आहे. एकंदर माला फार वाचनीय आहे. न्यायमूर्ति हे चांगल्या नावाजलेल्या लेखकांपैकीं एक आहेत इतकेंच नाहीं तर त्याचें अवलोकन फार सूक्ष्म असून आपाततः क्षुद्र दिसणाऱ्या गोष्टीपासून हिंदुसमाजाविषयींचें खरें ज्ञान कसें होतें व लोकांच्या रोजच्या व्यवहारांत हीं हिंदुधर्मतत्त्वें कशीं प्रतिबिंबित झालेलीं दिसतात हे त्यांना फार कुशलतेनें व मार्मिकपणानें दाखविलें आहे. सारांश, न्यायमूर्तींची ही कामगिरी खऱ्या हिंदुधर्माभिमानी गृहस्थास शोभणारी आहे आणि ह्मणून त्याच्या या प्रयत्नाचें आह्मी मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## गुरूंचें बंड

सध्या आमच्या समाजात जिकडे पहावें तिकडे गुरूंचें बंड माजलें आहे. हें येवढें गुरूंचें व त्यांचेवर बसणाऱ्या भोळ्या श्रद्धेचें पीक एकाएकीं आलें तरी कोठून हा एक मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. 'गुरु' हें नाव धारण करणारे सगळे त्या पदाला योग्य असते तर आमचें कांहीं ह्मणणें नव्हतें. इंग्रजी शिक्षणामुळें मध्यंतरीं जी नास्तिकतेची लाट आमचे समाजावर आली होती तिचा प्रतिकार करण्यासाठीं परमेश्वरानें ही श्रद्धेची लाट पाठवून दिली असें ह्मणून आह्मी स्वस्थ बसलों असतों. पण खरा प्रकार तसा नाहीं ह्मणून वाईट वाटतें हल्लीं जें गुरूंचें बंड माजलें आहे त्याचें स्वरूप अत्यंत हिडिस आहे. तें तसें असल्याशिवाय पुण्याच्या 'मुमुक्षु' सारख्या अत्यंत धार्मिक व भाविक पत्रांत हल्लींच्या गुरूंविषयीं पुढल्यासारखे उद्गार आले नसते हें पत्र ह्मणतें:— 'शिष्याच्या वित्तीचा अपहार अनेक तऱ्हेनें करूं पाहणारे गुरु पुष्कळच दृष्टोत्पत्तीस येतात. ज्यानीं द्रव्याचा लोभ दूर सारला तेच संतमालिकेंत अग्रगण्य झाले व होतील. शिष्याचे वित्तावर डोळा ठेवून वेळप्रसंग पाहून, युक्तीयुक्तीनें डावपेंच लढवून, भुरळ पाडून, द्रव्य उपटून त्यावर कुटुंबाचें पोषण करणें हा परमार्थ नाहीं. संभावित लुटारूपणा आहे. नुसता लुटारूपणा दिसला कीं सरकारही अशांच समाचार घेण्यास मागें पुढें पाहत नाहीं-पण धर्माच्या आवरणाखालीं हें होत असल्यामुळें सरकारला त्यांत हात घालतां येत नाहीं. अशा गुरु सद्गुरूपासून भोळ्या स्त्रिया व द्रव्य यांचें संरक्षण करण्याचा बोजा समाजावर आहे' पण समाज याबद्दल काय करीत आहे ? वर्ध्याच्या हनुमानगडावरील श्रीधर गोवा संबंधानें खऱ्या ह्मणा खोट्या ह्मणा पुष्कळ वेड्या वाकड्या गोष्टी सुशिक्षित लोकांनीं आपल्या सह्यांनिशी प्रसिद्धीला आणिल्या आहेत. त्यांची शहानिशा करून त्या खऱ्या असल्यास बोवाला त्याबद्दलचें प्रायश्चित देण्यासाठीं व इतरांना सावध करण्यासाठीं समाजानें एखादें कामिशन नेमून चौकशी करण्यास काय हरकत आहे ? लोकहितासाठीं येवढेंही ज्याच्या हातून घडत नाहीं तो समाज जिवंत असला तरी मृतप्रायच ह्मटला पाहिजे.

## अनुग्रह

बंगलोर कडील निदवांडा स्टेशनापासून ७ मैलावर शिवगंगा ह्मणून पवित्र स्थळ आहे. तेथें श्री शंकराचार्य यांनीं स्थापिलेल्या श्री शृंगेरी मठाचा शाखा—मठ आहे त्या पीठाच्या मुख्य स्वामींस 'श्री जगद्गुरु' या महासंबोधनानें लेखीत असतात. हल्लीं त्या गादीवर श्री सुब्रह्मण्याभिनव सच्चिदानंद भारती स्वामी हे विराजमान आहेत. त्यांचा अनुग्रह सध्यां आमच्या नगरावर आहे आण श्रीजगद्गुरु गेल्या बुधवारीं येथें आल्यापासून आमच्या शहरीं धर्मप्रवृत्तींना व सदाचरांना विशेष भरती आली आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट होय. धर्माची जागृती जे जे महात्मे करितात त्या पुण्यश्लोक लोकांचा धन्यवाद गावा तेवढा थोडाच आहे. आद्य श्रीशंकराचार्यांनीं जंबुद्वीपामधील या भरतखंडावर जो ज्ञानानुग्रह केला आहे, जो ज्ञानप्रदीप लावून ठेविला आहे किंवा जें ज्ञानभांडार फोडून लोकांपुढें मांडलें आहे त्यामुळें सर्व भारतवर्षीय लोक प्रगतीच्या उच्च उच्च शिखराला चढूं लागले आहेत. आणि ह्मणूनच आज दोन हजार वर्षें लोटलीं तरी त्या त्या मंगल नाममंत्रानेंच सर्व देशास पवित्रता व धन्यता वाटते. अशा आद्य विद्यापिठाकडील विभूतीं जेव्हां संचार करण्यास निघतात तेव्हां स्वाभाविकपणेंच लोक कृतज्ञता बुद्धीनें व पूज्यभावानें मागील परंपरेला बहुमान देत असतात आणि तशाच प्रकारानें आमच्या शहरी महोत्सव चालूं आहेत.

हल्लींचें श्री सच्चिदानंद भारती स्वामी फार योग्य असे सत्पुरुष आहेत. ही गोष्ट त्याच्या येथील दोन व्याख्यानांवरूनच लोकांच्या ध्यानांत येऊन चुकली आहे. यांची तेजबुद्धि व विद्याभ्यासंग हीं पाहूनच यांस वयाचे १४ वर्षींच श्री गंगाधर भारती स्वामी यांनीं शिवगंगा मठावर अभिषिक्त केलें. हे बालब्रह्मचारी असून आज ४२ वर्षांच्या वयापर्यंत सतत कालक्रमणा विद्यार्जन, योगाभ्यास, व धर्मोपदेश यामध्यें होत असते. यांच्या मठाला सालीना ५० हजार रुपयें उत्पन्नाची जहागीर आहे. या श्रीमंतीला अनुरूप यांचा लवाजमा आहे पण खुद्द श्री स्वामी महाराज अगदीं सत्वस्थ सौम्य व साध्या वृत्तीचे आहेत. यांस तेलगु, कानडी, मारवू, हिंदुस्थानी, मराठी, संस्कृत, व अल्पस्वल्प इंग्रजी इतक्या भाषा येतात. चांगले बहुश्रुत वक्ते असून यांची उपदेश करण्याची शैली फार नामी आहे यांचे विचार उदात्त असून इतर धर्माविषयीं त्यांची निष्ठा उत्कृष्ट कोटींतली आहे. महमद, ख्राइस्ट, झोरास्टर इत्यादि धर्मप्रवर्तकां संबंधानें बोलतांना त्या सर्वांसच ते श्रीशंकराचार्यासारखा बहुमान देतात. जनसमूहाविषयीं त्यांच्या मनांत प्रेम वागत आहे. ते शूद्राला लघुपणानें लेखीत नाहींत. 'शुचा द्रवति' इति शूद्रः अशी शब्दासिद्धि करून ते ह्मणतात कीं ज्यांनीं राक्षसी किंवा आसुरी मार्ग टाकला, त्या दुःखद मार्गापासून निवून जे उदार वृत्तीकडे लागले ते सर्व शूद्र होत. या दृष्टीनें त्यांची समदृष्टी प्रजाजनाकडे आहे इतकेंच नाहीं तर ते स्वतांस लोकाचे सेवक व चाकर ह्मणवून घेण्यांत आपल्या स्थानाचा मोठेपणा मानीत असतात. असा महायोग आह्मा हिंदुधर्मीयांस लाभो आणि आमचें पाऊल कालदेशमानाला अनुरूप अशा ब्रह्मपदीं पुढें पुढें पडो एवढींच श्रीजद्गुरुपाशीं आमची प्रार्थना आहे.

नोटीस

# वऱ्हाड वृत्त.

हवामान— आकाशाकडे दृष्टी लागली असून मनोरथ लवकर पूर्ण होतील असे गोड बोल सोसाट्याचा वारा बोलत आहे. पर्जन्यासाठीं पेरे तहकूब आहेत. रोगराई नाहीं.

श्री जगद्गुरु यांचें व्याख्यान आज सायंकाळीं असून उद्यां ते वाघोली मार्गानें आकोटाकडे जातील. त्यांचा तळ येथें श्रीराजेश्वराचे मंदिरांत असल्यामुळें तेथील भव्य पाठशालेचा विस्तीर्ण दिवाणखाना गजबजून गेला आहे.

मेजर ड्रीडन साहेब रजेवर परत आल्यानंतर रा. रा. ब्राऊन साहेब परत इलिचपुरास जातील.

रा. रा. स्टांडन साहेब कमिशनर यांची स्वारी वार्षिक तपासणी निमित्त येथें आहे.

# नकली औषधानें फसूं नका.

डाक्टर चांदलीआ कृत प्रसिद्ध झालेलीं औषधें.

नपुसकत्व, नामर्दाई व नेभळेपणाची समुळ नाश करून तारुण्यदशेची

छटा फमटवून पूर्ण तरतरी व जोम आणणारी

## " बादशाही याकुती "

( सरकारी रजीस्टरनं. २२० आहे )

ही " याकुती " आजकाल कमताकत झालेल्या दुनियेला एक इश्वरी प्रसादच आहे. शिथिल झालेल्या शिरांना जोमदार बनविण्यांत, गेलेली स्मरण शक्ति परत भरपूर सजीव करण्यांत, अविचारानें धातुपात केल्यामुळें लहान वयांतच दिसणारी ह्मातारपणाची सर्व चिन्हें दूर करण्यांत, स्वप्नावस्था व लघवींतून जाणारी धातु बंद करण्यांत, विर्य वाहिन्यांना भरपूर विर्य पुरविण्यांत " बादशाही याकुती " ह्मणजे एक अमृत आहे. किं. डबी १ ची रु. १०

### कमजोरीवर रामबाण " मदनमित्रलेप "

बाल्यवस्थेंत अविचारानें केलेला धातुपात शिथिलता ह्यांच्याकारितां तर हा लेप जणु काय अमूल्य रत्न व रामबाण उपाय होय. किं. डबी १ ची रु. २

### पू परम्यावर वस्ताद " प्रमेहान्तक "

जुन्या अथवा नव्या कोणत्याही प्रकारच्या हट्टी पू परम्यावर हें औषध थोड्या दिवसांत हटकून कायमचा गुण देणारा उपाय ह्मणावा लागतो किं. बा. १ चे रु. २

पत्ताः-- चांदलीआ आणि कंपनी काळ्का देवी रोड मुंबई.

नो. नं. ३३१

# जाहीरात.

## !!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशि, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षेपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाणः—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ, मद्रास.

नो. नं. ३०७


## नोटीस

शेखहुसेन वा। राजमहंमद मुसलमान रा. डोंगरगाव ता० मुर्तिजापूर यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे शिरसोली ता० मुर्तिजापूर येथील आमचे शेत सर्वे नं० ५० एकर गुंठे ३०८३२ आकार रुपये ४८ हें तुह्मी गेल्या फेब्रुवारी महिन्यांत तीन वर्षाच्या करारानें आमचेपासून पट्ट्यानें वहितीस घेऊन त्याबद्दल स्वामीत्वाचे रुपये २४० आह्मास देण्याचे कबूल करून कबुलायत लिहून देण्याचे कबूल केलें सदर्हु शेत नांगरून, लांगवगैरे घालून तयार करून देण्याचाहि करार तुह्मी केला. तुह्मी याप्रमाणें करार केला असतांना आह्माला शेतासंबंधानें कराराप्रमाणें कबुलायत अद्याप पर्यंत करून दिली नाहीं व शेत तसेंच पेरण्यास लागला आहा. सबब ही नोटीस पावतांच ८ दिवसाचे आंत आह्मास कबुलायत लिहून देऊन नोंदून द्यावा न दिल्यास आह्मीं दुसऱ्यास सदर्हु शेत पट्ट्यानें देऊं व आमचे नुकसान झाल्यास त्याबद्दलें तुह्मास जबाबदार धरूं व कायद्याप्रमाणें तजवीज करूं कळावें. ता० ४।७।१९१२

सही

शामराव अमृत देशपांडे हल्लीं मुक्काम आकोला द० खु०

नो० नं० ३७५

## नोटीस

नोटीस बेशमी गणू वा। धोंडू भोई राहणार मौजे पिंपळगांवदेवी ता० मलकापूर जिल्हा बुलडाणा यांसः—

पुती मर्द गणू भोई राहणार जाहागीरपुर ता० मलकापुर जि० बुलडाणा इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं मी तुझी लग्नाची बायको असून तुला महारोग ( रक्तपीती ) झाली करीतां तुला दोनवेळ नोटीसीनें कळविले व पंचा समक्षही बरेच वेळां ह्मटले तरी तूं माझी फारकत देत नाहींस करितां या जाहीर नोटिशीनें कळवितें कीं आज साहावर्षे पर्यंत मी तुझी वाट पाहीली आतां यापुढे पाहणार नाहीं. कारण आजपर्यंत खर्च अन्नवस्त्रा करीतां दरमहींन्यास अंदाज चार ४ रुपये प्रमाणें मजकडे सावकाराचे २७५ दोनशे पंचाहत्तर रुपये कर्ज झालें व शीवाय व्याज आहे आता मला कोणी कर्जही देत नाहींत बापाचे घरींच राहावे तर घरांत सावत्र आई असल्यानें तेही जमत नाहीं सबब मला वेगळेंच राहणें भाग आहे तरी नोटीस पावल्यानंतर एक महीन्याचे आंत मजकडेस झालेले कर्ज देऊन टाकून फारकती देऊन माझा निकाल करावा नाहींपेक्षां मी तुझे नवरे पणाचा हक्क तूं सोडलास असे समजून दुसरा घरठाव करीन व मजकडे झालेले पैशाबद्दल कोर्टांत दावा करीन तरी समक्ष येऊन सर्व निकाल करावा इतःपर मी तुमची जबाबदार राहीलें नाहीं कळावें ता० माहे सन

सही.

पुती मर्द गणु भाई रा० जाहागीरपूर निशाणी खुद हातची बांगडी

नो० नं० ३७६

## नोटीस

नोटीस बेशमी झ्यामा वल्लद सखाराम जात कुणबी रा० लाडकी ता० मोर्सी जि० उमरावती यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून तुमचे येथें मी सात आठ वर्षें एकत्र राहून संसार केला माझा कांहीं अपराध नसतां विनाकारण मजला मारहाण करून हांकून दिले. तरी मी स्वतःच आपले येथें नांदण्यांस आलें असतां येऊं सुद्धां दिलें नाहीं. पुन्हा हांकून दिले. मजला आईबाप नसल्यामुळें माझे वरून खाण्यापिण्याचें हाल झाल्यामुळें मी घाटलाडकी ता० एलीचपूर येथें मी आपले मामाचें येथें लोकांचे कर्ज काढून दोन वर्षांपासून खात आहे. तुह्मी माझा खाण्यापिण्याचासुद्धां समाचार घेतना. अंदाज आठ महिनें झाले तुह्मी दुसरी गंधर्वाची बायको करून आपला संसार करीत आहा. तुह्मांस मी चार पांच वेळां मजला घेऊन जाण्याबद्दल निरोप दिला तरी तुह्मी नेत नाहीं. व फारकती मागण्याबद्दल माझा जावई नामें बाबुजी वगैरे यांस पाठविले असतां फारकती देत नाहीं. व पंचासमक्ष नांदविण्यासही कबूल करीत नाहीं. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं मी खालेलें कर्ज आजपावेतोचें रुपये १०० देऊन व माझे नांदनुकीबद्दल खात्रीचें जामीन देऊन घेऊन जावे. असे न केल्यास मी हीच फारकत समजून पुनरविवाह करील. पुढें तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं कळावें. ता० १७।६।१९१२ दस्तुर किसन वल्लद तानाजी सिंपी.

सही

कवतीक मर्द झ्यांमाजी कुन्हली रा० लाडकी ता० एलीचपूर इची नि० बांगडी असे.

नो० नं० ३७७

## नोटिस

भाई मेघराज बंसीधर दुकान शेगांव ता० खामगांव यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचें मकान शेगांव तालुका खामगांव येथील तुह्मी भाड्यानीं घेतलेले आहे तुह्मी आमची भाड्याची रक्कम देत नाहीं सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसांत आमची भाड्याची रक्कम आणून द्यावी व आमचे मकान खाली करून द्यावें तसे न केल्यास दिवाणी कोर्टमार्फत तुमचेकडून भाड्यांची रक्कम वसूल करून व मकानाचा ताबा घेऊन याचा कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २८।६।१२

सही

चुनीलाल शिवचंदराय दुकान आकोट तर्फे देवीदत्त रामदत्त

नो० नं० ३७८

## वस्तूपासून तीन देणग्या

र्य

आरोग्य

थोडा खर्च

वें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.

न पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतात:—काळे डाग, संधिवात नस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभैरी मेहरी, बद, फोड, चट्टे, , तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

### तर स्वत:चाच राजवैद्य बनून

ग नष्ट करणें बरें नव्हे काय ?

गोखले एम्. ए. एम्. डी याच्या प्रख्यात—

## ोडाईझड सार्सापरीलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

### अनुभवतर पहा.

. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.



## मृत हे काय आहे ?

### अस्सल बालामृत हें

ना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगांवर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे.

गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

०१२ आणें पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ता:--हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नो. नं. २८७



## जवानी

दुसऱ्या औषधाशीं तुलना केल्यास नंबर १ चें

### भीमसेनी बळ

व

तारुण्यांतील शक्ती गेली असल्यास ताबडतोब आमच्या १ रुपया किंमतीच्या नामांकित शक्तिवर्धक औषधाचा

### उपयोग करा

मग पहा कीं दहा दहा व पन्नास पन्नास रुपये किंमतीच्या याकुतीपासून जास्त फायदा आहे कीं आमच्या रुपया किंमतीच्या औषधापासून जास्त फायदा आहे ?

आमचें औषध वापरणारांकडून त्यास त्याच्या गुणाप्रमाणें

### मेलेल्यास जिवंत करणार

ा किताब मिळाला आहे.

आणि तुह्मांस वापरल्यावर खरें तेंच कळून येईल.

हें औषध ज्या वस्तूपासून बनविलेलें आहे ती वस्तू दुनियेंतील हकिमांचे राजे हुकमानी याच्या औषधांपैकीं एक पहिल्या नंबरचें औषध आहे.

ज्यामुळें तुमची गेलेली शक्ती--तारुण्यांत आलेली दुर्बलता गात्रांची शिथिलता आजारीपणामुळें अंगांतील कमी झालेलें रक्त तुह्मांस प्राप्त होईल.

गरीबांनीं वापरून आह्मांस आशीर्वाद द्यावा ह्मणून ४० गोळ्यांच्या शिशीस ... १ च रुपया ठेविली आहे. पोस्टेज वेगळें. लेपाची शिशी पाहिजे असल्यास ... किंमत १ रुपया आहे करिता दुसरें औषध घेण्यापूर्वीं ह्या औषधांचा ...ण्यांस चुकू नका.

...ंचीं औषधें घेणारास गोळ्यांच्या २ शिश्या बक्षिस देऊं. दुसऱ्या, ...र रोगाकरितां आमच्याकडे अस्सल युनानी औषधें मिळतील व ...त्र आल्यास कळवूं.

एम. ई. हकीम.
सिधपुर, नॉर्थ गुजराथ



## धी बॉम्बे टाइल कंपनी

= आरस पराण =

जमीनीवर बसविण्याच्या रंगीन छाया दगड आणि सीमेन्ट विकणार.

आमच्या मालाची खात्री करून घ्या.

| उत्तम माल | स्वस्त भाव |
|---|---|

१६७ डंकन रोड मुंबई नंबर ४



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाहीं.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } ग्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड ' नो. नं. १३



## Oriental Govrnment se curi LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

### FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has loft the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्मपांत छापून प्रसिद्ध केलें.

## ने सि

टीस सखाराम वल्दद आयाजी नवाळे
तुलंग बुा ता० बाळापूर यास—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० २।६।१२ च्या सुदर्शन वर्तमानपत्रांतून सावित्री मर्द तुकारामची दिलेली नोटीस पावली. सदर्हु नोटीस अगदीं खोटी आहे. तिजला मजकूर मला मुळींच कबूल नाहीं व सदर्हु नोटीस तुह्मी सावित्रीला न कळवितां परभारे लबाडीनें दिलेली आहे. विठोबा नंदाजी फुरंमे कान्हेरीकर याचे कर्ज तोडण्यासाठीं रुपये १५८ व नथु वल्दद विठोबा माणकीकर याचे कर्ज तोडण्यासाठीं रुपये ७५ एकूण रुपये २३३ तुकाराम मारुती रा० तुलंग बुा याचेजवळ मी शिवराम उदेभान कान्हेरीकर याचेजवळून कर्जाऊ घेऊन दिले व वरील इसमाचे कर्जाचा निकाल केला आहे. सदर्हु प्रमाणें सावित्रीच्या नवऱ्याचे ह्मणजे मारुती याच्या हातचे सर्व कर्ज मी फेडले आहे. कळावें तारीख ६।७।१२ इसवी

सही

तुकाराम वा॥ उदेभान सूळकर रा० कान्हेरी गवळ्याची नि० खु०
हातचा आंगठा

नो० नं० ३७९

## नोटीस

रा० रा० कृष्णा वल्दद कडतु वढाळ पाटील राहणार मौजे ढाकरखेड प्रगणें मलकापूर पाग्रे ता० मेहकर यांसः—

खालीं सह्या करणार राहणार मौजे बामखेड प्रगणें सीदखेड ता० मेहकर याजकडून कळविण्यांत येते कीं आह्मी आपल्या मालकीचे स्थावर माल मौजे बामखेड प्र० सिंदखेड तालुके मेहकर येथील शेतें सर्वे नंबर एकर गुंठे आकार

| सर्वे नंबर | एकर | गुंठे | आकार |
|---|---|---|---|
| ४५ | २१ | १ | १४ |
| ४६ | १९ | १४ | १४ |

दोन्ही नंबरातील चवथा हिस्सा ता० २३ मे सन १९१२ इसवी रोजीं तुह्मांस रकम रुपये ३७५ ला नजर गहाण देऊन देऊळगांवराजा सबरजिष्टर कचेरींत वरील तारखेस बुक नं० १ भाग ३६ अ० नंबर १४९ सन १९१२ यांत नोंदून दिला आहे. भरणा आह्मी सबरजिष्टर समक्ष कबूल केला आहे. परंतु तुमचा आमचा असा करार होता कीं तुह्मी सबरजिष्टर समक्ष भरणा कबूल करा. आह्मी तुह्मास घरीं रकम देऊं. तुमचे विश्वासावर आह्मी भरणा कबूल केला. घरीं आल्यावर तुह्मास भरणा मागितला असतां तुह्मी वरील मिळकत गहाण घेण्यास नाकारले व तुह्मी आह्मांस दिलेले खर्चास रकम रुपये ११ चार पंचासमक्ष वापस घेतले व मी गहाणाचा हक्क सोडून दिला अशी पावती देतो असे पंचासमक्ष कबूल केले. परंतु पावती मागितली असतां मेहकराहून येऊन देतो अशी थाप मारून मेहकर येथें निघून गेले. पुन्हा गहाणाची पावती मागितली असता थापा देत आहा. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं जर तुह्मास वरील नंबर गहाण ठेवण्याचें असल्यास नोटीस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचें आंत गहाणाची रकम आह्मास देऊन तुमचे नांवचा रोखा आमचें जवळ आहे. तो तुह्मी घ्यावा. रकम पावल्याबद्दल आह्मी पावतीही देऊं याप्रमाणें तुह्मी करणार नाहीं तर झालेलें गहाणखत रद्द समजून आह्मी दुसऱ्या सावकाराकडे तजविज करून त्यास गहाण देऊं हेही तुह्मांस कळविले आहे कळावे. ता० २-७-१२ इ०

सह्या

१ आसरु वा॥ येशवंता गोंगे कुणबी
निशाणी रेघ.

२ लक्ष्मण वा॥ पीराजी गोंगे कुणबी
नि० रेघ.

नो० नं० ३८०

## नोटीस

भाई माहानंदराम दुरगादत दुकान तेल्हारा ता० आकोट यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तेल्हारे येथील आमचे मालकीचे मकान भाड्यानें घेतलेलें होतें. त्या मकानाची भाड्याची रकम तुमचेकडून येणें आहे ती तुह्मास अनेकवेळां मागितली असतां तुह्मी देतो देतो ह्मणतां परंतु देत नाहीं व तुम्ही मकानांत मीठ वगैरे ठेवून आमचे मकानाची फार नादुरस्ती व खराबी केली. ते मकान आह्मी दुसऱ्यास वीकले आहे. मकान खराब झाल्यामुळें मकानाची कींमत रुपये २०० कमी आली आहे. तर आमचे रुपये २०० चे नुकसान झाले आहे ते तुम्ही आम्हास भरून द्यावे. सदर्हु मकानांत जें कांहीं तुमचे सामान वगैरे असेल तें तुम्ही आपले काढून घेणें व भाड्याची व नुकसानीची रकमही नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत आम्हास देऊन टाकून आमची रसीद घ्यावी. या प्रमाणें तुह्मी नाहीं केले तर दीवाणी कोर्टात दावा करुन कोर्ट खर्चा सुद्धां नोटीसीचे खर्चा सुद्धा भरुन घेऊ. कळावें. ता० २८-६-१२

सही

चुनीलाल सीवचंदराय दुकान
आकोट. तर्फे देवीदत्त समदत्त.

नो० नं० ३८१

## जाहिर नोटीस

सर्वत्र सेट सावकार व इतर गांवकरी लोक यांसः—

खालीं सही करणार इजकडून या जाहिर नोटिशिनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नामे मारोती वा॥ चाहादू तेली हा वाइट चालीचा निघाला असून त्यानें रांड टेवलेली आहे. करितां कोणीही माझी जिनगी त्याच्या जवळून गहाण, खरेदी बक्षीस घेऊं नये व कर्जही देऊं नये दिल्यास बातल समजले जाईल. कळावें. ता० ८-७-१२ इ०

सही.

सीताबाई मर्द चाहादु तेली राहणार मलकापुर नि० बांगडी

नो० नं० ३८२

## नोटीस

नोटीस बेशमी सिता मर्द महादु मराठीण राहणार खंडाळ ता० आकोट

इसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविलें जाते कीं तूं तारिख १७-६-१२ ची हस्तलिखीत नोटीस दिली ती पावली तूं नोटिशींत लिहिलेला मजकूर अगदीं खोटा आहे कारण तूं सज्ञान झाल्यावर माझे घरीं १॥ वर्ष होतीस व आपण आनंदानें संसार करीत होतों पुढें "पंधरा दिवसांनीं आणून घालुं" असा करार करून तुझे माहेरचे मनुष्यांनीं तुला नेलें व हमेषा पाठवीत होतो त्याप्रमाणें मीही पाठविलें तूं माहेरी गेल्यानंतर दुसरे मनुष्याचे नादीं लागलीस मी तुला आणण्याकरितां दोन चार वेळा मूळ पाठविलें व पुष्कळवेळां मीही आलों पण प्रत्येक वेळीं तुझे माहेरचे मनुष्यांनीं भांडणाची कुरापत काढून पाठविलें नाहीं हल्लीं कळविण्याचे कीं तूं माहेरी गेलीस तेव्हां तुझे अंगावर सोन्याची नथ वजन मासे ६ व बाळ्या टोकरें मुरक्या वजन तोडे १ असे १॥ तोळा सोने व कोपरवाळ्या करडी, पाटल्या, कडे, हसली, व तोळे, असे चांदीचे वजन तोळे १५० असें दागिने होते त्या दागिन्यासमेत नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत यावेस मी वागावण्यास तयार आहे. तूं अन्न वस्त्राचे रुपयां बदल लिहिलेस पण तुझे माहेरचे माणसांनीं हट्ट धरून तुला पाठविलें नाहीं यामुळे मी तो देणार नाहीं उलट विनाकारण नोटीस देऊन मला खर्चीं केले सबब माझा खर्च मी भरून घेईन वर लिहिले प्रमाणे तूं न आलीस तर मी कोर्ट मार्फत तुला ताब्यांत घेईन त्याबद्दलचा खर्च व नोटीस खर्च असा सर्व तुझे माहेरचे माणसां जवळून भरून घेतला जाईल कळावे ता. २१-६-१२ इ.

सही

महादु वल्दद नागोजी मराठे
रा० आकोट नि० घेर

नो० नं० ३८३

## नोटीस

नोटीस बेमशी शंकरलाल व हरकलाल मालक बुलाखीदास गाठे दुकान बाळापूर पेठ ता. बाळापूर

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी मौजे बेलुरा बुा येथील तुमचे मालकीची शेतें दोन.

| स. नं. | एकर | गुठें | यांतील | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| ३१ | २४ | १२ | | २/३ हिस्सा |
| व १९ | १२ | ३१ | यांतील | ४/९ हिस्सा |

असे दोन्ही हिस्सें मजला तुह्मी रकम रुपये ४५० देण्याचे ठरवून खरेदी करून देण्याच कबूल केलें व त्याप्रमाणें मागील वर्षीचे दोन्ही शेतें माझे ताब्यांत दिलीं. सदर्हू रकम देण्याचा करार असा होता कीं गेलेल्या हंगामावर १०० रुपये देऊन खरेदी करून द्यावे व पुन्हां दुसरे वर्षी १०० रुपये घ्यावे व अखेर प्रत्येक दोन सालास १२५- द्यावे त्याप्रमाणें मी रुपये घेऊन दोनचारवेळां आलों असतां आपण टाळाटाळीं केली. सबब नोटीस देण्यांत येते कीं नोटीस पावले तारखेपासून आठ दिवसांचे आंत ठरलेप्रमाणें रुपये घेऊन खरेदी करून द्यावी असें न केल्यास तुमचे रकमेचे व्याजासंबंधानें अथवा दुसरे कोणतेच प्रकारचा जबाबदार राहणार नाहीं कळावें ता० ६-७-१२ इ.

सही

भगु वा॥ गणपती पा॥ राहणार
बेलुरा बुा ता. बाळापूर पो.
पो पातूर शेखबाबु नि. आंगठा

ना. नं. ३८४

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मणजी वा॥ जाणूजी राहणार कामरगांव तालूके मुर्तीजापूर जि०. आकोला

यांसः—

खालीं सही करणार पारवती मर्द सखारामजी आणि ज्यानकी मर्द सखारामजी राहणार कामरगांव यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, आपण वऱ्हाडसमाचार मध्यें तारीख २२-६-१२ इसवी रोजीची नोटीस दिलेली पावली, त्याचें उत्तर खालीं दिलें आहे तें असे आह्मी त्रीवर्गांनीं मिळून तुमचा मुलगा नामे चंद्रभान यांस तारीख ७-६-१२ इ. रोजीं दत्तक घेतला आहे. आमचे नवऱ्याचे सर्व जिनगीचे मालक आह्मी बायका आहोंत त्या जिनगीवर तुमचा मुळींच हक्क नाहीं विशेष आह्मी तिघे खालीं सही करणार जोपर्यंत जिवंत आहोत तोपर्यंत तुमचा मुलगा चंद्रभान याचाही सदर्हू जिनगीवर कांहींच हक्क नाहीं मुद्दाम अशाच करारावर तुमचा मुलगा चंद्रभान ह्यांस आह्मी दत्तक घेतले आहे. ह्मणून आमचे नवऱ्याचे कोणतेच जिनगीशी तुह्मी कोणतेप्रकारें व्यवहार करूं नये जर केले तर तुह्मी व तुमची जिनगी जबाबदार होईल तरी या नोटीशीने कळविण्यांत येते कीं तुह्मी दत्तक मुलास रितीरिवाजाप्रमाणें वर्तन करूं देत नाहीं सबब त्याचें दत्तक पत्र आज तारखेपासून रद्द असे व त्याचे आंगावरचे डागडागीने किंमत अंदाजा रुपये १००० चे डागिने आहेत ते आपण अफरातफर करूं नये केल्यास तुमचे जवळून घेतले जाईल व आपण विनाकारण नोटीस देऊन आह्मास तसदी दिली याबद्दल नोटिशिच्या खर्चासुद्धां व आह्माला होणाऱ्या त्रासासुद्धां भरून घेतले जाईल. कळावें तारीख ७-७-१२ इ.

सही

पारवती मर्द सखाराम बांबल इचे
हातची बांगडीची नि. असे
ज्यानकी मर्द सखारम बांबल
इचे हातची बांगडी नि. असे
रा. कामरगांव ता. मुर्तीजापुर

नो. नं. ३८५

## नोटीस

नोटीस, बेशमी किसन, राघोबी कुणबी रा० अडसुल ता० आकोट पो० पंचगव्हाण यांस—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सख्खा भाऊ होता. परंतु आज ८-९ वर्षे झालीं तुला राघोबी कुणबी यांस दत्तक दिले होते व राघोजीला मरून आज सरासरी ८ वर्षे झालीं तेव्हां पासून तूं माझे जवळच आहेस. तेव्हां मी तुझे दोन गंधर्व केले त्याला एकदंर खर्च सरासरी १३०० रुपये लागला त्यापैकीं पहिल्या बायकोचे आंगावर चांदीचे डागीने ३० तोळे गुंडवाळ्या कोपरवाळ्या ३० तोळे १० तोळ्याचे गोफ ६ तोळे कंठी १० तोळे हातातील कडी व सोन्याचे डागीने ३ तोळ्याचे व दुसऱ्या बायकोचे आंगावरील चांदीचे डागीने ६९ तोळे गुडवाळे ७ तोळे तोडे पायातील ४० तोळ्याचे कोपरवाळ्या ७ तोळ्याची कंठी याशिवाय सोन्याचे डागीने १ तोळ्याच्या वाळ्या १ तोळ्याच्या पुतळ्या १ तोळ्याची सरज्याची नथ असे सरासरी ४०० रुपयाचे डागीने आहेत ७०० रुपये दोन्ही गंधर्व मिळून अवंतर खर्च लागला. व तुमची पाहिली गंधर्वाची बायको आज सरासरी ३-३॥ वर्षे झालीं आपले बापाचे घरीं गेली ती पुन्हा येणे शक्य नाहीं. व आपण ही माझेतून निराळे राहिले त्यामुळे तुझे मनांत माझे डागीने बुडविण्याचा विचार दिसतो व तुम्हीं मला तारीख १ माहे सपटेंबर सन १९११ रोजी असा करार नामा लिहून दिला आहे कीं तुमचे डागीने अफरा तफर झाल्यास माझे मालकीचे हाते येथील शेत तुमच्या ताब्यांत देईल. परंतु मी तुम्हाला त्याबद्दल झटके असतां आपण त्याबद्दल काना डोळा करतां व मुळीच मनावर घेत नाहीं व येथील शेत लावून कोढले असतां आपण येऊन त्या शेताचा पट्टा केला करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत माझे सर्व डागीने व आजपर्यंत लागलेला खर्च एकंदर १३०० रुपये द्यावे अगर करार नाम्यांत लिहीलेले शेत ताब्यांत द्यावें. वरील मुदतींत आपण कांहींच व्यवस्था न केल्यास आम्ही कोर्ट मार्फत योग्य तजवीज करूं व या नोटिशीचे खर्चा सुद्धां व कोर्ट खर्चासुद्धां आपले कडून वसूल करून घेतले जाईल कळावें तारीख ९-७-१२

सही.

बापु वा॥ गणु. रा० आरसुड ता० आकोट पो० पंचगव्हाण नि. आंगठा

नो० नं० ३८६

---

## नोटीस

नोटीस बेशमी बळीराम वल्द मारुती बोडखे रा० मौजे एकलखेड तालुका प्र० सिंदखेड ता० मेहकर जि० बुलढाणे यास—

नोटीस देणार राधी मर्द बळीराम बोडखे रा० कसबे देऊळगांव देशमुख प्र० ३ ता० मेहकर जि० बुलढाणे नोटीस देते कीं मी तुम्ही ज्याचा बायको असून तुझा माझा विवाह होण्यास १०-११ वर्षे झाली कम झाल्या दिवसापासून तूं मजला नांदवीत नाहींस. मी वयांत येऊन ३ वर्षे झाली मी नांदण्यास तयार असतां मजला नांदवीत नाहींस. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं येथें मला लोकाचे देणे रुपये २०० झाले आहे ते रुपये देऊन मजला घेऊन जावें. मी येण्यास व नांदण्यास तयार आहे ही नोटीस पावल्या दिवसापासून १९ दिवसांत तुम्ही तसे न केल्यास हाच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. करितां अगाऊ नोटिशीनें कळविले आहे. कळावें तारीख २९।६।१२

सही

नि० राधी मर्द बळीराम बोडखे इचे

नो० नं० ३८७

---

## नोटीस

नोटिस बेसमी भीगाबाई मर्द दत्तराम पा रा० मुळावें प्र० उमरखेड ता० पुसद जि० यवतमाळ यांस-

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येते कीं तुं माझी सख्खी चुलत भावजई असून मुळाव येथील सर्वे नं० ८०-९२. १२९. १७३-१७९चे जमीनीचे खातें तुमचे नांवाचे असून त्या जमीनीवर माझा हक्क संबंध आहे व तुमचे पश्चात सरळ पूर्ण असा माझे वांचून दुसरें वारीस कोणीच नाहीं तर कळविण्यांत येते कीं स्थावरमाल व शेतापैकीं कोणतेही शेत अथवा सगळी शेतें आणि गढीतील तुमची राहण्याची जागा इमरत्या सुद्धा गावांत अगर अन्यत्र असलेल्या दुसऱ्या जागा तसेच जंगम इस्टेटीपैकीं सगळी इस्टेट किंवा त्याचा थोडा भाग.

वरील तपसीला प्रमाणें जंगम किंवा स्थावर मीळकत तुम्हांस विकण्याचा, गहाण अगर बक्षीस ठेवण्याचा मुळीच हक्क नाहीं तसे केल्यास रद्द समजले जाईल पूर्वीचे विकलेले शेताच कारण आठ दिवसाचे आंत जर कळविलें नाहीं तर योग्य तजवीज केली जाईल ता० १।७।१९१२ द० गणपत सीताराम पांडे मुळावा

सही

शामराव माधवराव पाटील रा० मुळावा याची नि०

नो० नं० ३८८

---

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोकास कळविण्यांत येते कीं कसबे मुळावें येथील भीगाबाई मर्द दत्तराम पा॥ हीचे नांवें असलेली सगळी शेते व जमीन वगैरे सगळी इस्टेट माझे हक्काची आहे. म्हणून कळविले जाते कीं त्यापैकीं थोडा भाग किंवा पूर्ण मीळकत कोणी खरेदी गहाण अगर बक्षीस वगैरे घेऊ नये घेतल्यास रद्द समजले जाईल भीगाबाई गहाण, विक्री, बक्षीस वगैरे करण्यास अपात्र आहे कळावें. ता० १-७-१९१२ ई. द. गणपत सीताराम पांडे मु० ळावा.

सही

शामराव माधवराव पाटील मुळावेकर याची नी०॥

नो० नं० ३८९

---

## नोटीस

डि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १० सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—

अर्जदार

१ किसनलाल मगुलाल व २ गुलीबाई नवरें चुनीलाल गुजराथी उभयता राहणार बाळापूर तालुके मजकूर

सर्वत्र लोकास कळविण्यांत येते कीं अर्जदार यांनीं सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज आमचे कोर्टांत ता० १-७-१९१२ ई० रोजीं दिला असून त्याची चौकशीचे तारीख १२।८।१९१२ ई० रोजीं आमचे कोर्टांत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसें न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० ५-७-१९१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज्ज आकोला.

नो० नं० ३९०

---

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते की आम्हांस आमच्या मालकीचा खालील वर्णनाचा बंगला विकावयाचा आहे तर ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनी समक्ष येऊन भेटावें.—

बंगल्याचें वर्णनः—

आकोला—ताजनापेठ येथील तेली पुऱ्यांतील रा. रा. विष्णु बाळकृष्ण मराठे वकील यांच्या घराच्या पश्चिमेस असलेला बंगला सर्व आवारासुद्धां ज्यांत एक विहीर आहे आणि जेथें हल्लीं इंग्रजी दारूचें दुकान आहे. तो बंगला पूर्वी रा. रा. नानाभाई जीवनजी कंत्राटदार यांच्या मालकीचा होता. तो खरिदीच्या आधारें आम्हाकडे आलेला आहे. ता. ८ जून १९१२ इ.

सही

धनजीशा मोटाभाई दारूखानेवाले यांची कंपनी दुकान आकोला.

नो० नं० ३९१

---

## नोटीस

रा० रा० भोनाजी वा॥ म्हातारजी राहणार पुसर ता० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी ज्याची बायको नामे शेवंती ही तुमची मुलगी असून ईकडे नेण्याकरितां माझा वडिल तुमचे येथें आला असतां त्याज बरोबर तुम्ही पाठविले नाहीं. असे असून उलट तुम्ही नोटीस दिली कीं सातआठ वर्षां पासून नेले नाही हें म्हणणें अगदी चुकीचे आहे. कारण ती अज्ञान होती हल्लीं शहाणी झाल्याचे कळते. तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत माझे बायकोस तुम्ही माझे घरीं आणून घालाव. असें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल विवाय सरकार मार्फत ताब्यांत घेतली जाईल कळावें ता० १२-७-१९१२ इ०

सही.

रामचंद्र नारायण ढंगाप राहणार म्हापळ ता० मुर्तिजापुर निशाणी खुद्द

नो० नं० ३९२

---

जाहिराती करीतां जागा देणें आहे.

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला-- सोमवार तारीख २२ माहे जुलई सन १९१२ ई० [ अंक २९


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊ घेण्याची वहिवाट ठेविली आ

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील-
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचना:- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीस त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पाठीं येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट.
नं १

## मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन १९३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमान पत्रांत राहिलें बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

### जाहीर

खरे ग चष्मे. व ख घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

## नीराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगानियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

### बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिवर्धक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें व स्वरुप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ विकार. ताबडतोब दूर होतात. किं रु. १८.

### बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

### बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधां विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

## पाऊस पाऊस !!

आजकाल जिकडे तिकडे पाण्याची ओरड आहे. मेघराजाची केव्हां कृपा होईल इकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे. विहिरी तलावांचें पाणी अगदीं तळाला लागलें. एक एक मोट ओढतांना जनावरांचे प्राण कासावीस होत आहेत. अशा बिकट प्रसंगांतून बचावण्यास जर तुह्मास एकादा सोपा मार्ग पाहिजे असेल तर आमचीं **मोटेचीं लोखंडी चाकें** वापरून पहा. अनुभवा शिवाय त्यांची योग्यतां समजणार नाहीं. आज एका चाकाबद्दल मागणी करा. जास्त माहितीबद्दल क्याटलॉग मागवा.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा ).

ना० नं० ३४९

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आह्मांस आमच्या मालकीचा खालील वर्णनाचा बंगला विकावयाचा आहे तर ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यानीं समक्ष येऊन भेटावें:—

बंगल्याचें वर्णन:—

आकोला—ताजनापेठ येथील तेली पुऱ्यांतील रा. रा. विष्णु बाळकृष्ण मराठे वकील यांच्या घराच्या पश्चिमेस असलेला बंगला सर्व आंवारासुद्धां ज्यांत एक विहीर आहे आणि जेथें हल्लीं इंग्रजी दारूचें दुकान आहे. तो बंगला पूर्वी रा. रा. नानाभाई जीवनजी कंत्राटदार यांच्या मालकीचा होता. तो खरिदीच्या आधारें आह्माकडे आलेला आहे. ता. ८ जूलै १९१२ इ.

सही
धनजीशा मोटाभाई दारूखानेवालेची कंपनी दुकान आकोला.
नो० नं० ३९१

## नोटीस

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं मौजे काजळेश्वर प्रगणें कारंजा ता० मुर्तिजापुर येथील शेत स. नं. ७८ येकर १६ गुंठे ८२३ आकार रु० २६ याचे खाते शेखबाला वा॥ महंमद हुसेन याचे नांवें आहे तरी ह्या शेताचे भांडण्यांस मी स्वतः पैसा लावून शेत जिंकीले तरी ह्याचे खर्चाचे रुपयाबद्दल दिलदारखां वा॥ दुलेखां यांचा दस्तऐवज ६५० रुपयाचा असून अद्याप फेड केली नाहीं. तरी आंता दिलदारखां हा मैयत याचे वारीस ईशाकखां व महेबूबखां वा॥ दिलदारखां अज्ञान पालन करणार आई आशाबी मर्द दिलदारखां हे आहेत. तरी यांचे जवळून वरील शेत कोणी खरेदी किंवा गहाण अथवा पट्टयानें करूं नये जर कदाचित कोणी केल्यास तो रद्द समजला जाईल कळावें ता० १७-७-१२ इ०

सही.
मनसबखां वा॥ रेहेमानखां रा० हिरपूर
दस्तुर खुद्द० ता० मुर्तीजापुर
नो० नं० ३९३

## नोटीस

नोटीस बेशमी संपत वा॥ शामु माहार रा० कोयासे ता० बाळापूर जि० आकोला यांस:-

खालीं सही करणार अशी नोटीस देते कीं माझें लग्न झाल्यास आज सुमारे १०।१२ वर्षे झालीं त्या मुदतींत मी तुमचे घरीं राहत होती परंतु अलिकडे आज २ वर्षापासून मीं आपलें बापाचें घरीं राहत असुन माझ्या खाण्यापिण्याची व कपड्यालत्याची सोय माझा बापच करीत आहे. परंतु तुह्मी मला आपलें घरीं नेत नाहीं व माझ्या खाण्यापिण्याची सोय करित नाहीं तरी मी या नोटिशीनें कळविते कीं आपण मजला आपले घरीं घेऊन जावें व माझा दरमाहा खाण्याबद्दल झालेला खर्च रुपये ४ प्रमाणें २ वर्षाचा खर्च रुपये ९६ द्यावा ही नोटीस पावल्यापासुन ८ दिवसाचे आंत द्यावा व बाकीचा सर्व निकाल करावा याप्रमाणें न केल्यास मी हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन कळावें ता० १७-७-१२ इसवी

सही.
तुळशी मर्द संपत माहार रा० बाळापुर नि० दस्तुर हातचा आंगठा
नो० नं० ३९४

वऱ्हाडसमाचार.

आषाढ शुद्ध ८ शके १८३४ परिधावी

## इतिहासापासून घेण्याजोगा धडा.

सगळ्या जगाची धडपड सुखप्राप्ति आहे. पण खरें सुख कशांत आहे असा प्रश्न केला तर किती जणांची एकवाक्यता होईल? कांहीं ह्मणतील कीं खरें सुख निवृत्तींत आहे. हें सारें जग मिथ्या आहे; ऐहिकसुख हें मृगजळासारखें आहे; तो केवळ आभास आहे; त्याच्या पाठीमागें जितकें आपण धावावें तितकें तें आपणापासून दूरदूर पळतें; यासाठीं शहाण्यानें त्याच्या मागें न लागतां जें मिळेल त्यांत संतुष्ट राहून अमोलिक व अक्षयी पारमार्थिक सुखाचा लाभ जोडावा हेंच योग्य आहे असें कांहीं ह्मणतात. व्यास, नारद, याज्ञवल्क्यादि ऋषि आणि नामदेव, तुकाराम, एकनाथादि साधुसंत आह्मांस हेंच सांगत आले, आणि त्यांच्या उपदेशानुसार आमचा देश कमी अधिक मानानें हेंच ध्येय डोळ्यापुढें ठेवून शतकानुशतकें वागत आला. पण आतां पाश्चात्य देशांत भिन्न मताचा उत्कर्ष झालेला पाहून आणि त्या देशांतल्या ऐहिक ऐश्वर्यानें डोळे दिपून सुशिक्षितांचा एक वर्ग असें ह्मणूं लागला आहे कीं आमच्या देशच्या लोकांची आजपर्यंत मोठी चूक होत आली आहे. निवृत्ति हा सुखप्राप्तीचा खरा मार्ग नव्हे. ऋषि व साधुसंत हे चुकले व त्यांच्या मागोमाग गेल्यानें आमचा देश सर्वस्वी बुडाला. आह्मांला जर जगांत रहावयाचें आहे तर जगांतल्या इतर राष्ट्रांबरोबर प्रगतीच्या मार्गांतली शर्यत जिंकण्याची उमेद धरली पाहिजे, निवृत्तीचें ध्येय, डोळ्यांपुढून दूर सारलें पाहिजे. ध्यान, धारणा, मुक्ति, भजन, तत्त्वज्ञान, तीर्थयात्रा, धर्म, या सर्वांना फाटा दिला पाहिजे. या आमच्या भाविकपणाच्या कल्पनाच आमच्या नाशाला कारण झाल्या आहेत. यांनींच आमचा देश बुडाला आहे; आणि जितकें लवकर आह्मी या कल्पनांना कायमची समाधी देऊं तितकी लवकर आमची उन्नति होईल. नाहींपेक्षां आमचे कपाळीं दुसऱ्याची गुलामगिरी अधःपात कायमचा लागून राहील. निवृत्ति आणि प्रवृत्ति या दोन्हींच्या टोंकाला जाणारे असे दोन विचारी लोकांचे वर्ग सध्या दृष्टीला पडत आहेत. हें वर्गीकरण काल्पनिक नाहीं. मॉडर्न रिव्ह्यूच्या जुलैच्या अंकांत मि० हरदयाळ नांवाच्या एका लेखकानें वर सांगितलेलें प्रवृत्तिचें मोठ्या आवेशानें मांडलें आहे, आणि शेवटीं युरोपच्या सुधारणेचा इतिहास सारांशरूपानें देऊन हिंदुस्थानच्या लोकांना खडबडून जागे होण्या विषयीं मोठ्या कळकळीचा उपदेश केला आहे. मि० हरदयाळ ह्मणतात- 'जुन्या भारत रामायणासारख्या ग्रंथांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या काढण्यांत आणि वेदांचीं पुस्तकें मढीं उकरून काढण्यांत तुह्मी रममाण झालां आहां, पण तो नाद आतां सोडा, आणि समाजशास्त्रें व वस्तुशास्त्रें यांच्या पाठीस लागा. तींच तुह्मांला सध्यांच्या काळांत तारतील, राजनीति, अर्थशास्त्र, व्यापार, कला, हेच तुमचे या काळचे वेद आहेत. त्यांचें अध्ययन सुरू करा' मि० हरदयाल यांच्या या कळकळीच्या उपदेशाशीं त्यांचा सद्हेतु नसता तर अशा अगदीं एकतर्फी विचारांना आह्मी कधीं महत्त्व दिलें नसतें. पण मि० हरदयाळ व त्यांच्या सारखे देशहिताविषयीं अत्यंत आस्था बाळगणारांचे हातून मुद्दां विकारवशतः प्रमाद घडत असतात. मध्ययुगांत युरोपखंडाची अगदीं आमच्या सारखी स्थिति होती. त्यांच्यांतही संताळें निर्माण होऊन त्यानें लोकांना निवृत्तीच्या नादीं लाविलें होतें, पण पुढें तेथील लोक जागृत झाले व त्यांच्या जागृतीचा परिणाम आज त्यांचें अप्रतिम ऐश्वर्य, उद्योगधंद्यांचा प्रसार आणि सत्ता या रूपानें दिसत आहे असें त्यांचें ह्मणणें आहे. आह्मी त्यांस असें विचारतों कीं धन, राजसत्ता, उद्योगधंद्याचा प्रसार, व साम्राज्य यांनीं तरी युरोपखंड सुखी झालें आहे काय! आज त्या खंडांत राजकीय बाबीसंबंधानें राष्ट्राराष्ट्रांत चुरस लागून एकाचा डोळा दुसऱ्याच्या राज्यावर असाप्रकार दिसत आहे व सैन्यांची सुधारणा व आरमारांत वाढ करण्यामध्यें स्पर्धा चालली आहे हें सुख व समाधान यांचें लक्षण आहे काय? औद्योगिक बाबतींत कारखानदार व मजूर यांच्यामध्यें वारंवार तंटे उत्पन्न होऊन संपावर संप होत आहेत, लक्षावधि मजुरांची उपासमार होत आहे व कोट्यवधि स्त्रिया व अर्भकें निर्घृण व लोभी कारखानदारांना शिव्याशाप देत आहेत हें सुखवृद्धीचें लक्षण आहे काय? प्रवृत्तीच्या ओघांत सारख्या वाहत जाणाऱ्या युरोपखंडाला सामाजिक व कौटुंबिक सुख कितीसें मिळत आहे? किती कुमारींना जुलमानें अविवाहित राहण्याचा प्रसंग येत आहे? किती आईबापांना आपल्या मुलाबाळांचे पुढें कसें होईल ह्मणून रात्रंदिवस काळजी लागून राहिली आहे? किती लोक धर्मबंधनें सुटल्यामुळें अनीतीच्या मार्गांत वाहवत जात आहेत? ऐहिक सुखाच्या मागें लागल्यामुळें कितीजण मनाच्या शांतीसुखास मुकले आहेत? आगगाड्या, कारखाने, मोटारगाड्या, टोलेजंग प्रासाद, विजेचे दिवे वगैरे बाहेरचा भपका फार मोहक आहे खरा, पण याच्या अंतर्यामीं किती काळकूट विष भरलें आहे तें पहा, ह्मणजे खात्री होईल कीं जसा निवृत्तीच्या अतिरेकामुळें आमचा देश सर्वस्वीं बुडाला तसा प्रवृत्तीच्या अतिरेकामुळें युरोपखंडाचाही अधःपात व सत्यानास होत आहे. निवृत्तिमार्ग स्वीकरणाऱ्या आमच्या ऋषींना व साधुसंतांना जरी ऐहिक ऐश्वर्याचा लाभ झाला नाहीं तरी मनाची शांति व समाधान यांचा तरी ठेवा सांपडला. त्यामुळें बाह्यतः जरी त्यांचें दारिद्र्य दिसलें तरी अंतर्यामीं त्यांच्या सारखे सुखी कोणी नव्हते. आणि खरें सुख जें आहे तें सगळें मनावर असतें. तें जर त्यांना यथेच्छ मिळत होतें तर ऐहिक सुखाची लालसा त्यांनीं कधीं केली नाहीं यांत काय आश्चर्य आहे? यावरून प्रवृत्तीच्या मार्गाला न जातां प्रत्येकानें केवळ निवृत्तीचीच कास धरून राहावें, आणि जगांत काय चाललें आहे तें न पाहतां 'रामकृष्ण हरी' ह्मणून वरीं टाळ कुटीत बसावें असें ह्मणण्याचा आमचा उद्देश आहे असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. संतांचे व ऋषींचे मार्ग त्यांच्या सारख्या थोर मनाच्या लोकांनाच योग्य होत. आह्मी सगळेच संत होण्याच्या लायकीचे नाहीं आहों, आह्मांला व्यवहारांत वागावयाचें आहे कालमानाकडे पाहतां परमार्थाकडेच दृष्टी देऊन आमचें चालावयाचें नाहीं हें आह्मांला कळतें आहे. कालमानाप्रमाणें आमच्या ध्येयांत आह्मीं फरक केला पाहिजे, आणि ह्मणून आह्मी ह्मणतों कीं निवळ प्रवृत्तिपरही नव्हे आणि निवळ निवृत्तिपरही नव्हे असा मध्यम मार्गच आह्मांस सध्याचे काळीं श्रेयस्कर होणार आहे. आमच्या स्वतःच्या देशाच्या व युरोपखंडाच्या इतिहासापासून घेण्या जोगें जर कांहीं असेल तर तें हेंच आहे.

## शोचनीय मृत्यु.

मुंबईच्या 'इंडियन स्पेक्टेटर' पत्राचे संपादक व सुधारकाग्रणी मि० मलबारी यांस गेल्या आठवड्यांत सिमला येथें काळजाच्या विकारानें देवाज्ञा झाल्याचें दुःखदायक वर्तमान आलें आहे. मि. मलबारी हे पदवीधर नव्हते, तथापि त्यांचें वाचन, लेखनशैली, मनाची समता, सुधारणेची कळकळ आणि विशेषतः शासित आणि शास्ते यांच्यांत सद्भाव ठेवण्या विषयींचे त्यांचे अखंड प्रयत्न यांच्या योगानें त्यांचें वजन सुशिक्षित हिंदी व आंग्लो-इंडियन अधिकारी यांच्यांत इतकें होतें कीं तसें मि० दादाभाई नौरोजी यांच्या शिवाय दुसऱ्या कोणाही हिंदी गृहस्थाचें नसेल. हे जसे इंग्रजी भाषेंत निष्णात होते तसेच गुजराथी भाषेतले त्यांचे लेखही अप्रतिम आहेत. त्यांच्या लेखांत विनोद व गांभीर्य, रसिकता व सुरूचि हे गुण विशेष असत. इंग्रजी जाणणारांनीं त्यांचें 'गुजराथ अँड धि गुजराथीज' हें पुस्तक अवश्य वाचावें. ते स्वतः पारशी जातीचे असून हिंदुसमाजांतले ठळक दोष काढून टाकण्यासाठीं त्यांनीं अविश्रांत परिश्रम केले. संमति बिल पास होण्याचें पुष्कळसें श्रेय त्यांच्याकडे आहे. संमति बिलाला कित्येक सुशिक्षित हिंदु विरुद्ध गल्या पासून हिंदुस्थानच्या उन्नतीविषयीं ते बरेचसे निराश झाले होते व ह्मणूनच अलीकडे ते सार्वजनिक बाबतींत कधीं पुढें येत नसत. तथापि कोणत्याही सत्कार्याला त्यांची पूर्ण सहानुभूति व पाठिंबा असे. सेवासदनाचे ते मुख्य पुरस्कर्ते असत. कांग्रेसच्या मूळ उत्पादकांत ते होते इतकेंच नाहीं तर ही सभा स्थापन करण्यासंबंधानें प्रथम मंडळी जमली ती त्यांच्या बंगल्यांत. असें होतें तरी कांग्रेसच्या चालकांचा व त्यांचा कांहीं बाबतींत मतभेद झाल्यामुळें ते कधीं कांग्रेसला गेले नाहींत. हिंदुस्थानांत येऊन गेलेले बहुतेक व्हाइसराय व गव्हर्नर त्यांच्या निकट परिचयाचे त्यामुळें पुष्कळ देशी संस्थानिकांच्यालोगांची ह्मणजे नयो कीय भानगडी ते खाजगी रीतीनें अधिकाऱ्यांना भेटून मिटवीत असत. यांच्या मृत्यूमुळें हिंदुस्थानची मोठी हानी झाली आहे यांत संशय नाहीं. हे इतके निराभिमानी असत कीं मुंबई सरकारनें यांना दोनदां शेरिफचा मान व त्याबरोबर मिळणारा 'सर' हा किताब देऊं केला असतां त्यांनीं तो आभारपूर्वक नाकारला व मि० मलबारी असें साधें नांव धारण करून मुकाट्यानें देशसेवेचें व्रत अखंड चालविण्यांतच भूषण मानिलें. असा पुरुष एकाएकीं हरपल्याबद्दल सगळ्या हिंदुस्थान देशाला हळहळ वाटणें स्वाभाविक आहे.

## निजामसरकारचे नवे दिवाण.

निजामसरकारचे आजपर्यंतचे दिवाण राजा किसनप्रसाद यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्या जागेचा राजीनामा दिल्यावर प्रसिद्ध मुत्सद्दी पाहिले सर सालरजंग यांचे नातू सालरजंग बहादूर यांची त्याचे जागीं नेमणूक झाल्याचें ऐकून सर्वांस संतोष होईल. सालरजंग घराण्याचा निजामाच्या संस्थानाशीं पिढ्यानपिढ्या संबंध जडलेला आहे व पाहिले सर सालरजंग यांनीं मागें निजामसाहेबांच्या बालपणांत संस्थानाचा कारभार अत्यंत दक्षतेनें व मुत्सद्दीपणानें करून तो संबंध अधिकच दृढ केला आहे. नवे सालरजंग बहादुर हेही चांगले सुशिक्षित असून मुत्सद्दीपणाबद्दलचा आपल्या घराण्याचा नांव लौकिक कायम राखतील अशीच भाषा मोगलाईत सर्वतोमुखीं ऐकूं येते. सध्याचे निजाम तरुण आहेत, व त्यांना मिळालेले नवे दिवाणही तरुण आहेत. तथापि ते राजा किसनप्रसादासारख्या नेकीनें चालणाऱ्या अनुभववृद्ध मुत्सद्यांची सल्ला घेऊन राज्यशकट सुयंत्रितपणानें चालवितील अशी आह्मी आशा करतों.

## एका प्राचीन बेटाचा शोध

दक्षिण पासिफिक महासागरांत इस्टर नांवाचें एक बेट आहे. हें अमेरिकेंतल्या चिली नामक प्रजासत्ताक राज्याच्या ताब्यांत आहे. चिलींतल्या काळ्या पाण्यावरच्या कैद्यांना या बेटांत पाठवितात. या बेटांत नुकत्याच कांहीं प्राचीन इमारतींचा व मूर्तींचा शोध लागला आहे. या मूर्ति तीन पासून सत्तर फूट उंचीच्या आहेत. कांहीं ठिकाणीं त्यांचे मोडके तोडके भ[illegible]त. मूर्तींचें खोदकाम मिसर देशांतल्या प्राचीन मूर्तींच्या शिल्पकामासारखें सुंदर आहे. येथें पूर्वीं कोणाचें राज्य होतें व ह्या इमारती, तटबंदी व मूर्ति कोणीं निर्माण केल्या यांचा अद्याप पत्ता लागला नाहीं. या बेटांतली जमीन सुपीक असून येथलें पाणी तर उत्तमापैकीं आहे. या बेटांत सांपडणाऱ्या शिल्पांचें वर्णन प्रचलित अशा कोणत्याही शिल्प ग्रंथांत आढळत नाहीं. इमारतींच्या भिंतीवर व मूर्तींच्या पाठीवर कांहीं कोरीव लेख आहेत, पण त्या लेखांची लिपि अद्याप समजत नाहीं. यामुळें या बेटाचा

...हास ... प गूढ आहे. भूशा- ... कीं कित्येक लक्ष वर्षांपूर्वी **बादशाही** ...फ्रिका हीं खंडें हल्लीं प्र... ...व्हतीं. त्याच प्रमाणें एशिया ... अमेरिकेशीं जोडून होता. ... ॲटलांटिक महासागर आहे, तेथ ...ण आटलांटिक नांवाचें मोठें खंड होतें. त्याच्या दक्षिण भागीं आस्ट्रेलि-या हा देश पूर्वी फार विस्तृत होता. परंतु भूकंप आणि ज्वालामुखी पर्वताचे स्फोट यां-नीं पारिवर्तन करून मोडलें. जमीन होती तेथें समुद्र झाले. या पर्वताचीं जीं शिखरें समुद्राच्या सपाटीवर आलीं तींच हल्लींचीं बेटें होत. या ठिकाणाविषयीं अनेक शो धकांचे प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या प्रय-त्नाला यश येऊन त्याचा प्राचीन इतिहास उपलब्ध होईल तेव्हां किती तरी नव्या गोष्टी प्रकाशांत येतील.

## पहिलें हिंदी वैमानिक

आपल्या पुराणादि ग्रंथांतून पुष्कळ वि माना सारख्या विमानाचे उल्लेख आहेत. ते आजपर्यंत आमच्या लोकांना खुळ्यासार-खे वाटत होते. पण अलीकडे पाश्चात्यांनीं वि-मानाची कला साध्य करून घेतल्यापासून लोकांना त्यांच्या सत्यत्वाविषयीं थोडीशी खात्री पटूं लागली आहे, व टीकाकारांनीं आपल्या टीकेचा रोख थोडासा बदलला आहे. आतां टीकाकार ह्मणतात कीं तुमचे पूर्वज असतील कदाचित् शहाणे, पण तुह्मी त्यांचे वंशज कर्तृत्व शून्य आहां. तुमचे अंगांत कल्पकता नाहीं, धाडस नाहीं' व हिंमत नाहीं. पण हेंही त्यांचें ह्मणणें खोटें ठर-विणारें एक उदाहरण नुकतेंच घडलें आहे. म्हैसूर संस्थानांतले आसिस्टंट इंजिनिअर मि० एस. व्ही. शेटी यांनीं अगदीं नवीन पा-श्चात्य तऱ्हेचें बायप्लेन विमान तयार करून तें विलायतेंतल्या विमानशास्त्रज्ञांना दाखविलें व त्यांच्या समक्ष त्यांतून स्वतः सफर केली तेव्हां पाश्चात्यांनीं त्यांच्या कल्पकतेची वाह-वा केली. पण ही बातमी जगभर पसरण्या-स रूटरच्या बातमीदाराला संकोच वाटून त्यानें ती गोष्ट आजपर्यंत अंधारांतच ठे-विली होती. आतां कलकत्याच्या मॉडर्न रिव्ह्यूच्या संपादकांनीं मि० शेटी यांच्या या अलौ-किक कल्पनासामर्थ्याची व धाडसाची माहिती त्यांच्या फोटोसह प्रसिद्ध केलेली पाहून प्रत्येक हिंदी गृहस्थास साभिमान कौतुक वाटेल. हिंदी लोकांची कल्पकता, चातुर्य, कर्तृत्व सगळें कांहीं आश्रयाच्या व उत्तेजनाच्या अभावीं कसें अज्ञात राहिलें आहे त्याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. म्हैसूरचे महाराज आपल्या राज्यातल्या या पहिल्या वैमानिकाच्या गुणाचं कसें काय चीज करतात तें आतां पाहणें आहे.

## पेटंट औषधें.

गेल्या दहावीस वर्षांत इंग्रजी आचारा-विचारा बरोबर आमच्या समाजांत जीं कि-त्येक खुळें शिरलीं आहेत त्यांत अत्यंत हानिकारक ह्मणजे पेटंट औषधें घेण्याचें खूळ हें आहे. याला अत्यंत हानिकारक ह्मणण्याचें कारण कीं हें खूळ आमच्या गुऱ्या वित्ताचेंच हरण करीत नसून त्या बरोबर आरोग्याचीही माती करीत आहे. हें खूळ जेथून आमच्यांत आलें त्या वि-लायतेंत यानें असेंच अनर्थ केल्यावर आ-तां शास्त्रांज्ञांचे डोळे हळूं हळूं उघडूं ला-गले आहेत व ते या पेटंट औषधवा-ल्यांच्या लबाड्या लोकांच्या नजरेला आणूं लागले आहेत. पार्लमेंटांनेंही एक कमिटी नेमून तिच्याकडून बरीच माहिती व पुरावा हीं गोळा केलीं आहेत. सरकारचे रासा-यनिक पृथक्करणाधिकारी मि० हॉरिसन यां-नीं या कमिटी पुढें जी जबानी दिली आहे ती अत्यंत आश्चर्यकारक आहे. पेटंट औ-षधवाल्यांना वैद्यकाचें किंवा कसल्याच शा-स्त्राचें ज्ञान लागत नाहीं. जें काय लागतें तें भांडवल ह्मणजे निर्लज्जपणा, धाडस, वर्तमानपत्रांशीं ओळख, आणि ढोंग यांचें भांडवल लागतें, रोग्यानें स्वतःच चिकित्सा करावी, आणि भपकेदार जाहिरातीला भुलू-न आपणास कोणतें औषध लागू पडेल तें स्वतःच ठरवावें. रोग्यानें औषध घेत राहावें, आणि त्या औषधापासून अपाय झाला नाहीं ह्मणजे धन्यता मानावी. एक पैच्या औषधासाठीं आठआठ रुपये पेटंट औषधवाले ओढतात यावरुन त्यांच्या जबर प्राप्तीची कल्पना कोणालाहि करतां येईल. कित्येक पेटंट औषधांतून तर पाऱ्यासारखीं भयंकर व दुसरीं विषारीं औषधें असतात. असल्या औषधांच्या पायीं किती जणांच्या वित्ताची ओरोग्याची हानी दरसाल होत आहे त्याची कल्पना करवत नाहीं. मि० हॉरिसन यांच्या जबानींतला हा सारभूत भाग हिंदुस्थानालाही पुष्कळ अंशा-नें लागू आहे. पेटंट औषधांतली लबाडी कमी करण्यासाठीं त्यांनीं एक युक्ति सुचविली आहे. ती अशी कीं पेटंट औषधांत कोणकोणतीं द्रव्यें किती प्रमाणांत आहेत तें बाटलीवर स्पष्टपणें जाहिर कर-ण्यास कायद्यानें भाग पाडावें व सरकारी इन्स्पेक्टरांनीं मधून मधून त्याची तपासणी करावी. यांत कोणाची लबाडी आढळून आल्यास त्याला जबर शिक्षा ठोठवावी. ही सूचना चांगली आहे. पार्लमेंटरी कमि-टीच्या रिपोर्टावरून ब्रिटिशसरकार पेटंट औषधाचें बंड मोडण्यासाठीं कोणते उपाय करतें तें पाहावें.

## हेमाडपंती नीति.

मोडी लिपीचा मूळ ... हेमाडपंत यांनीं प्रपंच करून परमार्थ कसा साधावा याविषयीं कांहीं नीतिपर उपदेश लिहून ठेविलेला हल्लीं उपलब्ध झालेला आहे. तो अनेक दृष्टीनीं महत्वाचा असल्यामुळें पुढें दिला आहे. तो असा—

" बहुत पुण्य करून देवगतीनें पापपुण्य समान होतां नरदेहाची प्राप्ती त्याहीमध्यें श्रेष्ट ज्ञातींत जन्म साधल्यास सार्थकता करावी. तें गुरुकृपेविना होणें नाहीं. ह्मणून सद्गुरु-चरण धरावे. गुरुकृपा जाहलीयावर प्रथम धुळाक्षरें, गुणाकार, भागाकार, बेरजा, तेरजा कर्दन ग्रस्त, वरावर्दी, जमाखर्च मसुदे करूं शिकावें. कांहीं पाठांतर, गायन, श्लोक, सुभाषित, शास्त्र, वेद, अवगत असो द्यावे. कर्ममार्ग ध्यानास आणावा. इतकें गुरुकडों साधन झालियाव संतसमागम चांगला धरावा. अनेक भाषा शिकाव्या. नानातर्क करूं अवगत असो द्यावें. वस्त्रें सोज्वळ असो द्यावीं. स्नान, संध्य, जप, देवतार्चन, करितां चित्त स्वस्थ असो द्यावें. ह्मणजे ईश्वर कृपा करील. पुरुषानें हुन्नर शिकावे. थोराशीं कार्यावेगळें भाषण नसावें. व्रतनेम चालवीत असावें. मातापिता यांची मर्यादा बहुत ठेवित जावी. आपले आप्तवर्ग वडील असतील ते पितृस्थानीं मानावे. नीच भले ओळखावें. कार्यकारण कार्य प्रयोजनीं उदारत्व धरावें; फंड संपादावा; जमाखर्चीं सावध राहावें. अभ्यास करतां सर्व अर्थ होतील. शालक संग्रहीं नसावा. प्रपंचीं सावधता असों द्यावी. आप्तजनांचा सांभाळ करावा. प्रपंचीं असतां न्याय पाहावा. अन्याय पाहिल्यास कोणाचा मुलाजा न धरावा. सदोदित आनंदरूप असावें. दूरदृष्टि असों द्यावी. काळ सारखा चालणार नाहीं. सर्वांभूतीं ईश्वर असें जाणोन कोणाचा मनो-भंग न करावा; शिष्टांचे सभेत बसत गेल्यास शिष्टपणा येईल. संशय नाहीं. प्रवासीं जवळ धन संग्रहीं ठेवीत जावें. त्याची वाणवत्य असावी. जे वेळेस जसें मिळेल तसें गोड ह्मणावें. व्यवहार संबंधीं खरेपणा दुसऱ्यासी पत राखावी. कार्याविना कोणाचे घरीं न जावें. उत्तम कार्य अस-लीयासी जावें. संसार नीतीनें केल्यास यांतच प्रपंच परमार्थ होऊन अंतीं सुख वरद फळ होतें. अन्नदानीं पात्रापात्र विचार न करतां जो येईल त्यास द्यावें. संशय न धरावा. अशा मार्गानें वर्तणूक करतां ईश्वर पांडुरंग संकटी पडू देणार नाहीं हे बुद्धी हेमाड-पंतीं सांगितलीजे." हें पत्र लहानसेंच पण अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण कीं यावरून प्राचीन काळीं आमच्या महाराष्ट्रसमाजांत शिक्षणपद्धति कशी होती, शिक्षणाचा कोणता आदर्श लोकांच्या पुढें होता, व्यवहार कशा प्रकारचा असे, शिष्टाचार कसे होते, परमार्था विषयींच्या कल्पना कशा होत्या, दानधर्माच्या मुळाशीं कोणता हेतु असे, गृहव्यवस्थेचीं मुख्य मुख्य अंगे कोणतीं मानलीं जात असत ४० अनेक गोष्टींवर या पत्रानें थोडाबहुत प्रकाश पडतो. अशीं अनेक नीतिपर पत्रें शोधून काढून तीं नीट लाविल्यास तत्कालीन महाराष्ट्रसमाजाच्या अं-तःस्थितीचें पुसट तरी चित्र डोळ्यांपुढें उभें राहील.

## उपासना

श्री शिवगंगा संस्थानचे अधिपती श्रीज-द्गुरु सच्चिदानंद स्वामी यांचें तिसरें जाहि-रव्याख्यान गेल्या मंगळवारीं झालें. सभा पणाचा विषय उपासना व तदनुषंग मूर्ति-पूजा असा होता. या दिवशीं श्रीस्वामी महाराजांनीं आपल्या ज्ञानभांडारांतील उत्तम उत्तम महा रत्नें श्रोतृसमाजापुढें मांडलीं दीड तासभर सर्व सभागृह तटस्थ व एकाग्र होतें. प्रारंभीं उपासनेचे दोन भाग विद्यो-पासना व अविद्योपासना अशी फोड सांगून एक भाग दुसऱ्या भागाकडे कसा सोपान-पंथ होतो हें सांगितलें. द्वितीय भागांत येणाऱ्या चतुर्विध योगांची ह्मणजे राजयोग, हठयोग, मंत्रयोग व लययोग यांची समजूत घालून या चाऱ्ही योगांचा भिन्न भिन्न प्रकृतींच्या माणसांस कसा उपयोग होतो तें स्पष्टपणें उदाहरणांनीं मांडलें. योगाचा कटाक्ष चित्तवृत्तिनिरोधाकडे असतो तेव्हां तो निरोध करितांना हृदयकमलांत चित्त स्थिर करण्याचा मार्ग दर्शवितांना मनुष्य देहांतील चक्रांची माहिती दिली. षट्चक्रांचा स्थळ निर्देश करितांना भ्रूमध्यस्थानीं खरें दलकमल आहे तेथें चित्ताचा निरोध करण्याचा मार्ग सोपपत्तीक सांगून गायत्री मंत्राची महती समजावून दिली. हा मंत्र गुरुमुखानें शिकावा आणि गुरुमुखाशिवाय गायत्रीला मंत्रशक्ति किंवा योगशक्ति येत नाहीं असें त्यांनीं मोठ्या बहारीनें प्रतिपादित केलें. परमेश्वराचा साक्षात्कार होण्याला ऋग्वेदांच्या संहितेनें आव्हान' यजूर्वेदद्वारा, यज्ञ, अथर्वद्वारा दिग्बंध, व साममंत्रांनीं गायन अशा चतुर्विध उपासनेची समाप्ति मंत्रपुष्पानें करावयाच्या मार्गाचें दिग्दर्शन केलें.

उपासना करण्याचें साधन ह्मणजे हा देह. हा देह ह्मणजे देऊळच होय. त्या नंतर पुष्कळशा विस्तारानें देह व देऊळ यांची तुलना फारच सुंदरपणें करण्यांत आली सर्व सांख्यदर्शनाची मीमांसा सहजगत्या या तुलनेंत गेली. त्या नंतर स्वामी महाराज मूर्तिपूजेकडे वळले. मूर्तिपूजा सर्व धर्मांच्या विचारांत कसकशी प्रसृत आहे हें सांगून मूर्तिपूजा ही पाहिली पायरी आहे आणि या मार्गानेंच ईश्वराचें प्रणिधान साध्य होतें. शाखाचंद्र न्याया प्रमाणें मूर्तिपूजा हीच शाखा आणि इच्या सहाय्यानें ईश्वरी चंद्राचें दर्शन घेण्याचा क्रम आहे. किंवा नूतन परिणत वधूवरांस अरुंधतीचें शुभ दर्शन करवितांना जसा स्थूलतारा न्यायाचा अवलंब करावा लागतो तद्वत्च मूर्तिपूजा ही स्थूलतारा असून तिचें सहाय्य घेऊन परमेश्वराचें शुभ दर्शन घ्यावयाची वेदप्रणीत पद्धति आहे. शेवटीं समारोप करितांना आपल्या पीठाचा अभिमानानें निर्देश करून अत्यंत मंजुल, मंगल व कल्याणमय आशीर्वचनांनीं सर्व सभाजनांचें किंबहुना सर्व वऱ्हाड प्रांताचें अभिष्ट व श्रेयस श्रीशारदाम्बे पाशीं सदोदित चिंतीत राहण्याचें आपलें जीविताचें कर्तव्य आहे असें श्री जगद्गुरुंनीं सदगदित कंठानें कळविलें तेव्हां त्या थोर उदार महात्म्याची महापूजा सर्वांनीं आपापल्या मनामध्यें आनंदोद्गारांनीं फार उत्कृष्टपणें केली.

## प्रयाण

श्रीजगद्गुरु महाराजांनीं ही नगरी पावन केली आणि त्यांचा मुक्काम येथें शनिवार पर्यंत लांबला ही सार्वजनिक आनंदाची व महोत्सवाची गोष्ट झाली, कांहीं धनिक नागरिकांनीं आपापल्या घरीं श्रींची पूजा करण्याचा योग साधला, आणि इतरे जन श्रीराजेश्वरीं त्यांच्या छावणींत जाऊन त्यांच्या दर्शनाचें पुण्य संपादित होते. मोठ्या अभिमानाची गोष्ट कीं श्री स्वामी महाराज फार उदार विचारांचे आहेत, त्यांच्या वर्तनांत इतर धर्माविषयीं सारखाच पूज्यभाव जागृत आहे, आणि कळकळ दशा

अन्वयें व्यवहार व रूढी यांचेंहि प्रवर्तन करण्याकडे श्रींचें लक्ष्य विशेष दिसते. समाजाची प्रगती करून देणारा ज्ञातिविशिष्ट धर्म व सदाचार हीं त्यांचीं श्रेष्ठ ध्येयें आहेत. अशा सत्पुरुषाचा समागम लाभला हीं आकोलेकरांची पूर्व पुण्याई होय.

## धर्मासन.

श्री जगद्गुरुपुढें एक गूढ प्रश्न आलेला आहे. त्यांचा निकाल संकेश्वराच्या आधिपतींनीं पूर्वी केलेला आहे तथापि त्यावर अपिला दाखल तो प्रश्न येथील कांहीं धर्मोळु लोकांनीं पुनः उपस्थित केलेला आहे. प्रश्न असा कीं येथील बेडर ह्मणून नाणवलेल्या ज्ञातीं मध्यें एक श्रेष्ट वर्ग आहे त्यांतील लोकांचें आचार विचार जवळ जवळ दक्षिण महाराष्ट्रांतील मराठे लोका प्रमाणें शुद्ध असतात. त्या शिवाय राजदरबारांतील त्यांचें हुद्दे वगैरे उच्च आहेत त्या लोकांचे दळण वळणाहि समाजांतलि उच्च वर्गांबरोबर अशा प्रकारानें होत असतें कीं त्यांस अस्पृश्य लोकांप्रमाणें बाह्य व दूर टाकतां येत नाहीं. या बेडर मंडळींचा पूर्व इतिहास पाहून व टीपुसुलतानाच्या वेळची त्यांची अवनति लक्ष्यांत घेऊन संकेश्वराचे श्रींनीं त्यांस पुन्हा मराठे ज्ञातींत पावन करुन घेतलें. हा पावन करण्याचा प्रश्न श्रीजगद्गुरुं पुढें पुनः आलेला आहे. पूर्व पक्षांचे साक्षीदार रुजूं होत आहेत. या प्रकरणाची पुढील तारीख २२ आगस्ट आहे.

श्री जगद्गुरुंची स्वारी शनीवारीं येथून मूर्तिजापुराकडे रवाना झाली. चातुर्मासा करितां त्यांचा मुक्काम उमरावतीस होणार आहे.

# वऱ्हाड वृत्त.

हवामान— गेल्या बुधवार पासून चालू झालेला प्रस्तुतचा पर्जन्य सार्वत्रिक असून हवेंत गुलाबी थंडोसा येत आहे. बीं कोठें कोठें भूमिगत होत आहे कांहीं स्थळीं प्ररोहाच्या स्थितीला पोंचलें आहे आणि नूतन तृणें पृथ्वीला नवी शोभा आणीत आहेत. रानराई नसून सर्व खळमळ या पाण्यानें वाहून जाईल. सार्वत्रिक आरोग्य फार सुंदर आहे.

रा. रा. बी. पी. स्टांडन कमिशनर साहेब यांची स्वारी वार्षिक तपासण्या निमित्त येथें आली असून लांब धाग्याच्या कापसाचें बीं सार्वत्रिक करण्यासाठीं त्यांनीं या जिल्ह्यांतील प्रमुख शेतकरी मंडळीस समक्ष बोलावून अगत्याच्या गोष्टी समजावून दिल्या. हे आज उमरावतीस जातील.

यंदा वऱ्हाडची विद्यापरिषद् आकोल्यास भरणार आहे तेव्हां हा योग साधून येथें महाराष्ट्राचीं ‘साहित्य परिषद्’ भरवावी असा विचार रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं मंडळी पुढें मांडला आहे.

रा. रा. जानस्टन असि. पोलिस सुपरिनटेंडेंट यांची बदली परत खामगांवास झाली.

लेफटेनंट जे. राबर्टसन सिव्हिल सर्जन यांस यवतमाळास नेमून असि. सर्जन रा. रा. गिरजा शंकर शुक्ल यांस वाशीमास बदलण्यांत आले.

## नोटीस

नोटीस बेशमी सांबा बापु कुणबी तिरले कुळमोऱ्या राहणार गुळगांव परगणे भांदक तहसील वरुडा जि० चांदा यांस—

खालीं सही करणार इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज सुमारे १३ वर्षें झालीं मी आपले भावाच्या आश्रयाखालीं राहून मोलमजूरी करून आपला उदरनिर्वाह करिते. भावाची स्थिति फार गरीबीची असल्यामुळें व मजूरी बरोबर मिळत नसल्यामुळें आजपावेतों ५०० रुपये कर्ज झालें आहे. हल्लीं जास्त खर्च झाल्यामुळें कोणी सावकार कर्ज देत नाहीं. व तुह्मी आपले प्रांपचोचेसोयीकरितां आणखी दोन बायका केल्या सबब तमची मजवर श्रद्धा नाहीं व त्यांच्यांत पटत नसल्या कारणांनीं तुह्मी मजला आपले घरीं नेऊन नांदवीत नाहीं तरी मी तुमचे घरीं नांदण्यास तयार आहे आज तेरा वर्षांपासून आपली सारखी वाट पाहत आहे. परंतु आपण मला येऊन घेऊन गेला नाहीं ह्मणून नोटीस देण्यांत येते कीं, नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजवर असलेल्या कर्जाचा निकाल करून व उत्तम प्रकारें नांदवीन असा योग्य जामीन देऊन आपण मला घेऊन जाल अशी उमेद आहे. मुदतीचे आंत वर लिहिलेल्या गोष्टीचा निकाल न केल्यास लग्नासंबंधी तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं आणि लग्नासंबंधी लागलेला खर्च वजा जाता बाकी राहिलेल्या रुपयाचा योग्य दावा करीन. मुदती नंतर नोटीस हीच सोडचिठ्ठी समजून आपले उदरनिर्वाहाचे सोयींकरितां हिंदुधर्माप्रमाणें दुसरा गंधर्वाचा नवरा करीन पुढें कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. कळावें ता० १४-७-१९१२ इसवी

सही

सहीची निशाणी कली जवजे सांबा कुणबीण राहणार वणी ता० वणी जि० यवतमाल इचे हातची बांगडी असे.

द० गोविंद लक्ष्मण कुणबी राहणार वणी द० खु०

नो० नं० ३९८

## नोटीस

नोटीस बेशमी गोविंदा वल्द मानाजी चांभार रा० सवनगांव ता० वैजापूर पो० वैजापूर यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न लागून सरासरी ८-१० वर्षें झाली, व आज सरासरी तीन वर्षें झाली तुह्मी मजला टाकून दिले आहे. तेव्हांपासून मी आपले बापाचे घरीं आहे. माझा बाप गरिब असल्यामुळें मला दरमहा माझे पोटखर्चाबद्दल ८ रुपया प्रमाणें दरसाल खर्च लागला तर तीन वर्षाचे ३०० रुपये कर्ज झाले आहे. करितां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं नोटीस पावले पासून १५ दिवसांचे आंत ३०० रुपये देऊन मजला घेऊन जावे. अगर फारकती द्यावी. वरील मुदतींत आपलेकडून कांहींच व्यवस्था न झाल्यास मी हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन व मग आपला नवरेपणाचा हक्क मजवर मुळींच राहणार नाहीं. व ३०० रुपयाबद्दल व या नोटीशीचे खर्चाबद्दल आपलेवर कोर्ट मार्फत योग्य तजविज केली जाईल. कळावें. तारीख १७-७-१२ इ०

सही

लक्ष्मी मर्द गोविंदा चांभार राहणार बार्शिटाकळी ता० अकोला पो० बार्शिटाकळी नि० आंगठा.

नो० नं० ३९९

## हक्क संबंध असणारे अनेक इसमापैकीं एका इसमाकडून अगर त्याच्या विरुद्ध दावा दाखल झाल्याबद्दल जाहिरात

(कानू ८ आर्डर १ ॲक्ट ५ सन १९०८)

दिवाणी मुकदमा नंबर १९८ सन १९१२.

विद्यमान मुनसिफ कोर्ट यांचे कोर्ट. मुक्काम खामगांव.

वादी.

१ न्यामतखा बिलनखा व २ खानसाहेब भोलेखा

प्रतिवादी.

मनोहरदास वगैरे

दावा— अप्रक्रिये बद्दल

नांव खामगांव येथील सर्व मुसलमान लोक.

तहसिल खामगांव जिल्हा बुलडाणा यांस ज्या पेक्षां सदरील मुकद्दम्यांत हक्क संबंधा असणारे अनेक इसम आहेत, आणि सदर्हू मुकद्दम्यांत तसे हक्क संबंध असणारे सर्व इसमा तर्फे दावा आणण्यास

(१) न्यामतखा बापाचे नांव बिलनखा जात मुसलमान राहणार खामगांव तहसिल खामगांव जिल्हा बुलडाणा

(२) खानसाहेब भोलेखा बापाचें नांव लालखां जात मुसलमान राहणार खामगांव तहसिल खामगांव जिल्हा बुलडाणा

यानी या कोर्टाची परवानगी घेतली आहेः त्या पेक्षां तुह्मास नोटीस देण्यांत येत आहे कीं, तारीख १७ मांहे ६ सन १९१२ ई० रोजीं सदर्हू दावा या कोर्टात दाखल झाला आहे. व त्याची ८-८-१९१२ तारीख नेमली आहे. आज तारीख १० माहे ७ सन १९१२ इ० रोजीं आमच्या सहीनीशी व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का. के. के. गर्दे. मुनसिफ. खामगांव.

नो० नं० ४००

गेनाजी वल्द गणु, हरी म...
...ांसमक्ष सांगितले. करि...
कळविण्यांत येतें कीं, तुह्मांस...

जाहिरा... पासून १५ दिवसांचे आंत

सर्वत्र शेट, ... देण्याची तिथी नेमून कावून द्यावे... केल्यास रीतीप्रमाणें

...ल. व धृपती इजल...
... व कोणी व...
...रा जबाबदार ...
केल्याबद्दल

मी पुती मर्द ... रा० पळसीसुपो ता० ... बुलडाणा. कळविण्यात येते ... चाहादु हा माझा लग्नाचा नवरा ... याजपासून मजला मुली, नामे भागी, गंगी, तानी असे झाले असून सांत ७ वर्षां पासून राघो हा नापत्ता झाला असून न वरील मुलीचें लग्न मी स्वतः केलें असून सावकार लोकांची कर्जदारीन झाली असून राघो यांचा शोध केला असतां, पत्तां लागला नसून, व येतांही दिसत नाहीं. सावकाराचें कर्ज देण्याकरीतां माझे जवळ, कोणतेहीं तऱ्हेची ईस्टेट नसून व त्याचें वती माझे कोणी पाळण पोषण करण्यास कोणी नाहीं. करितां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं. नोटीस प्रसिद्ध होतांच १५ दिवसाचें आंत ज्यास बातमी मीळेल किंवा ज्याला माहीती असेल. त्यानें मजला वरील पत्यावर कृपा करून कळवावे. नाहींतर मी वरील मुदत संपल्यावर दुसरा घरठाव करीन. मग त्याचा मजवर नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. कळावें ता० ८-७-१२ इ० मु० खामगांव नारायण वा॥ निंबाजी भगवान रामजी.

सहीची

नि० पुती मर्द राघो मानकर इचे हतची असे.

नो० नं० ४०१

## नोटीस

नोटीस बेशमी चिमणाजी भडके आजेगांवकर रा० कळंबे माहाली, ता० वाशिम जि० आकोला यांसः-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची गंधर्वाची बायको आहे. गंधर्व लागून सरासरी २॥ वर्षें झालीं मी एक महिनाभर तुमचे घरीं राहून, तुह्मी मजला मारहाण करून डोंगरकिन्ही येथें माझ्या बापाच्या घरीं आणून घातलें, तेव्हां पासून मी आपलें बापाचें घरीं आहे. मी तुमच्या जवळ राहण्यास खुशी आहे. करितां मी आपणास मजला घेऊन जाण्याविषयीं पुष्कळवेळां कळविलें व मागील सालीं तुह्मांस नोटीसही दिली होती परंतु त्याचा कांहीं. उपयोग झाला नाहीं करितां आपलें मनांत माझ्याशी संसार करणें नाहीं असें यावरून समजते करितां या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावले पासून १५ दिवसांचे आंत आमर्यंतच्या माझ्या खावटी बद्दल रुपये १२१ माझे बापास देऊन मजला घेऊन जावें, अगर फारकती द्यावी असें तुह्मी वरील मुदतींत न केल्यास तुमचा नवरेपणाचा हक्क मजवर मुळींच राहणार नाहीं व मी हीच नोटीस फारकत समजून दुसरा गंधर्वाचा नवरा करीन कळावें तारीख १६-७-१२ इ०

सही.

गिरजी मर्द चिमणाजी भडके रा. डोंगरकिन्ही ता० वाशिम पो० शिरपूर नि० आंगठा

नो० नं० ४०२

# [illegible] कली औषधानें फसूं नका.

"बादशाही याकुती" बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चादलीआ यानाच आहे.

डॉक्टर चांदलीआ कृत प्रसिद्ध झालेलीं औषधें नपुसकत्व, नामर्दाई व नेभळेपणाची समुळ नाश करून तारुण्यदशाची छटा फमटवून पूर्ण तरतरी व जोम आणणारी

## "बादशाही याकुती"

( सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. )

ही ' याकुती " आजकाल कमताकत झालेल्या दुनियेला एक ईश्वरी प्रसादच आहे. शिथिल झालेल्या शिरांना जोमदार बनविण्यात गेलेली स्फुरण शक्ति परत भरपूर सजीव करण्यांत, आविचारानें धातुपात केल्यामुळें लहान वयांतच दिसणारी म्हातारपणची सर्व चिन्हें दूर करण्यांत स्वप्नावस्था व लघवींतून जाणारी धातु बंद करण्यांत, विर्य वाहिन्यांना भरपूर विर्य पुरविण्यांत " बादशाही याकुती " ह्मणजे एक अमृत आहे. किं. डबी १ ची रु. १०

गुप्तावयवांची कमजोरीवर प्रासिध्ध "पुरुषार्थ लेप" किं० रु० २५ जास्त माहितीसाठीं हकीकत लीहा.

पत्ता:-- चांदलीआ आणि कंपनी काळ्का देवी रोड मुंबई.

नो. नं. ३३१



# जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!




ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत. शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुंखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गुण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळाविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबात नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गुण आमच्या तपकीरींत एक वर्षेपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार कराविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाण:—

गुरुबसवा आणि कंपनी, सावकार पेठ, मद्रास.

नो. नं. ३०७


## नोटीस

नोटीस बेशमी अंताजी वल्लद शिवरामजी तेली अडनांव अंबाडे रा० ता० मुर्तिजापूर जि० आकोला यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा गंधर्वाचा नवरा आहेस. व गंधर्व होण्यास आज सरासरी ५ पांच वर्षे झालीं आहेत. मला तूं एक वर्षपर्यंत वागाविले नंतर मला बरोबर न वागाविता मारहाण करीत होतास. व तूं दुसरी बायको करून तिजबरोबर संसार करूं लागला मला माझे बापाचे घरीं पाठऊन दिले त्यास सरासरी ४ वर्षे झालीं तरी मजला नेत नाहींस व माझे खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवित नाहीं. मला एक मुलगी आहे. तिचे लग्नही माझे बापानेंच केले व आजपर्यंत त्याने आह्मा दोघींला सावकाराचें कर्ज काढून पोशिले आतां कोणी कर्ज देत नाहीं तरीं या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं आजपर्यंत झालेले कर्ज देऊन मला नोटीस पावलेपासून आठ दिवसाचे आत न्यावे असे न त्यास मजवर तुझा कोणतेंच प्रकारचा नवरेपणाचा हक्क न राहतां मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन. मग तुझी कोणतेच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. व झालेले कर्ज दिवाणी कोर्टमार्फत फिर्याद करून वसूल केले जाईल ही नोटीस दिली कळावें. ता० ११।७।१२ दस्तूर बाळकृष्ण गोविंद.

सही

कासी मद अंताजी तेली रा० धामणी इचे हातची बांगडी असे.

नो० नं० ३९५

## नोटीस

नोटीस बेशमी सोनाई मर्द लोढी आल्हाट भीरे माळी व महादु हरणकार रा० पिंपळडोई ता० बाळापूर जि० आकोला यांना—

मी खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येतें कीं रामु वा। तुकाराम हरणकार रा० कारल ता० बाळापूर यानें ता० १८।४।१२ इ॥ रोजीं धृपती इची तुह्मी फारकती पांच लोक नामे नारायण दवलत, गोपाळ चुडामण, उकर्डा वल्लद रामजी, मारुती लक्ष्मण, जानु कृष्णाजी यांचे समक्ष केले व॥ खंडु महार यांचें हातानी फारकती लिहून व मारोती वल्लद लक्ष्मण लाड याचे मार्फतीनें आह्मी तुह्मांस २४० रुपये देऊन माझा पुतण्या नामें सखाराम राघोजी पारसकार यांस गंधर्वानें वरील पंचा समक्ष धृपती तुमची मुलगी देण्याचें कबुल करून, नंतर इचे वरील फारकतीबद्दल रुपये २४० दिले असून एक महिन्यानें गंधर्व लावण्याचे वरील पंचा समक्ष कबूल केले असून त्या करारास २-२॥ महिनें झालें असून तुह्मी धृपती इचे गंधर्व लावून देत नाहीं. ह्मणून आह्मी तुमचें घरीं २-४ वेळीं पंचलोकांसह आलो असून गंधर्व लावून द्यावे. ह्मणून ह्मटलें असतां आह्मी गंधर्व लावून देत नाहीं. असें पंच लोक नामें सोनाजी वल्लद जानजी, सोनाजी वल्लद गणु, हरी माडोकार वगैरे लोकांसमक्ष सांगितले. करितां नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मांस नोटीस पावल्या पासून १५ दिवसांचें आंत गंधर्व लाऊन देण्याची तिथी नेमून लावून द्यावे. तसें न केल्यास रीतीप्रमाणें तजविज केली जाईल. व धृपती इजला गंधर्वानें कोणास देऊं नये. व कोणी करूं नये. केल्यास करणारा जबाबदार राहील. व तुह्मावर ठगबाजी केल्याबद्दल रितीप्रमाणें दावा आणून कोर्टखर्च व नोटीशीचा खर्च तुह्मापासून वसूल केला जाईल. कळावें. तारीख ८-७-१९१२ इ०

सही

दर्याजी वल्लद तानाजी पारसकार रा० पहुरजिरे ता० खामगांव याचे हातची निशानी असे.

नो० नं० ३९६

## नोटीस

बशेमी झाबु वल्लद चिहु जात कुणबी रा० पळसोद ता० व जि० आकोला यांस—

खालीं सही करणार पांजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, गुजी ही माझी सखी पुतणी असून ती तुमची गंधर्वाची बायको आहे. तिच्याशीं तुमचें गंधर्व होऊन आज सरासरी ६ वर्षे झाली गंधर्व झाल्यावर तुह्मी तिला ३ वर्षे पर्यंत मारहाण करून व त्रास देऊन वागाविले. तिला तो त्रास असाह्य झाल्यामुळें ती माझे घरीं आल्यावर मी तिला निराळें ठेऊन दिले. त्याउपर तुह्मी तिला नेण्यास आले असतां आह्मी तुह्माला असें सांगितले कीं, तिला तुमची आई मारहाण करते व तुह्मीही आईच्या सांगण्या प्रमाणें ऐकतां तुमची आई तिच्यावर नसते कुभांड रचून फार त्रास देते; तर त्याचा आधण बंदोबस्त करावा ह्मणजे आह्मी तिला पाठावितो, ह्मणून सांगितले परंतु तो तुह्मी केला नाही उलट आईचे सांगण्यावरून गुजी इचे जिवास अपाय करूं पाहतां. यावरून तुह्मांस या नोटीशीनें कळवितों कीं माझी पुतणी गुजी इनें आज ३॥। वर्षे पर्यंत सावकारांचें कर्ज काढून आपला उदरनिर्वाह केला. आतां तिला कोणी कर्ज देऊं शकत नाहीं. करितां ही नोटीस पावल्या दिवसांपासून १५ दिवसांचे आंत सावकारांचे कर्ज झालेलें रुपये २५० व्याजासह देऊन, तिला कोणतेच प्रकारचा त्रास देणार नाहीं. याबद्दल आह्मांस योग्य जामीन द्यावा. असे न केल्यास तिला दुसरा घरठांव करून देऊं. मग तिजवर तुमचा कोणतेच प्रकारचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. सावकाराचे रुपयांबद्दल व नोटीशीचे खर्चाबद्दल रीतसर तजविज करण्यात येईल कळावें ता० १७-७ १२

सही

नन्हीं कृष्णाजी काळे राहणार आकोला. निशाणी हातची रेघ.—

नो० नं० ३९७

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

**सौंदर्य**

**आरोग्य**

**थोडा खर्च**

**जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.**

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतात:—काळे डाग, संधिवात शांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, आगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

**तर स्वतःचाच राजवैद्य बनून**

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

**डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—**

## आयोडाईझड सार्सापरीलानें

**ते निखालस बरे होतात.**

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

**अनुभवतर पहा.**

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

---

## बालामृत हे काय आहे ?

**अस्सल बालामृत हें**

**मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगांवर अमोलिक उपाय आहे**

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारे रोग, कंडू, आंकडी वगैरे.

ड० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. ०१२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ता:--हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुबई नं. ४ नो. नं. २८७

---

## जवानी

दुसऱ्या औषधाशीं तुलना केल्यास नंबर १ चें

**भीमसेनी बळ**

व

**तारुण्यांतील शक्ती गेली असल्यास**

ताबडतोब आमच्या १ रुपया किंमतीच्या नामांकित शक्तिवर्धक औषधाचा

**उपयोग करा**

व मग पहा कीं दहा दहा व पन्नास पन्नास रुपये किंमतीच्या याकुतीपासून जास्त फायदा आहे कीं आमच्या रुपया किंमतीच्या औषधापासून जास्त फायदा आहे ? आमचें औषध वापरणारांकडून त्यास त्याच्या गुणाप्रमाणें

**मेलेल्यास जिवंत करणार**

हा किताब मिळाला आहे.

आणि तुह्मांस वापरल्यावर खरें तेंच कळून येईल.

हें औषध ज्या वस्तूपासून बनविलेलें आहे ती वस्तू दुनियेंतील हकिमांचें राजे लुकमानी याच्या औषधापैकीं एक पहिल्या नंबरचें औषध आहे.

ज्यामुळें तुमची गेलेली शक्ती--तारुण्यांत आलेली दुर्बलता गात्रांची शिथिलता आजारीपणामुळें अंगांतील कमी झालेलें रक्त तुह्मांस प्राप्त होईल.

गरीबांनीं वापरून आह्मांस आशीर्वाद द्यावा ह्मणून ४० गोळ्यांच्या शिशीस किंमत १ च रुपया ठेविली आहे. पोस्टेज वेगळें. लेपाची शिशी पाहिजे असल्यास तिचीही किंमत १ रुपया आहे करिता दुसरें औषध घेण्यापूर्वीं ह्या औषधांचा उपयोग करण्यांस चूकू नका.

पांच रुपयांचीं औषधें घेणारास गोळ्यांच्या २ शिश्या बक्षिस देऊं. दुसऱ्या, कित्येक जबरदस्त रोगाकरितां आमच्याकडे अस्सल युनानी औषधें मिळतील व त्याबद्दल माहिती पत्र आल्यास कळवूं.

एम. ई. हकीम.
सिधपूर, नॉर्थ गुजराथ

---

धी बॉम्बे टाइल कंपनी

= आरस पराण =

जमीनीवर बसविण्याच्या रंगीत छाया दगड आणि सीमेन्ट विकणार.

आमच्या मालाची खात्री करून घ्या.

| उत्तम माल | स्वस्त भाव |
|---|---|

१६७ डंकन रोड मुंबई नंबर ४

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतता येत नाही.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस, हार्नबी रोड मुंबई. } रा. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवर्ह्वाड नो. नं. १

---

## Oriental Govrnment Security LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.
R. Paterson, Brown, Manager,
HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man make up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For term please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,
CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered N.N.4

# व्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला–– सोमवार तारीख २९ माहे जुलई सन १९१२ ई० [ अंक ३०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेवली आहे.

## नोंटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः– गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अग-त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुप-ये प्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारवरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ { G. A. Phillips. एजंट
नं १

**मुंबई बँकचें सोनें.**

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २९३⁄४ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० { G. A. PHILLIPS. एजंट
ना० नं० २

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळे आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

## निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नजरेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनर्विवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचें प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परिणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कमा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनिवार्य संकटांत पडल्या-मुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परिणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्ये-कांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टी-विषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनपेठेंत हनु-मान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निरा-श्रित बालरक्षण गृह स्थापन केलें** आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णु प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाट लीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निसत्व लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. व ताबडतोब दूर होतात. किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्यांचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानांवर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मुंबरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

### पाऊस पाऊस !!

आजकाल जिकडे तिकडे पाण्याची ओरड आहे. मेघराजाची केव्हां कृपा होईल इकडे सर्वांचें लक्ष वेधलें आहे. विहिरी तलावां-चें पाणी अगदीं तळाला लागलें. एक एक मोट ओढतांना जनावरांचे प्राण का-सावीस होत आहेत. अशा बिकट प्रसंगा-तून बचावण्यास जर तुह्मास एकादा सोपा मार्ग पाहिजे असेल तर आमचीं **मोटेचीं लोखंडीं चाकें** वापरून पहा. अनुभवा शिवाय त्यांची योग्यता समजणार नाहीं. आज एका चाकाबद्दल मागणी करा. जास्त माहितीबद्दल क्याटलॉग मागवा.

**किर्लोस्करबंधु.**
**पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा ).**
नो० नं० ३४९

### जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं आह्मांस आमच्या मालकीचा खालील वर्ण-नाचा बंगला विकावयाचा आहे तर ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं समक्ष येऊन भेटावें:—

बंगल्याचें वर्णनः—

आकोला–ताजनापेठ येथील तेली पुऱ्यांतील रा. रा. विष्णु बाळकृष्ण मराठे वकील यांच्या घराच्या पश्चिमेस असलेल्या बंगला सर्व आंवारासुद्धां ज्यांत एक विहिर आहे आणि जेथें हल्लीं इंग्रजी दारूचें दुकान आहे. तो बंगला पूर्वी रा. रा. नानाभाई जीवनजी कंत्राटदार यांच्या मालकीचा होता. तो खरेदीच्या आधारें आह्माकडे आलेला आहे. ता. ८ जुलै १९१२ इ.

सही
धनजीशा मोटाभाई दारूखाने-वाल्लेची कंपनी दुकान आकोला.
नो० नं० ३९१

### नोटीस

वि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टीः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १४ सन १९१२
सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—

अर्जदार

राधाबाई जवजे रामासा व जडाबाई जवजे हरीलाल गुजराथी राहणार आकोगांव तालुके बाळापूर.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यांनीं सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्या-बद्दल अर्ज आमचे कोर्टांत तारीख १९।८।१९१२ इ० रोजीं आमचे कोर्टांत नेमिला आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचे कोर्टांत हजर व्हावें. तसे न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० १९-७-१९१२ इसवी.

सही
JANKIPRASAD.
सबजज्ज आकोला.
नो० नं० ४०३

### नोटीस

नोटीस बेशमी किसन वल्द नन्ही चांभार रा. मौजे सींदी तालुके एलीचपूर जि० उमरावती यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुं माझा लग्नाचा भ्रतार आहेस लग्न होण्यास आज १६-१७ वर्षे झालीं व मला शाहाणी हो-ण्यास ११-१२ वर्षे झालीं त्या वेळेपासून मी तुझे घरीं एक दोन वेळां आली व तुझे पोटची मला मुलगीही झाली होती. हल्लीं सात वर्षांपासून तुं मला मा-रठोक करून काढून दिले तरी मी तुझे घरीं एक दोन वेळां आली व मला घेऊन जाण्याबद्दल निरोपही पाठविला तरी तुं मला नेलें नाहीं. मी येऊन राहिली असतां तुं मला ठेविलें नाहीं त्या वेळे पासून मी आपले बापाचे शेजारी राहून लोकांचे कर्ज काढून पोट भरीत आहे व मला रुपये २०० लोकांचे कर्ज झालें आहे करिता तुला नोटीशीनें कळविलें जाते कीं नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आत मला लोकांचे कर्ज रुपये २०० देऊन घेऊन जावें मी नांदण्यास तयार आहे तसे तुह्मी न केल्यास नोटीस हे फारकत समजून मी गंधर्व करीन मग तुजचा मज-वर ब्यग्नासंबंधीं कांहीं हक्क राहणार नाहीं ही नोटीस दिली ता० १८-७-१२

सही
निः भार्गीथी मर्द किसन चांभार
नो नं० ४०४

## खरी पूजा

कांहीं वर्षांपूर्वी उत्तम लोकवासी स्वामी विवेकानंद यांचें या विषयावर एक व्याख्यान झालें होतें. पण त्याचें मराठी भाषांतर महाराष्ट्र वाचकांपुढें अद्याप आलें नव्हतें. सदर व्याख्यान फार सुंदर व सद्यःस्थितींत लोकांना विचार करण्यासारखें असल्यामुळें त्याचें रूपांतर येथें देत आहोंत.

धर्म हा भक्तींत—अंतःकरणापासूनच्या शुद्ध, निर्मळ व खऱ्या भक्तींत- आहे, विधींत किंवा बाह्योपचारांत नाहीं. मानसिक व शारीरिक शुचित्व नसेल, तर मनुष्यानें देवालयांत येऊन शिवाची पूजा करणें निरुपयोगी आहे. जे मनानें किंवा शरिरानें पवित्र आहेत, त्यांच्याच प्रार्थना शिवाला मान्य होतात; आणि जे स्वतः अपवित्र असून दुसऱ्यांना धर्मोपदेश करण्याचा प्रयत्न करितात त्यांची शेवटीं फजितीच व्हावयाची बाह्यपूजा ह्मणजे अंतरपूजेचें—मानसपूजेचें—केवळ बाह्य लक्षण आहे; आंतरपूजा व शुचित्व हींच खरोखर प्रधान आहेत. त्यांवांचून बाह्य पूजेचा थाटमाट व्यर्थ होय. तेव्हां ही मुख्य गोष्ट आपण सर्वांनीं लक्षांत बाळगली पाहिजे. या कलियुगांत लोक इतके पतित झाले आहेत कीं, त्यांना असें वाटतें कीं, आपण वाटेल तें करावें व मग एखाद्या तीर्थाला जावें ह्मणजे झालें ! आपल्या सर्व पापांचें तेथें क्षालन होईल ! अपवित्र नानें जर एखादा माणस देवळांत गेला, तर त्याच्या पापसंचयांत भर पडून घरून निघतेवेळीं तें जितका पापी होता त्याच्यापेक्षां अधिक पापी बनून तो घरीं परत जातो. तीर्थाच्या ठिकाणीं पवित्र माणसें व पवित्र वस्तु यांचाच वास असतो. पण एखाद्या ठिकाणीं पवित्र माणसांचा वास असून तेथें जरी देवालय नसले, तरी त्या ठिकाणची गणणा तीर्थांतच करावयाची. एखाद्या ठिकाणीं शेंकडो देवालयें असून तें ठिकाण जर अपवित्र माणसांनीं भरलेलें असेल, तर त्या ठिकाणचें तीर्थत्व गेलें, असें समजावें. तीर्थाच्या ठिकाणीं राहणें मोठें कठीण आहे; कारण इतर ठिकाणीं घडलेल्या पापांचें क्षालन सहज होतें. पण तीर्थाच्या ठिकाणीं केलेल्य पापांचें क्षालन कधींही होत नाहीं. सर्व पूजेचें सार दोन गोष्टींत आहे:—शुचित्व व परोपकार. दरिद्री, दुर्बळ, अनाथ व रोगपीडित यांच्या ठिकाणीं ज्याला शिवस्वरूप दिसतें, तोच शिवाची खरी पूजा करितो; आणि फक्त मूर्तिमध्येंच ज्याला शिव दिसत असेल, त्यानें पूजेचा आतां कोठें ‘श्रीग’ घेतला आहे, असें समजावें. जाति, किंवा वर्ण, किंवा पंथ, किंवा कांहीं, याकडे लक्ष न देतां जर एखाद्यानें कोणा दरिद्री माणसाला, तो केवळ शिवस्वरूप आहे, असें मानून, हात दिला, तर शिवाला केवळ शिवालयांत पाहणाऱ्या माणसापेक्षां शिवाची मर्जी त्याच्यावर ज्यास्त प्रसन्न होईल.

एका श्रीमंत माणसाचा एक बाग असून त्यांत त्याचे दोन माळी होते. यांतला एक माळी अगदीं आळशी असून तो मुळींच काम करीत नसे. पण यजमानांची स्वारी बागांत आली, कीं तो चटकन उठून व हात जोडून अगदीं नम्रपणें असें ह्मणे.— ‘काय पण धनीसाहेबांचें मुखकमल प्रफुल्लित व मोहक आहे !’ अशीं आणखी यजमानाचीं किती तरी स्तुतिस्तोत्रें गात गात तो त्याच्या भोंवतीं भोंवतीं नाचे. दुसरा माळी फार बोलत नसे; बिचारा सर्व दिवसभर खर खर खो व उत्तम फळफळावळ व भाजीपाला तयार करी; व ते सर्व जिन्नस आपल्या डोक्यावर घेऊन तेथून दूर असलेल्या आपल्या धन्याच्या घरीं पोंचतें करी; आतां या दोन माळ्यांपैकीं कोणावर बरें धन्याची मर्जी अधिक प्रसन्न होईल ? शिव हाच तो यजमान असून ही पृथ्वी हा त्याचा बाग आहे; व येथें दोन प्रकारचे माळी आहेत; एकः—आळशी व दांभिक लोक; हे कांहीं उद्योग करीत नाहींत, फक्त शिवाच्या सुंदर नाकाडोळ्यांचे व एकंदर त्यांच्या मुखकमलाचे दिवसभर पोवाडे गात असतात; दुसरेः—सात्त्विक व उद्योगी लोक; हे अहोरात्र शिवाच्या मुलांची—सर्व प्राण्यांची—एकंदर सृष्टीची -त्यांतले त्यांत जीं त्याचीं मुलें अनाथ, दुर्बल, दरिद्री व पंगू आहेत त्यांची—काळजी वाहत असतात. या दोन प्रकारच्या लोकांपैकीं कोणते लोक बरें शिवाला अधिक प्रिय होतील ? अर्थात् त्याच्या मुलांवर प्रेम करणारे. पित्याची सेवा ज्याला कर्तव्य असेल, त्यानें पहिल्यानें त्याच्या मुलांची सेवा केली पाहिजे. ज्याला शिवाची खरी सेवा करावयाची असेल, त्यानें पहिल्यानें त्याच्या मुलांची—या सृष्टींतील सर्व प्राण्यांची सेवा केली पाहिजे. शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, हरिदासाची जे सेवा करितात ते त्याचे ( हरीचे ) लाडके असतात. तेव्हां, ही गोष्ट आपण विसरूं नका मी आपल्याला पुन्हा सांगतों कीं, आपण शुद्ध असलें पाहिजे, व जो जो आपल्याकडे ( मदतीकरितां ) येईल त्याला त्याला यथाशक्ति मदत केली पाहिजे. हेंच सत्कर्म, हेंच पुण्य याच्या योगानें चित्तशुद्धि होते. आणि मग प्रत्येकाच्या अंतःकरणांत वास करून असलेल्या शिवाचें दर्शन घडतें. त्याची वसति प्रत्येकाच्या अंतःकरणांत निरंतर आहे. आरशावर जर धूळ व घाण पडलेली असेल, तर त्यांत आपलें प्रतिबिंब आपल्याला नीट दिसत नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या अंतःकरणाच्या आरशावर अज्ञान व दुष्टपणा यांची घाण पसरली आहे. आपल्यापुरताच तेवढा प्रथम विचार करणें याला आपलपोटेपणा ह्मणतात. व ह आपलपोटेपणा ह्मणजे सर्वांत मोठें पाप होय. ‘मी प्रथम खाईन, इतरांपेक्षां मला ज्यास्त पैसा असावा, सर्व कांहीं मलाच मिळावें, इतरांचे पूर्वी मीच एकटा स्वर्गाला जाईन, इतरांचे पूर्वी मीच एकटा मुक्ति साधीन.’ इत्यादि विचार ज्याचे मनांत घोळत असतात. तो मनुष्य आपलपोट्या होय. जो मनुष्य निरपेक्ष व निःस्वार्थ असतो तो असें ह्मणत असतो:—‘मी शेवटीं राहीन, स्वर्गाची मला मोठीशी इच्छा नाहीं, माझ्या बांधवांचें जर तेणेंकरून कल्याण होत असेल, तर मी नरकांत सुद्धां जाईन.’ हा निःस्वार्थपणा हीच धार्मिकतेचा कसोटी होय. ज्याच्या ठिकाणीं हा निःस्वार्थपणा ज्यास्त आहे, तोच खरा धार्मिक असून शिव त्याच्या अगदीं संनिध असते. तो ज्ञानी असो कीं अज्ञानी असो, इतरांपेक्षां तो शिवाच्या अगदीं जवळ जाऊन पोंचलेला असतो; मग त्याची त्याला स्वतांला जाणीव असो कीं नसो. आणि एखाद्या माणसानें जरी हजारों देवळांच्या पायऱ्या झिजविल्या असल्या आणि भस्माच्या पट्ट्यांनीं आपलें सर्व अंग वाघासारखें चित्रविचित्र केलें असलें, तरी तो जर आपल्याच पोळीवर तूप ओढणारा असेल, तर तो शिवापासून फारच दूर आहे, असें समजावें.

वऱ्हाडसमाचार.

आषाढ शुद्ध १९ शके १८३४ परिधावी

## चीनांतल्या राज्यक्रांतीचे परिणाम.

### ( प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी. )

बाबू रामलाल सरकार नांवाचे एक बंगाली गृहस्थ सध्या चीनमध्यें प्रवास करीत आहेत. त्यांनीं राज्यक्रांतीच्या नंतर तेथील लोकांच्या वर्तनांत घडलेल्या फेरफारासंबंधानें स्वतः पाहिलेली अत्यंत मनोरंजक हकीकत इकडे लिहून कळविली आहे. ती अशी:—

चीनांतल्या राज्यक्रांतीमुळें तेथील लोकावर विलक्षण परिणाम घडले आहेत. जेवढे ह्मणून आळशी, निरुद्योगी, जुवेबाज व व्यसनी लोक होते तेवढे सैन्यात भरती झाले आहेत. त्यांना दरमहा ६ टेल ह्मणजे सरासरी १३ रु० दरमहा पगार मिळतो. यामुळें मजुरीचे दर मनस्वी चढले आहेत. सरकारी नोकरातले कित्येक मारले गेले व कित्येक जिवाच्या भीतीनें पळून गेले. कित्येक नोकरी सोडून घरीं बसले आहेत, आणि त्यांच्या जागा वशिल्याच्या तट्टांनीं भरून काढल्या आहेत. हलकट लोक कोणी लष्करी अधिकारी, कोणी म्याजिस्ट्रेट; किंवा दुसरे बडे अधिकारी होऊन बसले आहेत. सरकारी खजीना लुटून कित्येक गबर होऊन बसले आहेत. सरकारचा पैसा पाण्यासारखा सढळ हातानें खर्च होत आहे. अर्थात् हा खर्च भागण्यासाठीं रयत नवीन करांमुळें पिळून निघत आहे.

सामाजिक चालीरीतीवरही या क्रांतीचा चमत्कारिक परिणाम घडला आहे. अगोदर शेंड्या कापण्याची धामधून चालली आहे. पंधरा दिवसांच्या आंत आपल्या शेंड्या जो कापणार नाहीं तो शिक्षेस पात्र होईल असा जाहिरनामा गव्हर्नर चंग यांनीं काढल्यापासून आजपर्यंत अतिशय यत्नपूर्वक वाढविलेला केशकलाप उतरण्याची लोकांना घाई झालेली आहे मांचू राजाचे वेळीं जो लांब शेंडी ठेवणार नाहीं ... छेदाची शिक्षा ठरविण्यांत ... ही हिंदी लोक दैववादी आतां जो शेंडी कापणार ... हवाला ठेवून शेवटी पाठीवर पोलिसांच्या हातांतल्या असें दिसतें. तडाखे बसूं लागले आहेत. ज्याप्रमाणें ब्राह्मणांचें यज्ञोपवीत, वैष्णवांचा त्रिपुंड्र किंवा तप्तमुद्रा त्याचप्रमाणें चिनी लोकांची लांब शेंडी ही पवित्र मानली जात असे. पण राज्यक्रांती पासून या समजुतीला एकदम धक्का बसल्यामुळें जुन्या मतांच्या लोकांच्या मनाला फार मोठा धक्का बसला आहे.

चिनी लोकांच्या पोशाखावरही या राज्यक्रांतीचा परिणाम घडला आहे. क्रांती नंतरचा शिपाई लोकांचा पोषाख फार गमतीचा दिसतो. पूर्वीं त्यांची निळ्यारंगाची पगडी असे, किंवा डोक्यावर जपानी थाटाची टोपी असे. अंगांत शॉर्टकोट, पायांत पायजमा व बूट आणि खांद्यावर पट्टा हा जुना पोषाख जाऊन आतां युरोपियन तऱ्हेचा पोषाख आला आहे. इंग्रज सोजिरांचे जुने कोट लिलावांत विकत घेऊन ते इकडच्या सैन्याला पुरविण्यांत येत असतात. शिपायांचा दर तिमाहीला बदलतो. मे, जून व जुलै या तीन महिन्यांत पिंवळा, पुढच्या तिमाहींत निळा, व नोवेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांत कापूस भरलेला निळया रंगाचा पोषाख देतात.

क्रांती होण्याच्या पूर्वीं कोणाही अधिकाऱ्याला स्थलांतर करणें झाल्यास पालख्यांतून जाण्याची वहिवाट असे- पुढेंमागें शिपाई आणि मध्यें पालखी चालावयाची पण आतां मनु फिरला आहे. आतां छोटे बडे सगळे ऑफिसर घोड्यावर स्वार होऊन जातात. पूर्वींची मोराचीं पिसें लावलेली विचित्र पगडी आतां कोठें दिसत नाहीं. पूर्वीं सिव्हील ऑफिसरांचा पोषाख ह्मणजे झकपक दिसणारा लांब चोगा, भरजरीचा लांब आंगरखा सोनें व हिरे मोत्यें लाविलेला मुकुट आणि गळ्यांत रत्नमाला असा होता. तो तर आतां कोठेंच दिसत नाहीं आतां पहावें तर जिकडे तिकडे ईव्हानिंग कॅप. थोड्या अवकाशांत येवढ्या लक्षावधि टोप्या कोठून आल्या कोणास ठाऊक ! माणसांचाच नव्हे तर घोड्यांचा पोषाख सुद्धां विलायती झाला आहे !

चीन लोकांसारख्या प्राचीन चालीरीतीच्या व धर्मसमजुतीच्या लोकांच्या धार्मिक वर्तनांतही असेंच अंतर एकदम पडलें आहे. पूर्वींचीं भव्य मंदिरें व त्यांतल्या मूर्ति याच्याविषयीं चिनी लोकांच्या मनांत किती अभिमान, किती आदर, किती पूज्यता असे. आतां चटसाऱ्या मूर्ति उचलून फेकून देण्याइतकी त्याची तयारी झाली आहे. कांहीं ठिकाणीं पूर्वीं मूर्ति होत्या तेथें हातमाग सुरू आहेत. काहीं ठिकाणीं मूर्ति आहेत पण बिचाऱ्या पूजकाची वाट पाहतां पाहतां कंटाळल्या आहेत. आज शेंकडों वर्षें चालत आलेले धार्मिक उत्सव एकदम बंद पडले आहेत.

स्त्रीशिक्षणाविषयींची कळकळ चिनी लोकांच्या मनांत एकदम कोठून आली तें कळत नाहीं. चिनी पुरुषांप्रमाणें बायकांच्याही चालीरीती एकदम पालटल्या आहेत. पूर्वीं पाय लहान करण्याची रीत

[illegible]गी व कुलीनतेचें लक्षण असे. आतां ती हळूं हळूं चालली आहे. पूर्वीचें आज कित्येक हजार वर्षां[illegible]सून चालत आलेली वत्सरगणनापद्धति सुन[illegible]-सेन यांच्या एका जाहिरनाम्यानें बंद क[illegible]न इंग्रजी तऱ्हेप्रमाणें जानेवारीपासून वर्षारं[illegible] धरण्याची पद्धत सुरू झाली आहे. पूर्वी कोणाच्या घरीं विवाहादि मंगलकार्याच्या वेळीं वाजंत्र्याचा खर्च मोठा असे. आतां ती चाल गेली. अशा कार्यांच्या वेळीं बंदुकांचे आवाज काढीत. आतां त्या दारूचा उपयोग फक्त लष्कराकडे होतो.

दोघेजण कोठें भेटले तर दोन हात जोडून नमस्कार करण्याची पूर्वींची चाल जाऊन आतां साहेबाप्रमाणें डोक्याची टोपी काढण्याची चाल पडूं लागली आहे.

जेवण्याची चाल सुद्धां बदलली आहे. आतां चमच्या काट्यावांचून अन्न घशाखालीं उतरत नाहीं.

## प्राच्य देश आणि लोकसत्तात्मक राज्य पद्धति.

मुंबई इलाख्याच्या कार्यकारी कौंसिलाचे मेंबर ना. मि. हिल यांनीं पुण्याच्या डेक्कन कालेजच्या विद्यार्थ्यांना उद्देशून केलेल्या आपल्या भाषणांत सांगितलें कीं अलिकडे प्राच्य देशांत लोकनियंत्रित राज्यपद्धतीविषयींची आवड उत्पन्न झालेली दिसूं लागली आहे व जागृति होऊं लागली आहे अशी सामान्यतः समजूत आहे, पण ती चुकीची आहे. प्राच्य लोक असल्या क्रांतीस खरोखर पात्र झालेले नाहींत. चीन, इराण, व तुर्कस्थान या देशांतून ज्या क्रांत्या होत असलेल्या आपण ऐकतों त्यांच्या मुळाशीं लोकांची जागृति नसून सरदारवर्ग आहे. जनतेचा तिच्याशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं. प्राच्य देशांतल्या धर्मसमजुती व सामाजिक रीति पालटल्या नाहींत तों पर्यंत लोकसत्तात्मक पद्धतीला ते पात्र नाहींत असें समजावें. लोकमत नियंत्रणाला ख्रिस्तीधर्म अनुकूळ आहे तसे प्राच्यधर्म नाहींत. ना. मि. हिल यांचें हें मत आकुंचित दृष्टीचें आहे हें सांगावयास नकोच प्राच्य लोक धर्मबंधनानें जखडले गेले आहेत, हें मत तीस चाळीस वर्षांपूर्वी कोणीं प्रतिपादिलें असतें तर तें यथार्थ होतें. पण सध्याच्या स्थितींत तें खरें नाहीं. इंग्रज लोक सामाजिक बंधनांनीं जितके निबद्ध आहेत तितके आह्मी धर्मनियमांनीं बद्ध आहों. इंग्रजांत पोपचा अधिकार जितका चालतो तितकाच शंकराचार्यांचा आमचेवर चालतो. आमच्या कोणत्या धर्मसमजुती किंवा सामाजिक रीति लोकसत्तात्मक राज्यपद्धतीच्या आड येण्यासारख्या आहेत याचीं कांहीं उदाहरणें त्यांनीं दिलीं असतीं तर बरें होतें. ज्या काळीं आमच्यात धर्म बंधनें अतिशय दृढ होतीं त्याकाळीं सुद्धां लोकसत्तेचीं प्रतिबिंबें अशा ज्या ग्रामपंचायती सारख्या त्या आमच्यांत निर्वेधपणें चालत होत्या. लोकसत्तेला पात्र करणारा असा ख्रिस्तीधर्म आहे हें ह्मणणेंही भ्रामक आहे राजा हा ईश्वरी अंश आहे व त्याची उलथून पाडण्याचा यत्न करणें पाप आहे अशा समजुती ख्रिस्तीधर्माचा पगडा युरोपभर ज्यारीनें होता अशा काळीं तिकडेही होत्या. त्या धर्माचीं बंधनें तिकडे शिथिल झालीं व शिक्षकांच्या योगानें लोकांचे डोळे उघडले तेव्हांच त्या पालटून लोकसत्तेचा मार्ग सुरळीत झाला. तोच प्रकार प्राच्य देशांतही होत आहे. प्राच्य व पाश्चात्य इतिहासांत फरक नाहीं. एक दुसऱ्याची पुनरावृत्ति आहे.

## अमेरिकन व इंग्रज.

पनामा कालव्याचें बांधकाम बहुतेक पुरें होत आलें आहे, आणखी वर्ष दीडवर्षांत विलायतचीं जाहाजें या कालव्यांतून अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याला जाऊं येऊं लागतील. या कालव्याच्या योगानें व्यापाराला फार मदत होईल; परंतु इंग्रज व अमेरिकन यांच्या मधल्या सख्याला त्यामुळें बाध येईल कीं काय अशी भीती वाटूं लागली आहे. अमेरिकेचें ह्मणणें असें आहे कीं या कालव्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या जाहाजावर जकात बसवावी. इंग्रजांना हें कबूल नाहीं. कारण उघड आहे. तें हें कीं त्यामुळें इंग्रजांची स्वार्थहानि होणार आहे. अमेरिका व इंग्रज यांच्यांत प्रेमाचा सांधा अजून बेमालूम बसला नाहीं असें दिसतें.

## लोकांची सोय.

कलकत्ता हायकोर्टाचे जज ना० मि० फ्लेचर यांच्यापुढें एका खटल्यात वादीच्या तर्फेचे वकील दुसरीकडे गुंतल्यामुळें हजर झाले नाहींत. त्यावरून जजांनीं तो दावा काढून टाकतांना असें ह्मटलें कीं कोर्टाकरितां लोक नाहींत तर लोकांकरितां कोर्टें आहेत. मध्यप्रांताचें माजी चीफ कमिशनर लॉर्ड मॅक्डोनेल यांनीं हाउस ऑफ लॉर्डसमध्यें आपल्या एका भाषणांतहीं असेच उद्गार काढले होते. ते ह्मणाले कीं सिव्हिल सर्विसमधल्या अधिकाऱ्यांसाठीं हिंदुस्थान नाहीं, तर हिंदुस्थानासाठीं ते अधिकारी आहेत. या दोन्ही अधिकाऱ्यांचे हे उद्गार लक्षांत ठेवून म्याजिस्ट्रेट वगैरे खालचे अधिकारी वागतील तर किती चांगलें होईल! म्याजिस्ट्रेटसाहेब दौऱ्यावर असतात, आणि पक्षकारांना व साक्षीदारांना समन्सें काढून दूरदूरच्या अंतरावरून बोलावतात. कित्येक वेळां बोलावल्या दिवशीं दावा कोर्टापुढें निघतही नाहीं व या बिचाऱ्यांना व त्यांच्या वाकिलांना परक्या गांवीं निष्कारण हाल काढीत सदर दौऱ्याचे गांवीं दिवस दोन दिवस राहावें लागतें. यापेक्षां लोकांच्या सोयीकडे अधिक लक्ष देऊन अधिकाऱ्यांना वागतां येणार नाहीं असें नाहीं. इकडे लॉर्ड हार्डिंगसारख्या बड्या अधिकाऱ्याचें लक्ष जाऊन लोकांच्या सोयीकडे विशेष लक्ष देण्याविषयीं ताकिदीचे हुकुम होतील तर लोक त्यांना दुवा देतील.

## मताभिलाषी स्त्रियांचा अत्याचार

इंग्लंडांतील मताभिलाषी स्त्रियांचीं डोकीं ठिकाणावर येणार तरी केव्हां तें कळत नाहीं. दिवसेंदिवस त्यांच्या अत्याचाराच्या विचित्र गोष्टी कानीं येत आहेत. खिडक्यांचीं तावदानें फोडणें, कमरेला दोरी बांधून पार्लमेंटच्या ग्यालरींतून खालीं उतरणें, रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या अधिकाऱ्यावर शेणमार करणें या पोरचेष्टा आतां संपल्या आणि याहून गंभीर आणि अंगावर शहारा आणणाऱ्या कृत्यांस त्यांनीं आतां हात घातला आहे असें दिसतें. मि० लाईड जॉर्ज हे त्यांच्या पक्षाचे ह्मणजे स्त्रियांना मतें देण्याचा अधिकार असावा असें ह्मणणारे आहेत, पण ते कॅबिनेटमध्यें आहेत व कॅबिनेट अद्याप या मताभिलाषी स्त्रियांच्या मागण्या कबूल करीत नाहीं येवढ्याच साठीं थोड्या दिवसांपूर्वी या स्त्रियांनीं त्यांना चोप दिला होता, व आतां तर खुद्द मुख्य प्रधान मि० ॲस्किथ यांचा पिच्छा त्यांनीं पुरविला आहे. नुकतेच ते आयर्लंडमध्यें गेले होते. तेथें ते व आयरिश पुढारी मि० रेडमंड हे गाडींतून जात असतां एका बाईनें त्यांच्यावर शस्त्र फेंकलें! दुसरे एक प्रधान मि० मॅकेना व मि० चर्चिल यांच्या घरांत बॉंब गोळे टाकण्यासही त्यांनीं कमी केलें नाहीं. परवा थिएटर रॉयलमध्यें खेळ चालू असतां दोघा मताभिलाषी स्त्रियांनीं एका खुर्चीच्या पायाला चिंध्या बांधून व रॉकेल तेलानें त्या भिजवून ती जळती खुर्चीच प्रेक्षकाच्या पुढील रंगेवर फेंकली! हिंदुस्थानात अत्याचाराचा बंदोबस्त विलायतेंतल्या अधिकाऱ्यांना टाकाच्या एका फटकाऱ्यासरशीं नवे कायदे घडवून करतां आला, तसा मताभिलाषी स्त्रियांचा का करतां येऊं नये तें कळत नाहीं.

## दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोक.

मद्रासचे माजी गव्हर्नर लॉर्ड ॲम्पथिल हे दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदूंच्या हक्क रक्षणार्थ इतकी चिकाटी धरून लढत आहेत कीं सगळ्या हिंदुस्थानानें जाहिरसभा भरवून त्यांचे आभार मानणें अगदीं जरूर आहे. दक्षिण आफ्रिकेंतले युनियन पार्लमेंट लढ्यांत पडलेल्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्यांत दिरंगाई करीत आहे. पण ज्यांना छळ सोसावा लागत आहे त्यांचा विचार काय? पार्लमेंटांत या संबंधानें प्रश्न विचारला तेव्हां लॉर्ड एमंट यांच्या मनाची शांतता यत्किंचितही ढळली नाहीं. एखाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणें त्यांनीं गंभीरपणें व शांततेनें उत्तर दिलें कीं युनियन सरकार या गोष्टीचा विचार करीत आहे. मि० स्मटस बदलून त्यांच्या जागीं मि० फिशरजरी आले तरी सरकारचें राज्यधोरण ध्यानांत ठेवूनच ते या प्रश्नाचा निकाल लावतील अशा उत्तरानें छळ सोसावा लागणाऱ्या बिचाऱ्या हिंदी लोकांचें कोणतें शांतवन होईल असें त्यांना वाटलें कोण जाणे! आह्मी हिंदी लोक दैववादी आहों. तेव्हां दैवावरच हवाला ठेवून शेवटीं त्यांना बसावें लागणार असें दिसतें.

## अबकारीसंबंधानें डेप्युटेशन

हिंदुस्थानांतल्या अबकारी खात्यांच्या नियमांत पुष्कळ सुधारणेस जागा आहे ही गोष्ट लॉर्ड क्रू साहेबाकडे ना० मि० गोखले व इतर हिंदुस्थानाचे हितचिंतक यांचें डेप्युटेशन जाण्यापासून कांहीं तरी हित निष्पन्न होईल असें पुष्कळांस वाटत आहे आणि तें लवकरच यथार्थ होईल असें आह्मांस वाटतें. लॉर्ड क्रू हे सरळ मनाचे व कांहींसे करारीही आहेत. तेव्हां त्यांनीं मनावर घेतल्यास हिंदुस्थानांतल्या अबकारी खात्यांत इष्ट सुधारणा लवकरच घडून येतील अशी अपेक्षा केल्यास ती अगदींच गैरवाजवी होणार नाहीं.

## इतिहास संशोधक मंडळी.

या नांवाची एक मंडळी पुण्यास स्थापन झाली आहे तींत सरदार खंडेराव मेहेंदळे, राजवाडे, साने, हरिभाऊ आपटे, वगैरे ठळक ठळक विद्वान् मंडळी आहेत असें ऐकतों. यांच्या सभा होऊन विद्वत्तापूर्ण व शोधपूर्वक लिहिलेले लेख वा[illegible] जातात. पण हे सबंध लेख तर राहोतच, पण त्यांचा सारांशसुद्धां पुण्याच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत नाहींत. [illegible] कां? पुण्याच्या वर्तमानपत्रांना तारांचीं भाषांतरें देण्यापलीकडे आपलें कांहीं कर्तव्य आहे असें वाटत नाहीं कीं या मंडळीला पडद्याच्या बाहेर आपले उद्गार जाऊं देण्याची भीती वाटते हें कळत नाहीं. हे लेख वर्तमानपत्रांतून देण्याइतके क्षुद्र नाहींत असें लेखकांस वाटत असलें तर विविधज्ञानविस्तारासारख्या भारदस्त मासिक पुस्तकाकडे पाठवावे. पण लोकांच्या ते निदर्शनास येऊन विद्वानांच्या चर्चेचे विषय होऊन बसतील अशी कांहीं तरी तजविज संशोधन मंडळीनें करणें अवश्य आहे. या मंडळीच्या रिपोर्टांत वर्ष अखेर [illegible] सामिल होतील असें कदाचित् कोणी ह्मणतील. पण या मंडळीचा जो एक रिपोर्ट आतांपर्यंत निघाला आहे त्याच्या शंभर सवाशें पृष्ठांस तीन रुपये किंमत ठेविली आहे! इतक्या महाग मोलाचा रिपोर्ट किती जणांच्या वाचण्यांत येणार? यापेक्षां वर्तमानपत्रांत सारांशरूपानें व 'विस्तारां'त सबंध देण्याची कांहीं तजवीज मंडळी करील तर तिचा उद्देश अधिक सफळ होईल.

## दारिद्र्याच्या कारणांचा शोध.

मुंबईचे दानशूर व कर्मवीर परलोकवासी मि० टाटा यांचे चिरंजीव मि० रतन टाटा यांनीं जगांतल्या दारिद्र्याच्या कारणांचा शोध लावण्याकरितां लंडन युनिव्हर्सिटीला वार्षिक चौदाशें पौंड ह्मणजे सुमारें २१००० रुपयांची वार्षिक देणगी तीनवर्षें पर्यंत

[illegible]ण्याचें कबूल केलें आहे अशी बातमी [illegible]ाली आहे. मि० टाटा यांचें दातृत्त्व [illegible]शंसनीय आहे यांत शंका नाहीं. मात्र [illegible]ा बाबतींत त्याची दिशा थोडीशी चुकली [illegible]ाहे असें ह्मटल्या वांचून आमच्यानें राहवत [illegible]ाहीं. दारिद्र्याचीं कारणें शोधावयाचीं ह्मणजे [illegible]त्येक राष्ट्रांतल्या राजकीय, औद्योगिक व [illegible]ामाजिक स्थितीचें सूक्ष्म अवलोकन करावयास पाहिजे. साऱ्या जगाचें असें सुक्ष्म अवलोकन करण्यास ही रकम कशी पुरणार? [illegible]ापेक्षा हिंदुस्थानच्याच दारिद्र्याचीं कारणें शोधण्याचे कामीं या रकमेचा विनियोग करण्याबद्दल त्यांनीं शर्त घातली असती तर तें अधिक उपयुक्त व प्रशंसनीय झालें असतें. हिंदुस्थानांत सगळ्या जगाहून अधिक दारिद्र्य आहे मि० टाटा हे हिंदी गृहस्थ असल्यामुळें आपल्या देश बांधवांच्या दारिद्र्याचीं कारणें शोधण्याकडे या रकमेचा [illegible]ग व्हावा असें त्यांनीं ह्मटलें असतें [illegible] तें देशाभिमानाचें कृत्य गणिलें गेलें असतें व सद्यःफलदायीही होतें. हिंदुस्थानांत अनेक समाज आहेत. त्या समाजाचे विशिष्ट रोग आहेत व त्यारोगाचें निदान करणें अत्यंत निकडीचेंही आहे. अशावेळीं या कामगिरीवर एखाद्या धन्वंतरीची नेमणूक झाली असती तर द० वा० टाटांस आपल्या चिरंजिवाचें हें देशाभिमानी कृत्य पाहून खचित संतोष झाला असता. असो. झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. पण मि० टाटा यांची ही कल्पना उचलून दुसरा कोणी लक्ष्मीपुत्र नुसत्या हिंदुस्थानापुरता दारिद्र्याचा शोध लावण्यास लागणारें द्रव्यसाह्य देण्यास तयार होईल काय?

---

## स्त्रियांचा सन्मान.

हिंदुस्थानांतले लोक स्त्रियांना बटकींसारखें किंबहुना केरसुणीसारखें समजतात, इतके ते रानटी आहेत अशी पाश्चात्य लोकांची गैरसमजूत कांहीं ख्रिस्ती मिशनरी व आंग्लोइंडियन लेखक करून देत असतात व आपल्या मताच्या समर्थनार्थ 'अनृतं साहसं माया' यासारखीं स्मृतिवचनें मागचा पुढचा संदर्भ मुद्दाम सोडून देऊन पुढें करतात. यांना ना० जस्टिस चंदावरकरांचा 'हिंदुधर्माचें ह्मद्गत' मालेंतला चवथा लेख वाचून काय वाटेल? नामदार साहेब ह्मणतात— आमच्या ऋषींचा हिंदु स्त्रीत्वाचा आदर्श इतका उच्च आहे कीं प्रत्येक हिंदु मनुष्यास त्याबद्दल अभिमान वाटला पाहिजे प्रसिद्ध इंग्रज कवि टेनिसन ह्मणतो कीं 'स्त्रियांचा पक्ष तोच पुरुषांचा पक्ष.' याचा अर्थ असा कीं स्त्रिया व पुरुष यांच्यांत भेद नाहीं. त्यांचा दर्जा समान आहे. पण हिंदुधर्मांतला स्त्रीत्वाचा आदर्श याहून श्रेष्ठ आहे. हिंदुस्थानांत अगदीं अशिक्षित अशा महार मांगांत सुद्धां स्त्रीजाती विषयीं फार उच्चमत व पूज्यबुद्धि आहे. मनुष्याचा संसार सुखमय किंवा दुःखमय करणें स्त्रीच्या हातीं आहे. ती त्याला भूलोकीं स्वर्गसुख देण्यास जशी समर्थ आहे तशी अनंत काळच्या यमयातना भोगण्यास लावणारी शक्तीही तिच्या ठायीं आहे. स्त्री ह्मणजेच संसार. पुरुष तिच्यापुढें कःपदार्थ ही समजूत प्रत्येक हिंदुच्या मनांत बद्धमूल आहे, धर्म अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ स्त्रीच्या साह्यावाचून मिळावयाचे नाहींत हें वचन रोजच्या व्यवहारांत प्रत्येक हिंदुच्या डोळ्यांपुढें असतें. 'गृहिणी गृहमुच्यते' या वचनांत काय सांगीतलें आहे! गृहिणी हेंच कुटुंब हाच संसार- संसाराचें धनित्व स्त्रीकडे असतें. पुरुष हा तिचा दास आहे. स्त्री ही मोक्षसोपानाची पायरी आहे. ह्मणूनच याज्ञवल्क्यानें ह्मटलें आहे 'मेध्या वै योषितो ह्यतः' 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्रदेवताः, असे मनुनें ही ह्मटलें आहे. टेनिसननें स्त्रियांची जी योग्यता वर्णिली आहे तिच्यापेक्षां ही पदवी किती थोर आहे!

---

# वऱ्हाड वृत्त.

हवामान—आभाळ आज बरेंच दिवस आभ्राच्छादित आहे. पण इतके दिवस पाऊस वळवाच्या पाऊसाप्रमाणें जिकडे पडला तिकडेच पडला असा होता. पण या अठवड्यांत पावसानें अगदीं बहार करून सोडली. दोन दिवसतर सारखी झडच लागून राहिली. आतां सर्व ठिकाणीं पाऊस झाला. रोगराई विशेष नाहीं.

रा. रा. बी. डब्ल्यू डूरी आसि. डि. सु. पो. यास जबलपूरहून वाशिम येथें बदलले.

रा. रा. आर. एल जोन्स्टोन असि. डि. सु. पो. खामगांव ता० १ आगष्ट पासून अगर घेतील त्या तारखेपासून दोन महिनें सत्तावीस दिवसांची हक्काची रजा दिली व त्यांचे जागीं रा. रा. ए. जी स्कॉट आसि. डि. सु. पो. उमरावती यां[illegible] नेमके.

रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी यास रावबहादूर ही सन्माननीय पदवी मिळाली ह्मणून मुर्तिजापूरच्या नागरीकांनीं काल रोजीं त्[illegible] मोठ्या थाटाची पानसुपारी केली.

---

# वर्तमानसार.

गेल्या ता० १ रोजीं दार्जीलिंग हिमालयन रेल्वेवर सकना येथें बंगालच्या गव्हर्नराची स्पेशल ट्रेन मोडण्याचा प्रयत्न ज्या इसमांनीं केला त्यांच्यासंबंधानें गुन्हा शाबीत होण्यासारखी माहिती देणारास २५० रुपयांचें बक्षीस देण्याचें दार्जीलिंग येथील पोलिसांनीं ठरविलें आहे.

कलकत्ता येथील ओरिएंटल कोल कंपनीची मीळकत खरेदी करणार कोणी मीळत नसल्यानें त्या कंपनीच्या डायरेक्टरांनीं ती लिकिडेशनमध्यें नेण्याची शिफारस केली आहे.

तारीख १९ जुलै रोजीं सर मंचरजी भावनगरी यांच्या अध्यक्षतेखालीं लंडन येथें सभा भरून विलायतेंतील हिंदी गृहस्थांकडून ना० गोखले यांचें स्वागत करण्यात आलें. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या स्थितीबद्दल तेथील सरकारशीं वाटाघाट करण्याकरितां ते दक्षिण आफ्रिकेंत जाणार असल्याचें सदर सभेंत सर मंचरजी यांनीं जाहीर केलें.

'कॅपिटल' पत्र ह्मणतें कीं, बरनगर ज्यूट कंपनीस (तागाच्या गिरणीस) येत्या ता० २१ आगष्ट रोजीं पुऱ्या होणाऱ्या वर्षांमध्यें दहा लाख रुपये नफा होणार असून एक नवीन गिरणी उभारण्यांत येणार आहे व जुनी नॉर्थ मिल मोडण्यात येणार आहे.

दिल्ली येथें हिंदुस्थानच्या वरिष्ठ कायदे कौन्सिलाची जी पहिली बैठक होईल तिला हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी मि. मॅंटेग हे हजर राहण्याकरितां हिंदुस्थानांत येणार आहेत.

लोखंडाची ओतीव घरें बांधण्याची नवीन युक्ति अमेरिकेंतील प्रख्यात शोधक मि० एडिसन यांनीं काढली आहे. एकदां बांधलेल्या घराच्या दुरुस्तीकडे निदान दहा पिढ्यांना तरी पहावें लागणार नाहीं असे ते ह्मणतात.

---

## नोटीस

नोटीस बेशमी छन्नुमिया वल्लद अलिमीया मुसलमान राहणार कुटास तालुके आकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझी जाऊ नामे जालंबी मर्द अबदुलअजीज इच्यात आणि माझ्यांत कांहीं स्थावर जंगम इष्टेटीचे संरक्षणा करितां मी तुह्मास तारीख २९-१०-११ चे सुमारास जनरल मुखत्यार पत्र करून देऊन तें दहीहांडा तालुके अकोट एथील रजीष्टर कचेरींत नोंदून दिलें व तेव्हांपासून मी तुमचे पूर्ण विश्वासावर अवलंबून राहून सर्व कागदपत्र तुमचे स्वाधीन केले व तुमचे भरंवशावर स्वस्थ राहिले तुह्मी कापूस जवारी वगैरे मालाची विक्री करून त्याचे पेसे मला दिले नाहींत त्या पैशाचे काय केले हेही तुह्मी खात्री लायक कळवित नाहीं व माझे नावानें कांहीं कारण नसतां माझे पश्चात माझे नांवाचा दस्तैवज लिहून देऊन कर्ज काढल्याची बातमी मला लागली आहे कांहीं शेताचे पट्टे माझे हित संबंधास बाध आणणारे करून घेतल्याचे समजतें त्याच प्रमाणें तुह्मी स्वार्था करितां प्रतिपक्षाचे लोकांस अनुकून झाल्याचें समजतें माझ्या विक्री केलेल्या सर्व मालाचा हिशेब व पैसे मला दिले नाहींत माझे कागदपत्र तुह्मी मला देत नाहीं माझे नावाचे करून घेतलेले पट्टे मला दिले नाहींत ८-१२ दिवसा पुर्वी मी भागु विठोबा वकाल याचे गहाणावर ३०० रुपये काढीले ते रुपये मी तुमचे जवळ विश्वासानें ठेविलें तुह्मास मागत असतां तेही रुपये तुह्मी देत नाहीं विश्वासघाताबद्दल फिर्याद या एकंदर कृत्याबद्दल तुमचेवर मी करीत आहे तुमचे मुखत्यारपत्र मी आज तारखेपासून रद्द केले आहे. या मुखत्यार पत्राचे आधारे आजतारखे पर्यंत तुह्मी केलेल्या कृत्यास मी जबाबदार नसून यापुढें केलेल्या कृत्या बद्दलही सर्व जबाबदारी तुमचेवर राहील कळावें तारीख २३-७-१९१२. सही

सहीची निशाणी मारियंबी मर्द
शहामिया देशमुख रा. लोहार
तालुके बाळापूर इची बांगडी
असे दस्तुर अंबादास सखाराम

नो० नं ४१० आकोला.

---

## नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीनें कळें जाईल. कळ[illegible] येतें कीं कजबे फत्तेखेर्डा ता० मेहकर जिल्हा बुलडाणा येथें गोविंदस विष्णुसा आणि कंपनी या नांवाची जिनींग फॅक्टरी आहे, त्या फॅक्टरींत [illegible] बायलर एक एंजिन व २० रेचे आहेत, हें सर्व यांत्रिक सामान व ज्या इमारतींत हीं सर्व यंत्रे आहेत ती इमारत व त्या शिवाय स्टोअर रुममध्यें वरील फॅक्टरीचे उपयोगाचे व कांहीं जुने सामान आहे तें, व शिवाय स्टोअर रुमची इमारत ही सर्व जाहिर लिलावानें तारिख १८।८।१२ इ० रोजीं दुपारी ११॥ व १२ वजतां याचें दरम्यान जागेवर फत्तेखेर्डा येथें विकावयाचीं आहेत. मशिनरी सर्व दुरुस्त असून उत्तम काम देण्यासारखी आहे. अशी आह्मी इंजिनिअरकडून खात्री करून घेतली आहे. करितां ज्याची ही फॅक्टरी विकत घेण्याची इच्छा असेल त्यानीं सदर्हु ता० १८।८।१२ इ० रोजीं हरासाचेवेळीं हजर रहावें. सर्व फॅक्टरीला इमारती सुद्धां ३२००० रुपये खर्च झालेला आहे. व हल्लीं तिची किंमत १६००० पासून २०००० रु० एंजिन व बायलर आहे अगदीं नवे आहेत. त्यावर फक्त दोन वर्षें काम घेतलें आहे. लिलाव तीनवार पुकारल्याबरोबर रक्कम नगदी दिली पाहीजे. त्याप्रमाणें न दिल्यास फॅक्टरीचा पुनः फेर लिलाव होईल व त्यामुळें नुकसान आल्यास पैसे न भरलेल्या खरेदीदारास द्यावें लागेल. लिलावाचें सामानाची यादी फॅक्टरींत लिलावाचे तारखेचे एक दिवस आधिपासून पाहावयास मिळेल ता० १६।७।१२ इ०

A. R. Pimprikar
Receiver appointed by
the Additional Dist. Judge
Akola.

नो० नं० ४११

---

## नोटीस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यात येतें कीं हरीसिंग कीसनसिंग जमादार रा० पेठआहमदपूर ता० मलकापूर यास आह्मी तुह्मांस तारीख ९-६-१२ रोजीं मुखत्यारपत्र लिहून देऊन नोंदलें गेलें आहे. तुह्मी आमचे मनाप्रमाणें वागत नसून उलट नुकसान करीत आहा सबब या लेखावरून हें मुखत्यारपत्र रद्द केलें आहे यापुढें तुह्मी आमचे तर्फे कोणतीच कारवाई करूं नये केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं तुह्मी बाळा सखाराम सोनार रा० पेठ आहमदपूर यांस करारनामा करून दिला आहे असे आमचे ऐकण्यांत आहे तो कोणत्या कारणाबद्दल केला आहे, केला असल्यास तो आह्मास मंजूर नाहीं कळावें तारीख ९-७-१२

सही
बाळकृष्ण त्रिंबक राहणार बार्शी-
टाकळी ता. आकोला

नो० नं० ४१२

## …नकली औषधानें फसूं नका.

"बाद…ही याकुती" बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चादलीआ यानाच आहे.

डॉक्टर चादलीआ कृत प्रसिद्ध झालेलीं औषधें नपुसकत्व, नामर्दाई व नेभळेपणाची समुळ नाश करून तारुण्यदशची छटा फमटवून पूर्ण तरतरी व जोम आणणारी

## "बादशाही याकुती"

( सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. )

ही "याकुती" आजकाल कमताकत झालेल्या दुनियेला एक ईश्वरी प्रसादच आहे. शिथिल झालेल्या शिरांना जोमदार बनविण्यांत गेलेली स्मरण शक्ति परत भरपूर सजीव करण्यांत, अविचारानें धातुपात केल्यामुळें लहान वयांतच दिसणारी म्हातारपणची सर्व चिन्हें दूर करण्यांत स्वप्नावस्था व लघवींतून जाणारी धातु बंद करण्यांत, विर्य वाहिन्यांना भरपूर विर्य पुरविण्यांत "बादशाही याकुती" म्हणजे एक अमृत आहे. किं. डबी १ ची रु. १०

गुप्तावयवांची कमजोरीवर प्रसिध्ध

"पुरुषार्थ लेप" किं० रु० २५

जास्त माहितीसाठीं हकीकत लीहा.

पत्ता:-- चांदलीआ आणि कंपनी काल्बका देवी रोड मुंबई.

नो. नं. ३३१



## जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबांत नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गूण आमच्या तपकीरींतं एक वर्षेपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवू. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे

डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहीत आमचेवर दया करून लिहिणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाण:—

गुरुबसवा आणि कंपनी, सावकार पेठ, मद्रास.

नो. नं. ३०७


## नोटीस

रा. रा. गणपत वल्लद रायसींग पाटील झालटे मुकाम अंत्री तालुके चिखली जि० बुल्ढाणा यांस खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मी भाऊ भाऊ असून वडिलोंपार्जीत चालत आलेले जंगम स्थावर इस्टेटीचे तुह्मी व आह्मी वारस आहेत. वडिलांची सर्व इस्टेट तुमचे ताब्यांत असले वरून सदर्हू इस्टेटीपैकीं मला निम्मे इस्टेट तुह्मी द्यावी व पावती घ्यावी. अदया विषयीं बरेच वेळां चार चौघांत विनंती केली असतां तुह्मी मान्य केली नाहीं. या करितां तुह्मांस ही नोटीस दिली आहे तरी नोटीस पावले तारखे पासून ८ दिवसाचें आंत माझे हिश्शाची जंगम स्थावर इस्टेट मला द्यावी तसें न केल्यास कायद्या प्रमाणें व्यवस्था करणें भाग पडेल या करितां नोटिशीनें कळविलें आहे. कळावें. तारीख २२-७-१२ ई० मुक्काम आकोला.

सहीची निशाणी

बळवंत वल्लद रायसिंग पाटील झालटे यांचे हातची

नो० नं ४०५

## जाहिर नोटीस

सर्व सेट सावकार लोकांस खालीं सही करणार याज कडून या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा वडील मुलगा मुजातखा वल्लद दुलेखा मु।। रा. पिंपळगांवराजा तालुका मलकापूर हा अलीकडे लोकांच्या नादास लागुन कर्ज काढूं लागला आहे. करितां त्यास कोणी पैसे देऊं नये याउपर जर कोणी त्यास पैसे दिले तर ते माझ्या जिनगासि लागू होणार नाहींत. तो अलिकडे माझ्या सांगण्या प्रमाणें वागत नाहीं या करितां सर्वांस जाहीर केले आहे. कळावें तारीख २२ माहे जुलई सन १९१२ इसवी.

सही

दुलेखा वल्लद मनसफखा मु।। पठाण राहणार पिंपळगांवराजा ता. मलकापूर नि. खुद हातचा आंगठा

नो. नं ४०६

## नोटीस

नोटीस बेशमी रावजी वल्लद विठोबा भटकर राहणार हात ता० बाळापूर जि० आकोला. हल्लीं मुक्काम आगर पो० आगर ता० आकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुमचा बाप नामें विठोबा विक्रमजी भटकर हों मयत झाला. तेव्हां त्याचे उत्तर क्रियेचे वेळीं ह्मणजे ११ दिवशीं तुमचे पंच मंडळीचे समक्ष व गांवांतलि व परगांवांतील आलेल्या ब्राह्मणाचे समक्ष तुह्मी माझा भाऊ नामे शंकर याजला भुमीदान या निमित्यानें दोन एकर जमीन दान दिली व त्यावर एक रुपया दक्षणा दिली. मी तुह्मास जमीन दोन चार वेळा मागीतली असतां तुह्मी दिली नाहीं तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत दान दिलेली जमीन माझे स्वाधीन करावी न केल्यास मी कोर्ट मार्फत योग्य तजवीज करीन. व कोर्ट खर्चे व नोटीशच्या खर्चा सु… भरून घेतले जाईल. कळावे तारी… १९-७-१२

सही

गेणश बाळकृष्ण जोशी हातेकर ता… बाळापुर.

नो० नं० ४०७

## नोटीशीचें उत्तर

नोटीस बेशमी लुंगसांई मर्द शंकरगी… रा. सांगव प्र. दाहिहांडा ता० मूर्तीजापू… इसः-

खालीं सही करणार याजकडून नोटीस दे…ण्यांत येतें कीं, तूं नोटीस दिलेली सर्व खोटी आहे. तूं माझी सखी चुलती असून मजला तारीख २१. ५. १२ रोजीं मौजे सांगव येथील आपले वाडिलोपार्जित घरा बद्दल करारनामा राजीखुशीनें लिहून दिला तो कागद हल्लीं माझे जवळ आहे. अ… असतांनां तूंच लबाडीनें वऱ्हाडसमाचारच्या अंकात तारीख१९ माहे जुन सन १९१… रोजीं दिली ती अशी मला फसवून करारनामा घेतला. असे जरी लिहीले तरी तूं लिहून दीलेल्या करारनाम्या वरून आमचा हक्क बुडत नाहीं. शिवाय तूं असेही ह्मणते… ७५ रुपयें तुमचे जवळून मला घेणे… हेत. या बद्दल दिवाणींत दावा … अशी आह्मास धमकी देते. हें सर्व कृत्य तूझे लबाडीचें आहे. करितां या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं वरील स्थावर माल आपले वाडिलोपार्जितचा सांगव येथील घर हे तूं आमचे लेखी परवानगी शिवाय कोणाजवळ गहाण, खरेदी, व बक्षीस वगैरे ठेविल्यास सर्व बातल समजले जाईल. कळावें. तारीख २२-७-१९१२

सही

मारुतीगीर गुरुधोंडगीर गोसावी पो. रा. येवदे ता. दर्यापूर जि. उमरावती नि. आंगठा

नो. नं. ४०८

## नोटीस

नोटीस बेशर्मा लक्ष्मणगीर गुरु बुधगीर गोसावी रा. बोरगांव मंजु ता. व जि. आकोला. यांस खालीं सही करणार इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमची चुलत बहीण आहे. माझे ताब्यांत असलेली स्थावर जंगम जिनगी ही माझा नवरा नामे गोविंदगीर गुरु मयागीर याची आहे व कांहीं माझी आई कै. लक्ष्मीबाई नवजे माधोगीर इजकडून मी तिची व माधोगीर याची मुलगी वारस या नात्यानें आली आहे. तिची मी हिंदुधर्म शास्त्राप्रमाणें पूर्ण व स्वतंत्र मालक आहे. त्याप्रमाणें माझे हयातीस अगर माझे मरणानंतर तुमचा कांहीं एक हक्क नाहीं मला एक मुलगा व दोन नातू असें माझे मागें वारस आहेत. तुमचा कांहीं संबंध नाहीं. कळावें तारीख २४-७-१२ इ०

सही

अंबाबाई जवजे गोविंदगीर गोसावी रा० भंडारज बु।। ता० बाळापूर जि० आकोला पो० पातुर सेकबाबु तर्फे मु० किसन कुलकर्णी पाटील द० खु०

नो० नं० ४०९

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य—

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात शांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, वद, फोड, चट्टे, अंगाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

## तर स्वतःचाच राजवैद्य बनून

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरीलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

—— अनुभवतरपहा. ——

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

## बालामृत हे काय आहे ?

—— अस्सल बालामृत हें ——

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुर्वानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें.

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. ०१२ आणें पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नं. २८७

## जवानीं

भीमसेनी बळ

व

तारुण्यांतील शक्ती गेली असल्यास

दुसऱ्या औषधाशीं तुलना केल्यास नंबर १ चें

तावडतोब आमच्या १ रुपया किंमतीच्या नामांकित शक्तिवर्धक औषधाचा

## उपयाग करा

व मग पहा कीं दहा दहा व पन्नास पन्नास रुपये किंमतीच्या याकुतीपासून जास्त फायदा आहे कीं आमच्या रुपया किंमतीच्या औषधापासून जास्त फायदा आहे ?

आमचें औषध वापरणारांकडून त्यांस त्याच्या गुणाप्रमाणें

## मेलेल्यास जिवंत करणार

हा किताब मिळाला आहे.

आणि तुह्मांस वापरल्यावर खरें तेंच कळून येईल.

हें औषध ज्या वस्तूपासून बनाविलेलें आहे ती वस्तू दुनियेंतील हकिमांचें राजे लुकमानी याच्या औषधांपैकीं एक पहिल्या नंबरचें औषध आहे.

ज्यामुळें तुमची गेलेली शक्ती--तारुण्यांत आलेली दुर्बलता गात्रांची शिथिलता आजारीपणामुळें अंगांतील कमी झालेलें रक्त तुह्मांस प्राप्त होईल.

गरीबांनीं वापरून आह्मांस आशीर्वाद द्यावा ह्मणून ४० गोळ्यांच्या शिशीस किंमत १ च रुपया ठेविली आहे. पोस्टेज वेगळें. लेपाची शिशी पाहिजे असल्यास तिचीही किंमत १ रुपया आहे करिता दुसरें औषध घेण्यापूर्वीं ह्या औषधांचा उपयोग करण्यांस चुकू नका.

पांच रुपयांचीं औषधें घेणारास गोळ्यांच्या २ शिश्या बक्षिस देऊं. दुसऱ्या, कित्येक जबरदस्त रोगाकारितां आमच्याकडे अस्सल युनानी औषधें मिळतील व त्याबद्दल माहिती पत्र आल्यास कळवूं.

एम. ई. हकीम.
सिधपूर, नॉर्थ गुजराथ

---

धी बॉम्बे टाइ




= आरस =

जमीनीवर बसविण्याच्या रंगीन ... दगड आणि

सीमेन्ट विकणार.

आमच्या मालाची खात्री करून घ्या.

उत्तम माल ??? स्वस्त भाव !!

GILLINGHAM PORTLAND CEMENT COMPANY LONDON

१६७ डंकन रोड मुंबई नंबर ४

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६९ ]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येतं नाहा.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... बिन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... बिन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे व वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३

---

# Oriental Govrnment se curi LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act in treating the clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in termes the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No mān can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें